त्रिवेणी संगम
(खास काळापहाड कथा)
बाबूराव
अर्नाळकर
गूढरंजनमाला : पुष्प ४८ वे
किंमत १।। रुपया

गूढरंजनमाला- पुष्प ४८ वें

त्रिवेणी संगम !

(काळापहाड-कथा)

(कादंबरी क्रमांक - ३२४)

-: लेखक :-

बाबूराव अर्नाळकर

रम्यकथा प्रकाशन,

३९२ नारायण पेठ, कान्हेरे बिल्डिंग, पुणें २

किंमत १॥ रुपया

प्रकाशक : व्ही. जी. मेहेंदळे, रम्यकथा प्रकाशन, ३९१ नारायण पेठ, पुणे २.
तृतीयावृत्ति : डिसेंबर १९६८ किंमत १।। रुपया

श्री. बाबूराव अर्नाळकरांच्या नवनवीन रहस्यमय
कादंबऱ्या ज्यांतून प्रसिद्ध होतात, त्या—

* जयमाला—	वार्षिक वर्गणी रु. १२-००
* मुकुंदमाला—	वार्षिक वर्गणी रु. १२-००
* झुंजारमाला—	वार्षिक वर्गणी रु. १५-००
* चित्तरंजनमाला—	वार्षिक वर्गणी रु. १५-००
* रहस्यरंजनमाला—	वार्षिक वर्गणी रु. १५-००
* गूढरंजनमाला—	वार्षिक वर्गणी रु. १५-००
* कूटकथामाला—	वार्षिक वर्गणी रु. १२-००
* खूनकथामाला—	वार्षिक वर्गणी रु. १२-००

●

एवं आठहि मालांची एकत्र वार्षिक वर्गणी फक्त रु. ८०
(सर्व पुस्तकें रजिस्टर पोस्टानें एकत्र पाठविली जातात.)

दोन रुपये योजनेचे सभासद व्हा. माहिती मागवा.
त्यांत आपला भरपूर फायदा आहे.

मुद्रक : वा. ग. मेहेंदळे, जयभारत मुद्रणालय, ९९१ बुधवार पुणे २

त्रिवेणी संगम

१

रहस्यकथा-लेखक चंद्रवदन हा जर जुन्या, अगदीं पुरातन काळापासून चालून आलेल्या युक्तीला बळी पडला नसता तर त्याची आणि कृष्णाकुमारीची पुन्हां गांठ पडली नसती आणि जर त्याला कृष्णाकुमारी भेटली नसती तर?

चंद्रवदनानें त्याची नवीन कथा नुकतीच संपविली होती. आपण आपलें काम योग्य प्रकारें केलें असें समाधान त्याला वाटत होतें आणि मुंबईची हवाहि तितकीशी चांगली नसल्यामुळें त्यानें बाहेरगांवीं जाण्याचें ठरविलें. त्यानंतर चारच दिवसांनीं त्याची मोटार दक्षिण भारताचें नंदनवन म्हणून ओळखण्यांत येणाऱ्या सुंदर गोमंतकीय प्रदेशांत शिरली.

त्यानंतर दोन आठवडे निघून गेले. तो निसर्गरमणीय प्रांत सोडून पुन्हां आपणांला बकाली मुंबईस जावें लागणार या विचारानें तो खिन्न बनला.

मुंबईतल्या त्याच्या एका मित्राच्या विवाहाला हजर रहाण्याचें त्यानें आधींच वचन दिलें होतें. त्यामुळें तो जरी अगदीं स्वतंत्र होता तरी त्याला मुंबईस जाणें भाग होतें. त्यामुळें शेवटच्या रात्रीं जिवाची गंमत करण्याच्या हेतूनें तो पणजी येथील एका जुगाराच्या अड्ड्यांत गेला.

चंद्रवदन केवळ करमणूक म्हणून तेथें गेला होता. पणजीच्या जुगारी अड्ड्याबद्दल त्यानें बरेंच ऐकलें होतें. त्यामुळें त्याला ती जागा पहाण्याचें आकर्षणहि होतें. तेथें गेल्यानंतर इतर मंडळीप्रमाणें वागलें पाहिजे. म्हणून त्यानें लहान प्रमाणांवर जुगार खेळण्यास सुरुवात केली.

तेथें जुगाराचीं निरनिराळ्या प्रकारचीं साधनें होतीं. तेथें एक वर्तुळाकार टेबल होतें. त्या टेबलाचे छोटे रंगीबेरंगी भाग पाडून त्यावर घड्याळाप्रमाणें निरनिराळे आंकडे रंगविले होते आणि मध्यभागीं एक चक्र बसविलेलें होतें. टेबलाभोंवतीं बसलेले लोक निरनिराळ्या आंकड्यांवर पणाचे पैसे लावीत असत नंतर तेथला व्यवस्थापक तें चक्र फिरवीत असे. तें थांबल्यानंतर चक्राचा कांटा ज्याच्या आंकड्यावर स्थिर होईल त्यानें पण जिंकला असें मानण्यांत येई.

चंद्रवदनानें तें टेबल नापसंत केलें होतें आणि आत्तांपर्यंत तो सारखा हरतच गेला होता. शेवटीं त्याच्याजवळ अवघे चारशें रुपये शिल्लक राहिले. चंद्रवदनानें त्या दिवसाची तारीख कोणती आहे तें आठवलें. चौदा तारीख

होती. तेव्हां त्यानें शिल्लक राहिलेले सर्व पैसे चौदा आंकड्यावर ठवले आणि तो तेथून निघून जाण्याच्या तयारीनें खुर्चीवरून उठला.

इतरांनी आपल्या रकमा निरनिराळ्या आंकड्यावर ठेवल्या आणि व्यवस्थापकानें कळ दाबून चक्राला गति दिली. सर्वांच्या नजरा त्या चक्राच्या रंगीबेरंगी चाकावर स्थिर झाल्या होत्या. शेवटीं तें थांबलें.

' चौदा नंबर ' व्यवस्थापक ओरडला.

चंद्रवदनानें रिकामी केलेली खुर्ची एका बाईनें अडविली होती. चंद्रवदनानें तिच्या जवळूनच आपला हात पुढें करीत टेबलावरील सर्व पैसे उचलले. एकंदर दहा माणसें त्या खेळांत भाग घेत होती. त्यामुळें चंद्रवदनाला चार हजार रुपये मिळाले. तो हंसला तो तेथें येण्यापूर्वी त्याच्या खिशांत असलेल्या रकमेची आतां दुप्पट झाली होती म्हणून त्यानें मुळींच न घुटमळतां अठ्ठावीस नंबरच्या आंकड्यावर हजार रुपये ठेवले.

आणखी तीन मिनिटांनीं त्याला दहा हजार रुपये मिळाले. पुन्हां लाभ झाल्यामुळें त्यानें या खेपेला पांच हजार रुपये छत्तीस आंकड्यावर ठवले पण त्यावेळीं कुणाचातरी पाठीमागून धक्का लागला. चंद्रवदनानें मागें मान वळविली तेव्हां त्या माणसानें त्याची क्षमा मागितली, पणाची रक्कम सारखी वाढत असल्यामुळें आणि त्यांत भाग घेणारा कुणीहि माणूस माघार घ्यावयास तयार नसल्यामुळें बरीच गर्दी त्या टेबलासभोंवती जमा झाली होती.

' नंबर पस्तीस ' व्यवस्थापक ओरडला आणि आपण जितके जिंकले तेवढेच पैसे पुरे झाले या विचारानें चंद्रवदन तेथून निघून जाऊं लागला. तेव्हां त्याच्याच खुर्चीवर बसलेल्या त्या बाईनें त्याचा कोट पकडला.

' तुम्ही तुमचें पैसे घेत नाहीं ?' तिनें विचारलें.

' पैसे ! मी तर छत्तीस नंबरवर पैसे लावले होते आणि—'

' तें खरें, पण पैसे टेबलावर ठेवतांना तुम्हांला पाठीमागून धक्का बसल्यामुळें तुमच्या हातांतल्या नोटा पस्तीस नंबरवर पडल्या. '

' तुमची खात्री आहे ?' त्यानें आश्चर्यमिश्रित अविश्वासानें विचारलें. पण त्याला उत्तर म्हणून व्यवस्थापकानें पन्नास हजारांच्या नोटा त्याच्या हातांत ठेवल्या.

' मी तुमचा फार आभारी आहें.' चंद्रवदन त्या स्त्रीला म्हणाला, ' माझ्या तें लक्षांतच आलें नव्हतें. पण तुमचें नांव—'

' माझें नांव मनोरमा. ' ती हंसून म्हणाली, ' पण तुम्ही माझे हे हजार रुपये तुम्हांला आवडेल त्या नंबरावर ठेवाल काय ?'

' ठेवीन, पण एका अटीवर. मी माझ्याजवळचेच पैसे तुमच्या नांवावर लावणार. ' तो हंसून म्हणाला.

त्या दोघांची थोडी चर्चा झाली. नंतर चंद्रवदननें दहा हजार रुपये लावले

त्यांतील एक हजार त्यानें तिच्या नांवानें लावले होते. सुदैवानें त्याला साथ दिल्यापासूनचा त्याचा तो चौथा डाव होता. म्हणून त्यानें चार आंकड्यावर ती रक्कम लावली.

आणि काय आश्चर्य ! त्यानें तोहि डाव जिंकला. तेथें बरीच गडबड उडाली होती. सर्वजण त्या सुदैवी तरुणाबद्दल चर्चा करीत होते. या चौथ्या डावांत त्याला एक लक्ष रुपये मिळाले होते. त्यांतील हजाराच्या दहा नोटा त्यानें त्या तरुण स्त्रीच्या स्वाधीन केल्या.

'आज तुमच्यावर सुदैवाची बहाल मर्जी झालेली दिसते !' ती हंसून म्हणाली. तिचा आवाज मधुर होता आणि हास्य विलोभनीय होतें. 'तुम्ही आणखी नशिबाची परीक्षा पहाणार काय ?'

'नाहीं. नशिबानें मला चांगला हात दिला आहे आणि माझें तेवढ्यावरच समाधान झालें आहे. पण ज्याअर्थी हा शेवटचा डाव मी केवळ तुमच्यामुळेंच खेळलों आणि त्यांत मला कल्पनातीत फायदा झाला त्याअर्थी तुम्ही माझ्या-बरोबर कांहीं पेय घेतलें पाहिजे.'

'या निमंत्रणाबद्दल मी तुमची फार आभारी आहें.' ती हंसून म्हणाली, पण ही कांहीं पेय घेण्याची वेळ नाहीं तुम्ही जर मला माझ्या घरीं पोहोंच-वाल तर मी तुमची फार आभारी होईन.'

त्यानें अर्थातच ते मान्य केलें त्याच्या कविहृदयावर तिच्या सौंदर्याचा परिणाम झालाच होता. ती शहराबाहेर एका लहानशा हॉटेलांत रहात होती. त्यानें तिला आपल्या मोटारींतून तेथें पोहोंचविण्याचें ठरविलें होतें. अंतर फार थोडें असल्यामुळें त्यानें तिच्या सूचनेवरून तिला पायींच सोबत करण्याचें कबूल केलें होतें. शिवाय ती रहात होती त्या भागाचे रस्तेहि अगदीं अरुंद आणि खराब होते. त्यामुळें मोटार घेऊन जाणेंहि मूर्खपणाचें होतें.

'तुम्ही जर क्षणभर थांबाल तर मी माझ्या एका मित्राला टेलिफोन करून घेते.' बाहेरच्या दाराजवळ गेल्यानंतर ती म्हणाली, 'पूर्वींच टेलिफोन करा-यला हवा होता. पण तुम्ही मला दहा हजार रुपये मिळवून दिले त्या आनंदात मी तें विसरलें होतें. मी दोन मिनिटांत परत येतें.'

ती खरोखरच दोन मिनिटांत परत आली व नंतर ते तेथून बाहेर पडले. हवा छानदार सुटली होती. आकाश निरभ्र होतें आणि काव्यमय प्रकृतीच्या माणसाचें मन प्रफुल्लित व्हावें इतकें चांदणें पसरलें होतें. चंद्रवदनची मैत्रीण विनोदी होती ती त्याला कित्येक मजेदार गोष्टी सांगत होती. पण तो मुंब-ईस परतण्याच्या विचारांत गढला होता. तो आपल्या हॉटेलांत परत जातांच सामान घेऊन प्रवासाला निघणार होता.

'तुमच्याकडे आगपेटी आहे काय ?' कुणीतरी विचारलें आणि अंधारांतून तो प्रश्न अकारणांत आल्यामुळें चंद्रवदननें दचकून त्या माणसाकडे पाहिलें.

त्या माणसानें आपली टोपी एका डोळ्यावर ओढली होती. त्याची दाढी वाढलेली होती त्यानें गळ्याभोंवतीं गळपट्टा गुंडाळलेला होता. त्यामुळें त्याचें नाक आणि चेहऱ्याचा खालचा बराचसा भाग झांकला गेला होता. कपडे गचाळ होते आणि त्याच्या तोंडाला दारूचा व पायोरियाचा इतका दुर्गंध सुटला होता कीं चंद्रवदनाला शिसारीच आली.

ती ब्याद घालविण्याच्या इराद्यानें चंद्रवदननें आपला सिगारेट लायटर पेटविला आणि म्हणाला, 'घ्या.'

आणि त्याक्षणीं आपण सांपळ्यांत अडकलों हें त्याच्या लक्षांत आलें. कुणीतरी पाठीमागून त्याच्यावर हल्ला चढविण्याच्या तयारीनें येत होतें. ती तरुणी थोडी बाजूला सरकली होती पुढल्या माणसानें चंद्रवदनच्या हातांतील लायटर घेऊन तो त्याच्या नाकाला टेकला होता. तो दचकून मागें सरकला आणि त्याचवेळीं त्याच्या मस्तकावर पाठीमागून जोराचा आघात झाला. तो त्याहि परिस्थितींत झगडणार होता पण त्या तरुणीनें पिस्तुलाच्या दस्त्यानें त्याच्या मस्तकावर लागोपाठ दोन प्रहार केले.

'मूर्खा, उजव्या बाजूच्या आंतल्या खिशांत.' ती म्हणाली, 'गप्प बैस!' चिडून तिचा साथीदार म्हणाला आणि त्यानें चंद्रवदननें थोड्या वेळापूर्वी मिळविलेले पैसे काढून घेतले होते कांहीं क्षणांतच ती स्त्री आपल्या दोघां साथीदारांसह अदृश्य झाली होती.

o o o o

'साहेब, तुमचें किती नुकसान झालें?' पोलीस इन्स्पेक्टरनें विचारलें.

वेदनांमुळें चंद्रवदन कासावीस झाला होता. त्यानें अडखळत त्या अधिकाऱ्याला माहिती दिली आणि तो म्हणाला, 'ती बाई सुमारें पंचवीस वर्षांची होती. तिचे केस काळेभोर, चेहरा सुंदर आणि शरीर सडपातळ—

वेदनांमुळें त्याला पुढें बोलवेना तेव्हां इन्स्पेक्टर म्हणाले, 'प्रथम तुम्ही डॉक्टरांची भेट घेतली पाहिजे उद्या त्या बाईचें सविस्तर वर्णन करा तुम्ही त्या बाईला तुमच्या घरीं नेत असतांना वाटेंत हा प्रकार घडला असें मी अध्यां माझ्या रिपोर्टांत नमूद करतों.'

'मी तिला माझ्या घरीं नेत नव्हतों. तिला तिच्या घरीं नेत होतों आणि तेथें क्षणभरहि थांबणार नव्हतों.' चंद्रवदन म्हणाला.

डॉक्टरांनी चंद्रवदनाची जखम तपासली. ती बांधली आणि ती बरी होण्यास कित्येक दिवस लागतील असा आपला अभिप्राय सांगितला व त्याला झोंपेचें औषध दिलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चंद्रवदन जागा झाला तेव्हां त्याचें डोकें ठणकत होतें. पण एरवीं त्याची प्रकृति ठीक होती आणि त्यामुळें त्याला आदल्या रात्रीच्या त्या प्रकाराबद्दल गंमत वाटत होती. मुंबई प्रांतांत सुविख्यात

असलेल्या पराक्रमी आणि धूर्त काळापहाडला गोव्यांतल्या एका तरुणीनें चुटकीसरसें बनविलें होतें. त्याला जखमी केलें होतें आणि त्याच्या खिशांतील सुमारें एक लक्ष रुपये पळविले होते !

दोन दिवसांनंतर चंद्रवदन हॉस्पिटलांतून आपल्या हॉटेलांत परत येण्याचा विचार करीत होता. कांहीं कारणांमुळें आपण विवाह समारंभाला हजर राहूं शकत नाहीं अशी तार त्यानें आपल्या मुंबईतील मित्राला आधींच पाठविलीहोती.

त्या सकाळीं तो वर्तमानपत्र वाचीत असतांना त्याचा रमेश नांवाचा एक मित्र अचानक त्याला भेटावयास आला. रमेश त्याच्याच वयाचा होता आणि तो कवि व चित्रकार होता. चंद्रवदनावर हल्ला झाल्याची बातमी त्यानें वाचली होती आणि तो आपल्या जुन्या मित्राला भेटण्यासाठीं तेथें आला होता.

थोडा वेळ गप्पागोष्टी केल्यानंतर रमेश उठला आणि म्हणाला, ' मी आणखी थांबलों असतों, पण आज भोजनाचा विशेष बेत आहे. त्यामुळें माझी बहीण वाट पहात आहे. तुझी आणि रजनीची ओळख आहे ना ?'

' होय, तूंच ओळख करून दिली होतीस आणि गेल्या खेपेला आपण तिघे एकत्र जेवलोहि होतो.'

' माझ्या बहिणीनें आपली एक मैत्रीण येथें आणली आहे. परवांच्या दिवशीं आम्ही मेजवानीला जाणार आहोंत. त्यावेळीं तूं जर आमच्याबरोबर आलास तर रजनीलाहि आनंद होईल. आमच्या यजमानिणीचें नांव रावराजे असें आहे. मला वाटलें, कदाचित् तें नांव तुझ्या परिचयाचें असेल.'

तें नांव चंद्रवदनाच्या माहितीचें होतें. चंद्रवदनाला आपल्या लेखनापासून भरपूर पैसे मिळत होतें, पण केवळ साहसाच्या आवडीमुळें तो अधूनमधून काळापहाड बनत असे. श्रीमती रावराजे ही अत्यंत श्रीमंत बाई होती आणि तिच्याबद्दलचा उल्लेख वर्तमानपत्रांत वारंवार वाचावयास मिळत असे.

श्रीमतीचा पूर्वेतिहास कुणालाच माहीत नव्हता, पण तिच्या नवऱ्यानें गेल्या महायुद्धाच्या काळांत खूप संपत्ति मिळविली होती आणि नंतर श्रीमतीबरोबर लग्न केलें होतें. एका वर्षाच्या आंत तो अपघातांत मरण पावला होता आणि श्रीमती त्या सर्व संपत्तीची मालकीण बनली होती. श्रीमतीला अमूल्य रत्नांचा संग्रह करण्याचा नाद जडला होता आणि त्यामुळेंच तें नांव काळापहाडच्या परिचयाचें होतें.

' तूं तिला ओळखतोस काय ?' रमेशनें विचारलें.

मी तिच्याबद्दल ऐकलें आहे. '

' तर मग या खेपेला तूं आमच्याबरोबर तिच्या वाड्यांत चल.'

रमेशच्या आग्रहामुळें चंद्रवदनानें तें आमंत्रण स्वीकारलें. रमेश निघून गेल्यानंतर सिगारेट ओढीत बसलेल्या चंद्रवदनाकडे जर कुणीं पाहिलें असतें तर त्यांना त्याच्या डोळ्यांतील विशिष्ट प्रकारची चमक दिसली असती.

एरवीं असें त्रयस्थामार्फत आलेलें आमंत्रण त्यानें स्वीकारलें नसतें; पण श्रीमती रावराजेजवळ असा एक अमूल्य पांचू होता कीं, ज्याला साऱ्या जगांत तोड नव्हती.

२

रजनीची मैत्रीण सुशीला ऊर्फ सुशी ही सुस्वभावी होती. त्यामुळें त्या चौघांच्या बैठकीला बराच रंग भरला होता. श्रीमती रावराजेच्या मेजवानीच्या दिवशीं चंद्रवदनानें दुपारच्या भोजनासाठीं आपणांकडे यावें अशा रजनीच्या आग्रहामुळें तो तेथें गेला होता. भोजनानंतर तेथेंच गप्पागोष्टीं करण्यांत आपला दिवस घालवायचा व तेथूनच रात्रीं दहा वाजतां श्रीमती रावराजेच्या मेजवानीला जावयाचें असा रजनीनें कार्यक्रम आंखला होता.

भोजनानंतर चंद्रवदन, रमेश, रजनी आणि सुशी यांनीं आरामानें गप्पा-गोष्टी करण्यास प्रारंभ केला होता.

'आजच्या मेजवानीला कोण हजर रहाणार आहे तें कांहीं सांगतां येणार नाहीं.' रजनी म्हणाली, 'गेल्या खेपेला आम्हीं तेथें गेलों होतों त्यावेळीं एकहि माणूस आमच्या ओळखीचें नव्हतें. श्रीमतीबाईंना अगदीं अनोळखी माणसें जमा करण्याची खोड आहे. पण एवढें मात्र खरें कीं, तेथें जी मंडळी गोळा होते ती फार वरच्या दर्जाची असते.'

चंद्रवदन, रजनी, रमेश आणि सुशी यांच्याकडून श्रीमती रावराजे आणि तिचा बंगला याबद्दलची शक्य ती माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत होता. त्या कमरेभोंवतीं त्याचा पट्टा होता आणि त्या पट्ट्यांत नाना प्रकारचीं आणि त्यानें स्वतःच तयार केलेलीं हत्यारें होतीं, हें जर बाकीच्यांना समजलें असतें तर त्यांना अतिशय धक्का बसला असता.

'तो बंगला केवढा मोठा आहे?' त्यानें विचारलें.

'मोठा आहे, पण लहान आहे.' रमेश म्हणाला.

'रमेश, तूं वर्णन फार चांगले केलेस!' चंद्रवदन हंसून म्हणाला.

'माझ्या बोलण्याचा अर्थ असा आहे कीं, तो बंगला मोठाच आहे, पण तेथल्या खोल्या इतक्या मोठ्या आहेत कीं प्रत्येक मजल्यावर तीन–चारच खोल्या असूं शकतील.' रमेश म्हणाला, 'तिच्या मेजवानीच्या दिवाणखान्यानें अर्धा मजला व्यापला आहे. भोजनाची जागाहि तितकीच प्रशस्त आहे. तेथली बैठकीची खोली फार सुंदर आहे. तशी तिची खाजगी खोली आहे पण ती मीं पाहिलेली नाहीं.'

'त्या बंगल्याला मजले किती?'

'तळमजला धरून तीन.' रमेश म्हणाला, 'अगदीं वरचा मजला नोकरांना देण्यांत आला आहे तिच्याकडे चार–पांच मोलकरणी आहेत. त्याशिवाय

आचारी, पाणके आणि इतर गडीहि आहेत. इतके पैसे जवळ असणें हें खरो-खरीच भाग्याचें लक्षण आहे !'

'तिचे दागिने फार मौल्यवान आहेत.' सुशी म्हणाली, 'तिच्या गळ्यांत जो मोत्याचा कंठा आहे त्याची कुणी किंमतच करूं शकणार नाहीं.'

'पण एवढे मौल्यवान दागिने ती ठवते कुठें ?' चंद्रवदनानें विचारलें, दागिने सांभाळणें कांहीं सोपें काम नाहीं.'

'तिच्या झोंपण्याच्या खोलींतच कुठेंतरी तिची तिजोरी आहे' जनी म्हणाली, 'एकदां मीं तिच्या तोंडून तें ऐकलें होतें. खरोखरच एका माणसा-जवळ इतकी संपत्ति कधीं असूं नये. तिनें जर तिच्या दागिन्यांचा विमा उत-रवला असला तर ते कुणीं चोरले तर बरें होईल असें मला वाटतें.'

'छान ! तुझ्या मालकीचे जर ते दागिने असते तर तूं असें म्हणाली नस-तीस.' रमेश म्हणाला.

त्या रात्रीं दहा वाजतां ते श्रीमती रावराजेच्या बंगल्यांत गेले. बारा वाजे-पर्यंत सर्व पाहुणे जमा झाले होते आणि मेजवानीच्या कार्यक्रमाला रंग भरूं लागला होता. पाहुण्यांच्या करमणुकीसाठीं नर्तकी, गायक-वादक बोलाविण्यांत आले होते. बरीच बडी मंडळी तेथें जमा झाली होती. यजमानिणीनें खूप अलंकार घातले होते. पण तिच्या बोटांत ती अपूर्व पाचूची अंगठी नव्हती.

चंद्रवदन हळूंच इतरांपासून दूर झाला. त्याला तिजोरी कुठें असावी तें शोधून काढावयाचें होतें. ती जुन्या पद्धतीची असावी, आणि बऱ्याच मोठ्या आकाराची असावी असा त्याचा तर्क होता. पण तो निरनिराळ्या निमित्तानें तेथल्या सर्व दालनांतून हिंडला असतांनाहि ती तिजोरी कुठें दिसली नव्हती.

शेवटीं त्यानें ती तिजोरी श्रीमतीच्या शय्यागृहाच्या दिवाणखान्यांत कुठें तरी दडविली असावी असा तर्क केला. आणि या खेपेला कसून तपासणी कर-ण्याच्या इरादानें तो त्या दिवाणखान्यांत गेला होता. त्यानें तिन्ही बाजूच्या भिंती तपासल्या. तेथले फोटो, आरसे सरकवून पाहिले. पण त्याला कुठेंहि गुप्त जागा आढळली नाहीं.

चौथ्या बाजूला पुस्तकांचीं कपाटें होतीं. तीं पुस्तकें नेहमीं वापरण्यांत येत असावी असें दिसत नव्हतें. त्या कपाटांतच कुठेंतरी कांहीं युक्तीनें ती तिजोरी दडविली असावी असें त्याला वाटलें. पण अतिशय कसोशीनें तपासणी करू-नहि त्याची निराशाच झाली.

त्या बंगल्यांत ती एकच जागा अशी होती कीं तेथें तिजोरी असण्याचा संभव होता. आणि ती जर तेथें नसली तर त्याला ती पाचूची अंगठी हस्तगत करण्याचा नाद सोडावा लागणार होता. त्यानें पुन्हां एकदां प्रयत्न केला, आणि राहिलेला वेळ मेजवानीच्या कार्यक्रमांत घालविण्याच्या इरादानें तो तेथून निघून जाण्यासाठीं वळला. पण त्याच्या पहाणींत कांहींतरी दोष होता असें

त्याचें मन सुचवूं लागलें आणि तो पुन्हां मागें वळला.

त्याची चूक त्याच्या लक्षांत आली होती. त्यानें तेथल्या भिंती, कपाटें तपासलीं होतीं. पण तेथल्या दारांची तपासणी करण्यांत आली नव्हती. तेथल्या बहुतेक दाराखालच्या फटींतून पलीकडच्या दिव्यांचा प्रकाश डोकावत होता. फक्त एकच दार असें होतें कीं जेथें प्रकाशाचा संपूर्ण अभाव होता.

चंद्रवदन त्या दाराजवळ गेला तेव्हां तें बंद आहे असें आढळून आलें पांच मिनिटांत त्यानें तें दार उघडलें. नंतर ती किल्ली आपल्या कमरपट्ट्यांत ठेवून त्यानें आपले हात चोळण्यास सुरुवात केली होती. दाराला पाठ टेकून आणि उजव्या हातांत सिगारेट धरून तो उभा होता. आणि डाव्या हस्तानें त्यानें तें दार उघडण्याचा प्रयत्न केला होता त्यामुळें त्याला पांच मिनिटांचा अवधि लागला होता आणि तो हातहि दमला होता.

तें दार उघडतांच त्यानें तेथें असलेली ती अवाढव्य तिजोरी पाहिली. आणि तो आनंदानें हंसला. मेजवानीचा कार्यक्रम ऐन रंगांत असतांना तिजोरी उघडण्याचें धाडस करणें योग्य नव्हतें. सर्व पाहुणे थकल्यानंतर तो पुन्हां दिवाणखान्यांत येणार होता.

'तुम्हीं इतका वेळ गेला होतां कुठें ?' सुशीनें त्याला विचारलें, 'तुम्हांला एखादी मैत्रीण लाभली असावी असा तुमचा चेहरा दिसतो.'

तो हंसून म्हणाला, 'तसेंच कांहींतरी आहे खरें.'

पहाटेचे चार वाजले. अद्याप पाहुण्यांची निघून जाण्याची इच्छा नव्हती. पण आतां त्यांतील बहुतेक थकले होते आणि पेयपान करण्यांत गढले होते. ती संधि साधून चंद्रवदन पुन्हां मेजवानीच्या जागेंतून बाहेर पडला.

तो दिवाणखान्याकडे जात असतांना तेथूनच कुणीतरी स्त्रीनें फोडलेली किंकाळी ऐकूं आली. चंद्रवदन आणि दोघे-तिघे पाहुणे दिवाणखान्याकडे धांवले. मध्यभागीं एक मोलकरीण बसली होती आणि ती किंचाळत होती.

'तुला असें झालें आहे तरी काय ?' एका पाहुण्यानें विचारलें.

'बाईसाहेबांची तिजोरी — दागिने — चोर —'

तिजोरीच्या छोट्या खोलीचें दार सताड उघडें होतें. त्याचवेळीं श्रीमती रावराजे धांवतच तेथें आली होती. तिनें फक्त एकदांच तिजोरींत डोकावलें आणि ती मोठ्यानें ओरडली.

'माझी अंगठी ! माझी पाचूची अंगठी ! कुणीतरी चोरली !' ती ओरडून म्हणाली आणि त्याबरोबरच बेशुद्ध झाली.

'चंद्रवदन, तुझ्यासारख्या रहस्यकथा लेखकाला या प्रकारामुळें चांगलेंच खाद्य मिळालें असणार.' रमेश बोलत होता. चंद्रवदन तें ऐकण्याऐवजीं तेथून सुमारें तीस फुटांवर असलेल्या एका पाहुणीकडे पहाण्यांत दंग झाला होता.

'चंद्रवदन, ती सुंदर आहे खरी, पण ती येलीं पांच मिनिटें तुझ्याबरोबर

बोलत आहें आणि तूं माझ्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहींस.'

'माफ कर मित्रा, पण तूं काय बोलत होतास ?' चंद्रवदनानें विचारलें.

पण या खेपेलाहि त्याला आपल्या मित्राचें बोलणें ऐकूं गेलें नव्हतें. कारण त्यानें जी स्त्री पाहिली होती ती कृष्णाकुमारी होती.

कृष्णाकुमारी ! या खेपेला तिनें निराळीच केशरचना केली होती. केसांचा रंगहि बदलला होता. त्यामुळें ती थोडी वेगळीच दिसत होती. पण चंद्रवदन तिला ओळखूं शकत होता आणि तिनेंहि त्याला ओळखलें होतें.

कृष्णाकुमारी ! राजा धनराजगिरीजीच्या तिजोरीतील माणकांचा हार पळवून बहिरी ससाणा आणि काळापहाड या दोघांवरहि मात करणारी कृष्णाकुमारी ! एक क्षणीं ती सौंदर्याची नाजूक पुतळी बनत असे तर दुसऱ्या क्षणीं कठोर कृत्येंत तिचें रूपांतर होत असे !

पण आतां तिच्या नजरेंत भीतीची अस्पष्ट छाया दिसत होती. कां ? त्यानें स्वतःला विचारलें. त्या प्रश्नाचें उत्तर फार दूर नव्हतें. कृष्णाकुमारीनें यावेळींहि त्याच्यावर मात करून श्रीमती रावराजेच्या तिजोरींतील पाचूची अंगठी हस्तगत केली होती.

थोड्याच वेळांत पोलीस तेथें आले. त्यांनीं पाहुण्यांना प्रश्न विचारले. पोलिसांनीं आपणांबरोबर दोन स्त्रियाहि आणल्या होत्या आणि त्या बंगल्या-भोंवतीं पहाराहि बसविला होता. पोलिसांची नजर चुकवून तेथून एक पांख-रूहि बाहेर पडूं शकलें नसतें.

एका तासानंतर सर्व पाहुण्यांना यजमानीच्या विस्तीर्ण दिवाणखान्यांत एकत्र करण्यांत आलें आणि त्या सर्वांची कसून झडती घेण्यांत आली. स्त्रियांची झडती घेण्याचें काम पोलिसांनीं बरोबर आणलेल्या त्या दोन स्त्रियांवर सोंपविण्यांत आलें होतें. पण त्यांतूनहि कांहीं निष्पन्न झालें नाहीं. ती मौल्यवान पाचूची अंगठी अदृश्य झाली होती.

यजमानिणीनें एकाहि पाहुण्याचा निरोप घेतला नव्हता. डोकें दुखत असल्यामुळें तिनें स्वतःला आपल्या शय्यागृहांत कोंडून घेतलें होतें. तो बंगला तपासण्यासाठीं कांहीं माणसें मागें ठेवून पोलीस अधिकारीहि निघून गेले होते.

सर्वांआधीं चंद्रवदन तेथून बाहेर पडला होता. आपण तेथून जात आहोंत असें त्यानें रमेशला सांगितलें नव्हतें. पण बाहेर पडून तो रमेशच्याच मोटा-रींत बसला होता.

त्याच्या मागोमागच कृष्णाकुमारी बाहेर पडली होती. ती सरळ पलीकडच्या बाजूला उभ्या करण्यांत आलेल्या मोटारीकडे गेली होती. तिनें मोटार सुरू करतांच चंद्रवदनानें रमेशच्या मोटारीनें तिचा पाठलाग केला. ती कोणत्या हॉटेलांत उतरली आहे हें पाहून तो रावराजेच्या वाड्याकडे परतला.

'चंद्रवदन, तूं गेला होतास तरी कुठें ?' अर्थातच तूं आम्हांला तेथेंच

उभें करून आमच्याच मोटारीनें फिरावयास गेला होतास ही गोष्ट चांगलीच आहे.' रमेश म्हणाला. 'पण सुदैवानें जर तूंहि नाहींसा झाला आहेस हें शोधून काढलें नसतें तर मोटार चोरीस गेली अशी मीं पोलिसांकडे तक्रार केली असती आणि त्या गुन्ह्याबद्दल पोर्तुगीज पोलिसांनीं तुला खात्रीनें तुरुंगांत टाकलें असतें.'

रमेशला राग आला होता. पण चंद्रवदनानें आपण कुठें गेलों होतों तें त्याला सांगितलें नाहीं. दिवस उजाडतांच तो आधीं पाहून ठेवलेल्या हॉटेलांत गेला आणि त्यानें कृष्णाकुमारीची चौकशी केली.

'साहेब, क्षमा करा, पण त्या नांवाची कुणी बाई आमच्या हॉटेलांत रहातच नाहीं.' तेथला कारकून म्हणाला.

'नांवाच्या बाबतींत माझी कदाचित् चूक होत असेल.' चंद्रवदन म्हणाला. 'पण माझी मैत्रीण येथेंच रहाते अशी माझी पूर्ण खात्री आहे. गेल्या रात्रीं मींच तिला या हॉटेलांपर्यंत पोहोंचविलें.'

'पण साहेब, आमच्याकडे त्या रहात नाहींत. वाटल्यास तुम्हीं आमचें रजिस्टर पहा. एकहि महाराष्ट्रीय स्त्री येथें रहात नाहीं.' तो म्हणाला.

चंद्रवदनानें कृष्णाकुमारीचें वर्णन सांगितलें तरीहि कारकुनानें नंदीबैलाप्रमाणें मान हलविली. कृष्णाकुमारी अशा प्रकारचा शह देईल अशी त्याला भीति वाटतच होती. आपला पाठलाग करण्यांत येत आहे हें तिनें ओळखलें होतें. कारण तिनें हॉटेलाच्या आवारांत मोटार नेल्यानंतर तो तेथून निघून जाईपर्यंत ती आपल्या मोटारींतच थांबली होती. ती बहुधा त्यानंतर मोटार वळवून दुसरीकडे गेली असावी. पण तसें जर झालें तर रात्रपाळीचा पहारेकरी ती कोणत्या दिशेनें गेली हें सांगूं शकेल असें त्याला वाटलें.

'मला तुमच्या रात्रपाळीच्या पहारेकऱ्याला भेटावयाचें आहे.' तो त्या कारकुनाला म्हणाला.

'माफ करा साहेब. पण मी यावेळीं त्या पहारेकऱ्याला बोलावूं शकत नाहीं.' तो म्हणाला.

कारकुनाचें तें वाक्य ऐकतांच चंद्रवदनानें त्याच्याकडे रोखून पाहिलें. कारकुनाला माहिती असावी, पण तो ती आपणांपासून हेतुपुरस्सर दडवीत आहे, असें त्याला वाटलें.

'तुला तोंड बंद ठेवण्यासाठीं तिनें किती पैसे दिले आहेत?' 'साहेब, मला हें तुमचें बोलणें समजत नाहीं.' तो कारकून रागानें म्हणाला, 'तुम्हांला इतर बाबतींत कांहीं विचारायचें नसलें तर तुम्हीं येथून निघून जाणें चांगलें. मला खूप काम आहे.'

चंद्रवदन कांहीं बोलला नाहीं. त्यानें शंभराच्या दोन नोटा काढून कारकुनासमोरच्या टेबलावर ठेवल्या. कारकुनानें आपल्या ओंठांवरून जीभ फिर-

विली. त्याची नजर त्या दोन नोटांवर स्थिर झाली होती.

एकाएकी आपली मान पुढें करून तो डोळे मिचकावीत म्हणाला, 'साहेब, त्या बाईसाहेब फार उदार होत्या. त्यांनीं मला आणि जेकबला मिळून पांचशें रुपये दिले आणि तुमच्यासारखें कुणी चौकशीकरितां आलें तर कांहींहि माहिती द्यावयाची नाहीं असें आम्हांला बजावलें.'

कृष्णाकुमारी त्या सामान्य माणसांना पांचशें रुपये कधींच द्यायची नाहीं हें ओळखून चंद्रवदन म्हणाला, 'मीं फक्त तुलाच दोनशें रुपये देत आहें.'

'पण जकबलाहि पैसे द्यावे लागतील.' कारकून म्हणाला.

चंद्रवदन किंचित् हंसून म्हणाला, 'तर मग मी तुमच्या मॅनेजरांना भेटून जेकबचा पत्ता मिळवितों आणि त्याला त्याच्या हिश्श्याचे अडीचशें रुपये तुझ्याकडून घेण्यास सांगतों.'

चंद्रवदनानें अंधारांत बाण सोडला होता. पण तो वर्मी लागला हें कारकुनाच्या वेडयावांकडया झालेल्या चर्येवरून त्यानें ओळखलें. कृष्णाकुमारीनें जे कांहीं पैसे दिले होते ते त्या कारकुनानेंच खिशांत घालून पहारेकऱ्याला एकदोन रुपये देऊनच खूष केले असावें हा त्याचा तर्कच खरा ठरला होता.

'यावेळीं त्या बाईसाहेब मुरगांवला गाडींत बसत असतील.' तो कारकून म्हणाला आणि त्यानें त्या नोटा उचलण्यासाठीं आपला हात पुढें केला.

चंद्रवदनानें त्या नोटा हातांत घेऊन विचारलें, 'गाडी केव्हां सुटते?'

'आतां इतक्यांत सुटली असेल. पण साहेब, तुम्हांला जर ती गाडी गांठायची असली तर मी एक युक्ति सांगतों.' कारकून चंद्रवदनाच्या हातांतील नोटांकडे आशाळभूतपणें पहात म्हणाला, 'जर तुम्हीं आतां मोटारनें मडगांव येथें गेलां तर तुम्हांला तीच गाडी पकडतां येईल. मडगांव येथें गाडी सुमारें वीस मिनिटें थांबते.'

चंद्रवदनानें लागलींच विचार केला. कारकुनाच्या बोलण्यांत बरेंच तथ्य होतें आणि बाहेर त्याची मोटारहि उभी होती. त्यानें त्या दोन नोटा कारकुनाच्या स्वाधीन केल्या आणि तो तेथून वेगानें निघाला. त्याची मोटार जेव्हां मडगांव स्टेशनाच्या आवारांत शिरली त्यावेळीं मुरगांवहून आलेली गाडी उभीच होती. त्यानें मोटार तेथेंच ठेवून पहिल्या वर्गाचें तिकीट काढलें. कृष्णाकुमारी त्याच वर्गांतून प्रवास करील अशी त्याची खात्री होती.

गाडी सुटायला आणखी दोन–तीन मिनिटांचा अवधि होता. चंद्रवदन प्रत्येक डब्यांत डोकावून पहात होता. पुढच्या बाजूच्या एका डब्यांत फक्त तीनच प्रवासी होते. एक कृष्णाकुमारी आणि दुसरा ज्यानें त्याच्यावर हल्ला झाला त्यावेळीं चौकशी केली होती तो इन्स्पेक्टर होता.

३

त्या डब्यांत प्रवेश करण्यापूर्वी चंद्रवदन क्षणभर थांबला. कारण त्याच्या मनांत अनेक प्रश्न निर्माण झाले होते. तो इन्स्पेक्टर त्या ठिकाणीं काय करीत होता ? तो केवळ योगायोग म्हणावा काय ? तो इन्स्पेक्टर त्यावेळीं साध्या वेषांत होता आणि कृष्णाकुमारीला हें माहीत असणें शक्य नव्हतें. कारण त्यानें रावराजेंच्या बंगल्यांतील तपासणींत भाग घेतला नव्हता.

यावेळीं तो इन्स्पेक्टर बांकावर झोंपला होता. त्यावरून कृष्णाकुमारीवर बहुधा पोलिसांचा संशय असावा, असेंहि म्हणतां आलें असतें. त्यानंतर चंद्र-वदन हंसतच डब्यांत शिरला.

कृष्णाकुमारी त्याच्याकडे पाहून हंसली. तिनें त्याला प्लॅटफॉर्मवर फिर-तांना पाहिलें असावें आणि त्याला टाळणें शक्य नसल्यामुळें ती आतां आलेल्या प्रसंगाला तोंड देण्यास सज्ज झाली असावी असें दिसलें.

त्यावेळीं इन्स्पेक्टरनें डोळे उघडले आणि ते म्हणाले, ' कोण चंद्रवदन ? तुमची प्रकृति आतां बरी आहे ना ? तुम्हांला लुबाडणाऱ्या त्या बाईला आणि तिच्या साथीदारांना पकडण्याचा आम्हीं प्रयत्न केला, पण त्यांत आम्हांला यश आलें नाहीं. '

चंद्रवदन तिरक्या नजरेनें कृष्णाकुमारीकडे पहात होता. त्या माणसाचें बोलणें ऐकून ती दचकली, हें त्यानें पाहिलें. आपला जोडीदार पोलीस अधिकारी आहे हें तिला माहीत नव्हतें !

' तुम्हीं मुंबईला जाणार काय ?' इन्स्पेक्टरांनीं चंद्रवदनाला विचारलें.

' इतक्यांत नाहीं. मला माझ्या एका मित्राची तार आल्यामुळे आणि त्याचें काम महत्त्वाचें असल्यामुळें मी कुठें येथें जाणार आहें. पण इन्स्पेक्टर साहेब, या अचानक कराव्या लागलेल्या धांवपळीमुळें माझी थोडी पंचाईत झाली आहे. मडगांव स्टेशनच्या आवारांतच मला माझी मोटार सोडावी लागली आहे.

' तुम्ही त्याबद्दल चिंता करूं नका. हें माझें कार्ड घ्या आणि पुढल्या स्टेशनवरून मडगांव स्टेशनमास्तरला टेलिफोन करून माझें नांव सांगा म्हणजे तो तुमच्या गैरहजेरींत तुमच्या मोटारीची व्यवस्था करील. '

इन्स्पेक्टरचे चंद्रवदनानें आभार मानले. पण त्याबरोबरच ते कृष्णाकुमारीला एकटीलाच डब्यांत सोडून गाडींतून खालीं उतरण्यास तयार नाहींत हेंहि त्याच्या लक्षांत आलें. पोलिसांना कांहीं कारणामुळें कृष्णाकुमारीचा संशय आला होता ही गोष्ट आतां अधिकच स्पष्ट झाली होती.

' चंद्रवदन, तुमची या ठिकाणीं भेट झाली हें मोठें नवलच म्हणावयाचें ! ' कृष्णाकुमारी उपरोधिकपणें आणि त्या पोर्तुगीज इन्स्पेक्टरला कळूं नय

म्हणून स्वच्छ मराठींत म्हणाली.

'होय, पण कृष्णाकुमारी, तुझें ठीक चाललें आहे ना? तुझी मला अनेकदां आठवण झाली होती. गोव्यांत तूं खूप गंमत केली असशील?'

'गोव्यांत खूप गंमत करायला माणसाजवळ खूप पैसे लागतात आणि ते माझ्याजवळ नव्हते.' ती म्हणाली.

चंद्रवदन हंसला. त्यानें त्या इन्स्पेक्टरांना सिगारेट दिली. त्यांनीं ती घेतली. त्यानंतर अर्ध्या मिनिटानें कृष्णाकुमारी तेथल्या बाथरूमकडे गेली.

'चंद्रवदन, मी थोडेंसें खाजगी विचारतों. त्याबद्दल मला क्षमा करा.' इन्स्पेक्टर हळक्या आवाजांत घाईघाईनें म्हणाले, 'या बाईंना तुम्हीं चांगल्या प्रकारें ओळखतां काय?'

'तसें म्हणतां येणार नाहीं.' चंद्रवदन म्हणाला, 'कारण गेल्या रात्रींच रावराजेच्या मेजवानीच्या वेळीं हिची आणि माझी ओळख करून दिली. तुमच्या गोव्यांत चार दिवस मजेंत घालविण्यासाठीं आलों आणि दोन दिवसांच्या अवधींत दोन चोरीच्या प्रकरणांत सांपडलों.'

'पण तुम्ही मला या बाईबद्दल कांहीं सांगूं शकाल काय?' इन्स्पेक्टरांनीं विचारलें.

'कांहीं विशेष सांगता येणार नाहीं.' चंद्रवदन म्हणाला, 'कारण गेल्या रात्रीं तिची माझी ओळख झाली त्यामुळें आमचें विशेष बोलणें हि झालें नाहीं. पण तुम्हांला तिचा संशय आलेला दिसतो.'

'चंद्रवदन, याबाबत मला कांहीं सांगतां येणार नाहीं. पण तुम्हीं जर माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दिलींत तर मी तुमचा अतिशय आभारी होईन.' इन्स्पेक्टर म्हणाले.

'तुम्हांला मदत करण्यांत मला आनंदच वाटेल.' चंद्रवदनानें उत्तर दिलें.

'तर मग मी तुम्हांला थोडें विश्वासांत घेतों.' अधिकारी म्हणाले, 'रावराजेच्या घरीं चोरीचा तपास करतांना आम्हांला असें समजलें कीं, श्रीमतीबाईंच्या मोलकरणीनें ती उघडी तिजोरी पहाण्यापूर्वीं त्याच खोलींतून कोणीतरी बाई झपाट्यानें बाहेर पडली होती. त्या बाईचें वर्णन जरी आम्हांला समजलें नव्हतें तरी तिची साडी हिरव्या रंगाची होती, असें सिद्ध झालें होतें.

'त्या रात्रीं हिरव्या रंगाच्या साड्या परिधान करणाऱ्या फक्त दोनच स्त्रिया तेथें होत्या. एक खुद्द श्रीमतीबाई आणि दुसऱ्या या बाईसाहेब, त्यानंतर यांनीं जेव्हां ताबडतोब गोवें सोडण्याची तयारी केली तेव्हां आम्हांला साहजिकच त्यांच्याबद्दल संशय आला. मुरगांव स्टेशनवर यांचें बाकीचें सामान मुद्दाम गार्डाच्या डब्यांत ठेवण्यांत आलें आणि त्या सामानाची आतां तपासणी चालू असेल.

'मला आतां या बाईची पर्स तपासावयाची आहे. तिनें ती आपल्या

बरोबर मेळली नाहीं हें फार चांगलें झालें आहे. तुम्ही जर बाथरूमच्या दारावर नजर ठेवाल तर मी तेवढ्या अवधींत माझें काम आटोपतों—

'चंद्रवदन, जर ती स्त्री निरपराधी असली तर आम्ही तिची आणि तुमची क्षमा मागूं.' इन्स्पेक्टर म्हणाले, 'तुम्हीं आतां त्या पलीकडच्या खिडकीजवळ उभे रहा आणि बाथरूमच्या दारावर नजर ठेवा. जर ती तुम्हांला येथें यतांना दिसली तर तुम्ही मला ताबडतोब इषारा करा.'

चंद्रवदन खिडकीजवळ जाऊन उभा राहिला. त्याला तेथून थोड्या अंतरावर असलेलें बाथरूमचें दार दिसत होतें आणि तेथल्या एका खिडकीच्या रंगीत कांचेंतून इन्स्पेक्टरांच्या हालचालींचें प्रतिबिंब दिसत होतें.

इन्स्पेक्टरांनीं थोड्याच वेळांत पर्समधील वस्तूंची तपासणी केली. त्यांत त्यांना मराठींत लिहिलेलें एक लहानसें पत्र मिळालें होतें.

ते घाईघाईनें चंद्रवदनाकडे आले आणि म्हणाले, 'तुम्ही मला या पत्राचें इंग्रजींत भाषांतर करून सांगाल काय ?'

चंद्रवदनानें तें पत्र वाचलें. त्या पत्रावर मुंबईतील एका क्लबचा पत्ता छापलेला होता. त्यांत लिहिलें होतें—

'तुझें पत्र मला मिळालें, पण प्रत्यक्ष भेट झाल्याशिवाय मी कोणतेंहि वचन देऊं शकत नाहीं. कदाचित् आपणांला कांहीं करार करणें शक्य होईल तूं क्लबमध्यें येऊन माझें नांव सांगितलेंस तर माझा माणूस तुझी-माझी गांठ घालून देईल. पण लक्षांत ठेव, या खेपेला कांहीं लबाडी करतां कामा नये.'

'हें तिच्या क्लबच्या सभासदत्वाबद्दलचें पत्र दिसतें.' चंद्रवदन म्हणाला. तें ऐकून इन्स्पेक्टरचें समाधान झालें. त्यानें तें पत्र पर्समध्यें ठेवून ी पूर्ववत् व्यवस्थित ठेवली.

'जर तिच्याजवळ ती असली तर ती अतिशय धूर्त आहे, असें म्हणावें लागेल.' इन्स्पेक्टर स्वतःशींच पुटपुटले.

चंद्रवदनहि त्वरेनें विचार करीत होता. कृष्णाकुमारीजवळ ती पांचूची अंगठी आहे अशी त्याची खात्री होती. गार्डाच्या डब्यांत ठेवलेल्या तिच्या सामानांत ती खचित नसावी; कारण तसें असतें तर कृष्णाकुमारी इतकी शांत बसली नसती. ती तिच्या पर्समध्येंहि नव्हती तर मग तिनें ती स्वतःच्या अंगावरच कुठेंतरी लपविली असावी.

पण कुठें ? आणि ती मिळवायची कशी ? त्याला स्वतःकरितां ती अंगठी हवी होती. तशीच वेळ आली तर आपण तिच्या हिताच्या दृष्टीनें ती काढून घेतली असें त्याला म्हणता येत होतें.

आणखीं पांच मिनिटांनीं कृष्णाकुमारी परत आली आणि तिनें हंसत विचारलें, 'तुमचें लेखन कसें चाललें आहे ?'

'तुझ्यावर नजर ठेवण्यांत आली आहे. तुझें सर्व सामान तपासण्यांत येत

आहे हें तुझ्या लक्षांत आलें आहे काय ?' त्यानें घाईघाईनें विचारलें, 'या आपल्या मित्राला मराठी समजत नाहीं.'

'मला संशय आला होता.' ती बेफिकीरीनें म्हणाली, 'पण...पण ही काय भानगड आहे ?'

'त्यांना पाचूची अंगठी हवी आहे.'

'पण त्यांना माझा संशय कां ?' तिनें विचारलें.

'कारण तूं त्या रात्रीं हिरव्या रंगाची साडी परिधान केली होतीस.'

आपण तिच्याबरोबर जास्त बोलत राहिल्यास इन्स्पेक्टरांना संशय येईल या विचारानें चंद्रवदन त्याच्याकडे वळून इंग्रजींत म्हणाला 'ती माझ्या पुस्तकाबद्दल चौकशी करीत होती. तिनें माझीं एक दोन पुस्तकें वाचलीं असा-वीत असें दिसतें.'

'ती गल्या रात्रीबद्दल कांहीं म्हणाली काय ?'

'नाहीं. कांहींच नाहीं.' चंद्रवदन म्हणाला.

'तुम्हीं तो विषय मात्र मुळींच काढूं नका.' इन्स्पेक्टरांनीं सूचना दिली, 'तुम्ही तिच्याबरोबर बोलावयास हरकत नाहीं. मलाहि थोडा विचार करावयाचा आहे.'

'त्यानें कपाळावर आंठ्या कां चढविल्या ?' कृष्णाकुमारीनें विचारलें.

'तूं त्या अंगठीबद्दल कांहीं बोललीस काय असें तो विचारीत होता.'

'तर मग ती अंगठी माझ्याजवळ असावी अशी त्याची समजूत दिसते. निदान तुम्ही तरी तसें समजण्याचा मूर्खपणा खचित करणार नाहीं.' ती म्हणाली, 'रावराजेंची तिजोरी फक्त तुम्हीच उघडूं शकलां असतां आणि तुम्ही तेथें हजरहि होता. तुम्ही त्या अंगठीसाठींच तेथें गेलां होतां ना ?

'होय. मीं त्या तिजोरीच्या खोलीचें दार उघडलें होतें.'

'अस्सें ! तरीच तें उघडें होतें–' ती अचानक थांबली. आपण भलतेंच बोलून गेलों हें तिच्या लक्षांत आलें होतें. पण नंतर ती हसली. 'होय, मीच ती अंगठी काढून घेतली आणि मी ती कुणाला देणार नाहीं.'

'कुळें स्टेशनावर सर्व प्रवाशांची झडती घेण्यांत येते. त्यावेळीं तुझीहि कसून झडती घेण्यांत येईल.' तो म्हणाला.

'मला त्या झडतीची भीति वाटत नाहीं.' ती बेफिकीरीनें म्हणाली.

त्यानंतर तो इन्स्पेक्टरबरोबर बोलूं लागला. कांहीं वेळानें मधलेंच स्टेशन आलें तेथें उतरून त्यानें वडगांवच्या स्टेशनमास्तरला आपल्या मोटारीसंबंधीं टेलिफोन केला.

गाडीचा प्रवास सुरू झाल्यानंतर ते तिघेहि आपापल्या विचारांत गढले होते. एवढ्यांतच कुळें स्टेशन येणार होतें. चंद्रवदन विचार करीत होता कीं, कृष्णाकुमारीनें ती अंगठी कुठें दडविली असावी ? तिची अगदीं कसून तपा-

क्षणी वरण्यांत आली तरी ती अंगठी सांपडणार नाहीं अशी तिची खात्री दिसत होती. त्याअर्थी तिनें ती कपड्यांत दडविली नसावी हें स्पष्टच होतें. त्याचप्रमाणें ती आपल्या जोड्यांत लपविण्याचा प्रयत्न करणार नव्हती.

त्याचें लक्ष तिच्या केशरचनेकडे गेलें. बाथरूममध्यें गेल्यानंतर तिनें आपले केंस पुन्हां विंचरले होते. चंद्रवदन पुन्हां आळस देत उभा राहिला. गाडीच्या धक्क्यामुळें त्याचा तोल गेला. आधारासाठीं त्यानें आपला हात पार्टिशनला टेंकण्याचा प्रयत्न केला, पण तो तेथून सरकून कृष्णाकुमारीच्या डोक्यावर पडला. एका क्षणांत त्यानें तो उचलला आणि तिची क्षमा मागितली.

'चंद्रवदन, मुकाट्यानें माझी वस्तु परत द्या.' ती रागानें म्हणाली.

'असें वेड्यासारखें कांहींतरी बोलूं नकोस. आपल्या मित्राला संशय येईल.' तो हंसून म्हणाला.

'पाजी माणूस!' ती रागानें म्हणाली, पण लागलींच शांत झाली.

चंद्रवदनाच्या हाताचा धक्का लागल्यामुळें तिला राग आला असावा अशी इन्स्पेक्टरांची समजूत झाली आणि ते हंसले. चंद्रवदनहि हंसत होता. कारण त्यानें कोटाच्या खिशांत खुपसलेल्या त्याच्या डाव्या हातांत ती मौल्यवान पाचूंची अंगठी होती.

० ० ० ०

मुंबईंत आल्यानंतर चंद्रवदनानें आपल्या लेखनास प्रारंभ केला होता. सकाळपासून तो लिहीत बसला होता. बाबाजीनें हांक मारतांच त्यानें भोजन उरकलें आणि त्यानंतर तो पुन्हां तीन तास लिहावयास बसला होता.

त्या संध्याकाळींच त्यानें कृष्णाकुमारीच्या पत्रांत उल्लेखिलेल्या क्लबला भेट देण्याचें ठरविलें होतें. त्या पत्राचें त्याला कुतूहल वाटत होतें पत्रांतील मजकुराला त्रास येत होता. आपणांला कांहीं करार करतां येईल पण पुन्हां लबाडी करतां कामा नये, असें कुणीतरी कृष्णाकुमारीला बजावलें होतें.

चंद्रवदनानें तो क्लब शोधून काढला ती दोन मजली इमारत होती. आंत शिरतांच त्याला बाहेरच्या लहानशा खोलींत एक टायपिस्ट काम करीत असलेली दिसली. काम पुरें केल्यानंतर तिनें त्याच्याकडे मान वर करून पाहिलें.

'क्लब किती वाजतां उघडतो तें मला समजल काय?' त्यानें विचारलें.

'रात्रीं दहा वाजल्यापासून पहाटे चार वाजेपर्यंत उघडा असतो.' ती कंटाळलेल्या सुरांत म्हणाली.

'प्रवेश मिळण्यास सभासद व्हावें लागतें काय?' चंद्रवदनानें विचारलें.

'होय साहेब, क्लबच्या सभासदांपैकींच कुणीतरी तुमचें नांव सुचविलें पाहिजे आणि दुसऱ्यानें त्याला पुष्टि जोडली पाहिजे' ती म्हणाली.

'ही मोठी भानगड आहे म्हणायची.' चंद्रवदन म्हणाला, 'या क्लबचा कुणीहि सभासद माझ्या ओळखीचा नाहीं. माझा एक मित्र कुणाचा तरी

पाहुणा म्हणून येथें आला होता आणि त्यानें हा क्लब फार चांगला आहे असें मला सांगितलें.'

तिनें त्याच्याकडे पाहिलें. त्याचा रुबाबदार आणि हंसरा चेहरा पाहून तिच्या वर चांगला परिणाम झाला होता. ती म्हणाली, 'जरा थांबा, मी आमच्या व्यवस्थापकांना विचारतें.'

ती आंत गेली आणि थोड्याच वेळांत एक भडक पोषाख केलेल्या गृहस्था बरोबर परत आली.

'मला आमच्या टायपिस्टकडून असें समजलें कीं, तुम्हांला सभासद व्हावयाचें आहे. पण येथें कुणीहि तुमच्या ओळखीचें नाहीं. तुमचें नांव काय?'

'माझें नांव चंद्रवदन.'

'रहस्यकथा लेखक चंद्रवदन तर नाहीं ना?'

'होय, मीच तो!'

व्यवस्थापकाची चर्या एकदम बदलली. तो म्हणाला, 'तर मग साहेब, मी तुमची व्यवस्था करूं शकतों. तुम्ही जर पन्नास रुपये भरले तर मी सभासदाच्या पटावर तुमचें नांव लिहितों. आज रात्रीं मीं तुमच्यासाठीं खास टेबलाची व्यवस्था करावी काय?'

'करतां आली तर पहा, मी आज रात्रीं येणार आहे.'

'विश्राम' क्लबचा सभासद होऊनच चंद्रवदन येथून बाहेर पडला. त्याच्या बिऱ्हाडापासून तो क्लब विशेष दूर नव्हता. आज रात्रीं त्या क्लबमध्यें झटापट होण्याचा संभव होता. पण कृष्णाकुमारी किंवा तो पत्रलेखक त्या रात्रीं भेटेलच अशी शाश्वती नव्हती.

त्या रात्रीं तो वेळेवर क्लबमध्यें हजर झाला. ती जागा आणि तेथलें सभासद मुंबईंतील इतर क्लबप्रमाणेंच होते. प्रवेशद्वार सोडल्यास तळमजल्यावर आणखी चार दारें होतीं. त्यांतील दोन दारांमधून सभासद जात येत होते. एका दाराचा क्लबचे नोकर उपयोग करीत होते. चौथें दार फक्त एकदांच उघडलें गेलें होतें. त्यावेळीं ज्या माणसानें त्या दाराचा उपयोग केला होता, त्याच्या रुबाबावरून तो त्या क्लबचा मुख्य मॅनेजर असावा असा चंद्रवदनानें तर्क केला होता.

क्लबमध्यें कृष्णाकुमारीची आणि आपली भेट व्हायची असली तर ती त्याच खोलींत होऊं शकेल असा त्यानें अंदाज केला. लवकरच त्याला संधि मिळाली. इतरांचें लक्ष नाहीं असें पाहून त्यानें बेधडक आंत प्रवेश केला.

समोर उजव्या बाजूला आणखी एक दार होतें. आंत वरच्या मजल्याकडे जाणारा जिना होता. चंद्रवदन त्या जिन्यानें वर गेला तेव्हां त्याला जिन्याजवळच एक दार दिसलें. कांहीं अंतरावर आणखी दोन दारें होतीं.

तो जेथें उभा होता त्या खोलींत कसलाहि आवाज होत नव्हता. म्हणून

तो मुळींच पावलें न वाजवितां पुढल्या दाराकडे गेला. तो जेव्हां आपल्या उजव्या बाजूच्या दाराजवळ पोहोंचला तेव्हां त्याला आंतल्या मंडळींच्या बोलण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला.

जो माणूस बोलत होता त्याचें बोलणें तर अस्पष्ट ऐकूं येत होतें, पण चंद्रवदनानें त्या आवाजावरून त्याला स्पष्ट ओळखलें होतें. चंद्रवदन त्या दाराकडे टक लावून पहात राहिला नंतर हंसला. तो बोलणारा माणूस दुसरा कुणी नसून पंढरीनाथ ऊर्फ बहिरी ससाणा होता.

'अरे देवा !' चंद्रवदन म्हणाला, 'असें आहे तर ?' आगगाडींत त्याला वाचावयास मिळालेलें तें पत्र पंढरीनाथानेंच कृष्णाकुमारीला लिहिलें होतें ! काळापहाडचा चौर्यकर्मांत पहिला नंबर लागत असला तर बहिरी ससाण्याला त्याच्या बरोबरचा किंवा फार तर दुसरा नंबर द्यावा लागला असता.

त्यानें तें दार हळूंच किंचित् उघडलें त्यामुळें त्याला आंतील प्रत्येक शब्द ऐकूं येऊं लागला.

'पंढरीनाथ, हें कांहीं मला आवडत नाहीं. तूं जर तसें केलेंस तर तुला खात्रीनें पश्चात्ताप होईल गेल्या खेपेला काय घडलें तें तुला आठवत असेलच ? काय नेम सांगावा कीं पुन्हां ती कुत्री —'

'गप्प बैस जग्या आणि तुम्हां इतरांनाहि मी तेंच बजावतों मीं हें काम हातीं घेतलें आहे आणि तें माझ्या पद्धतीनेंच झालें पाहिजे जर तुमच्यापैकीं कुणाला तसें पसत नसेल तर तुम्हीं आतांच निघून जा.' पंढरीनाथाचा आवाज अतिशय कठोर होता. एकेकाळीं तो सैन्यांत कॅप्टनच्या हुद्यावर होता. तो पुढें म्हणाला, 'लक्षांत ठेवा, या खेपेला आपलें काम सोळा आणे होणार. जर कृष्णाकुमारीनें पुन्हां विश्वासघात करण्याचा विचार मनांत आणला तर तिचेंच नुकसान होईल.'

'जग्या, आपण कॅप्टनसाहेबांच्या सांगण्याप्रमाणें वागलें पाहिजे.' दुसरा माणूस म्हणाला, 'आतांपर्यंत आपण एकदिलानें कामें केलीं आहेत. शिवाय मला पैशाचीहि गरज आहे '

कुणीतरी कांहीं पुटपुटलें बहुधा तो जग्याच असावा.

'तुम्हीं पैसे इतक्या लवकर कसे संपविलेत, तेंच मला समजत नाहीं. तुम्हांला ते कित्येक वर्षे पुरायला हवे होते.' पंढरीनाथ म्हणाला, 'पण तें जाऊं द्या कृष्णाकुमारी, आपण आतां कामाला लागूं तूं त्या जागेसाठीं अर्ज कर. जग्यानें तेथल्या स्वयंपाकिणीची मूठ दाबली आहे. त्यामुळें तुझा तेथें लागलीच प्रवेश होईल.

'जग्या, तूं जवळच्या खानावळींत मुक्काम कर आणि त्या विभागांतील प्रत्येक गल्ली—बोळाची चांगली माहिती करून घे. मी आणि हरि सर्व तयारी झाल्यानंतर पांच तारखेच्या रात्रीं तेथें येऊं. एकविसाव्या वाढदिवसाचा

समारंभ त्यानंतर तीन दिवसांनीं होणार आहे. तोपर्यंत तो मोत्याचा कंठा बँकेंतच राहील.

'तो बँकेंतून काढण्यांत येतांच कृष्णाकुमारीकडून आपणांला ती माहिती मिळेल. शिवाय ती त्या घराचा एक नकाशाहि तयार करील. घनश्याम-दासांचा मोत्याचा कंठा आपण हस्तगत केला तर आपणांला कित्येक वर्षें आरामांत काढतां येतील. पण जर तुमच्यापैकी कुणी चूक केली तर मात्र महाघोटाळा होईल !'

काळापहाडचे डोळे चकाकले घनश्यामदासांचा तो मोत्यांचा कंठा जगप्रसिद्ध होता. कृष्णाकुमारीच्या सहाय्यानें तो कंठा हस्तगत करण्याचा प्रयत्न बहिरी ससाणा करणार होता. त्या चढाओढींत काळापहाडहि भाग घेणार होता !

त्याचवेळीं त्याच्या पाठींत पिस्तुल खुपसण्यांत आलें आणि कुणीतरी करड्या स्वरांत म्हणाले, 'तुझे दोन्हीं हात वर उचलून मुकाट्यानें खोलींत चल !' काळापहाडनें स्वतःला शिवी हांसडली. आंतलें संभाषण ऐकण्यांत रंगल्यामुळें तो गाफील राहिला होता. पाठींत पिस्तुल खुपसण्यांत आल्यामुळें दुसरें कांहीं करणें शक्य नव्हतें त्यानें दार ढकललें आणि आंत प्रवेश केला.

आपल्या बैठकींत कोण व्यत्यय आणीत आहे हें पाहाण्यासाठीं बहिरी ससाण्यानें कपाळावर आंठ्या चढवून दाराकडे पाहिलें. नंतर तो दचकून म्हणाला, 'हा तर काळापहाड !'

४

बाकीच्यांनाहि आश्चर्य वाटलें होतें. काळापहाडच्या मागें उभ्या असलेल्या माणसाच्या तोंडूनहि आश्चर्योद्‌गार निघाला होता. सर्वांत कृष्णकुमारी प्रथम भानावर आली.

'चंद्रवदन, तूं तर बराच भटकूं लागलास ! पण या खेपेला मात्र तुला पाहून मला अतिशय आनंद होतो.' कृष्णाकुमारी म्हणाली.

'या खेपेला म्हणजे काय ?' पंढरीनाथानें रागानें विचारलें

'मी गोव्याहून परत येत असतांना माझी आणि चंद्रवदनाची गाडींत भेट झाली होती हें मीं तुला सांगितलें नाहीं ?' तिनें उलट विचारलें.

'नाहीं, मला तें तूं सांगितलें नव्हतेस. मला वाटतें यामुळेंच हा चोंबडा येथें आला आहे हें बघ कृष्णाकुमारी, पुन्हां आम्हांला फसविण्याचा तुझा डाव असला तर मी माझ्या हातांनीं मोठ्या आनंदानें तुझी मान पिळवटीन.'

'मला खुलासा करण्याची संधि द्या.' काळापहाड सहज स्वरांत म्हणाला, 'मी आज रात्रौ तुमच्या क्लबमध्यें आलों होतों.'

'या माणसाचा कायमचाच निकाल लावूं या.' जग्या रागानें म्हणाला.

'गप्प बैस जग्या !' पंढरीनाथ रागानें म्हणाला, 'काळापहाड, तूं येथें

काय करीत आहेस ?'

'मी आज रात्रीं तळमजल्यावरील क्लबमध्यें वेळ घालविण्यासाठीं सहज आलों होतों काहीं मिनिटांपूर्वी मी उठलों आणि चुकून भलतेंच दार उघडलें. तेव्हां आणखी एक दार दिसलें. तें उघडल्यानंतर मला जिना दिसला. क्लबचाच हा खास विभाग असावा, अशा कल्पनेनें मी वर आलों आणि येथील शांतता पाहून मी परत खालीं जाणार होतों तोंच तुझा आवाज ऐकला. इतक्या वर्षांनीं तुला एकदां पहावा म्हणून मी आंत येणार होतों पण तोंच तुझ्या या मित्रानें मला आंत ढकललें.'

'पण तूं हाच क्लब कां पसंत केलास ?' पंढरीनाथानें विचारलें.

'माझ्या एका मित्रानें शिफारस केली होती. पण दरमहा पन्नास रुपये वर्गणी जास्तच आहे.' चंद्रवदन म्हणाला.

'कृष्णाकुमारीबरोबर भेट झाल्यानंतरच तुझ्या त्या मित्रानें या क्लबची शिफारस केली असणार ?' पंढरीनाथ उपरोधक स्वरांत म्हणाला, 'हरी, तूं तळमजल्यावर पहारा करीत असतांना हा आंत कसा आला ?'

'मला तहान लागल्यामुळें पाणी पिण्यासाठीं मी क्षणभरच माझ्या जागेवरून दूर झालों होतों आणि तेवढ्या अवधींतच हा आंत घुसला होता.'

'चंद्रवदन, तूं मला सत्य सांग. नाहींतर या जन्मांत तुला दुसऱ्या कोणत्या क्लबमध्यें जातां येणार नाहीं, अशी मी व्यवस्था करूं शकेन.' पंढरीनाथ करड्या स्वरांत म्हणाला.

त्या जागेंत शांतता पसरली. नंतर पंढरीनाथानें आपल्या तिघां जोडीदारांना तेथून बाहेर हांकलले आणि काळापहाडला पुन्हां विचारले, 'तूं येथे कशाकरितां आला होतास ? तूं जर माझा पुन्हां विश्वासघात करण्याचा प्रयत्न करणार असलास तर मी—'

'पंढरीनाथ, तुला खरेंच सांगावयाचें तर कृष्णाकुमारीचा शोध करीत येथें आलों होतों. या क्लबचा पत्ता मला तिच्याच पर्समध्यें सांपडला होता. आगगाडींतील इन्स्पेक्टरनें मलाच तें पत्र वाचावयास दिलें होतें.'

'कोणता इन्स्पेक्टर ?' पंढरीनाथानें विचारलें.

'ज्याला ती पांचूची अंगठी कृष्णाकुमारीजवळ आहे, असा संशय आला होता तो.' चंद्रवदन म्हणाला

'म्हणजे गोव्यांतील कुणा रावराजे नांवाच्या बाईची अंगठी चोरण्यांत आली होती ती तर नव्हे ?' पंढरीनाथानें विचारलें.

'होय, तीच. त्या मेजवानीला आपली कृष्णाकुमारी हजर होती.'

पंढरीनाथ मोठ्यानें हंसला आणि तो तिच्याकडे वळून म्हणाला, 'कृष्णाकुमारी, तुला तुझ्या संवयीनें अद्याप सोडले नाहीं असें दिसतें ? बाकी मीं जेव्हां ती हकीकत वाचली तेव्हां तुझ्याबद्दलचा विचार माझ्या मनांत आला

नव्हता. मला वाटतें आतां तूं दागदागिन्यांचा आणि कपड्यांची बरीच मोठी खरेदी करणार असशील ?'

काळापहाड घनश्यामशेठजींच्या मौल्यवान कंठ्याबाबत तेथें आलेला नाहीं आणि त्याच्यामुळें आपल्या योजनेला धक्का पोहोंचणार नाहीं, असें वाटल्यानंतर पंढरीनाथ खूष झाला होता.

'नाहीं मला खरेदी करतां येणार नाहीं.' कृष्णाकुमारी खेदानें म्हणाली, 'आगगाडीत या चंद्रवदनची भेट होईपर्यंतच ती अंगठी माझ्याजवळ होती.'

तें ऐकून पंढरीनाथ पुन्हां मोठ्यानें हंसला. तो म्हणाला, 'ती गंमत पहाण्यास मी तेथें हजर असतों तर बरें झालें असतें, असें घडलें तरी काय ?'

काळापहाडनें हकीकत सांगितली. ती ऐकतांना कृष्णाकुमारीहि हंसत होती.

'चंद्रवदन, खरें म्हटलें तर मी तुमचे आभारच मानायला हवेत.' ती म्हणाली, 'कुळे स्टेशनवर माझी इतकी कसून झडती घेण्यांत आली कीं, त्यांनीं माझे केंसहि फणीनें विंचरले अंगठी जर माझ्याजवळ असती तर पोलिसांना खचित सापडली असती. त्यांनीं माझा इतका संशय घेण्याचें कारण काय तें समजत नाहीं, पण जें झालें तें झालें. चंद्रवदन, तूं आतां तुझ्या या विजयाबद्दल मला मेजवानी कधीं देणार ?'

'मला आतां गेलें पाहिजे.' तो मनगटावरील घड्याळाकडे पहात म्हणाला, 'असें असेल तर आपण एखाद्या हॉटेलांत भोजन करूं.'

'मी टेलिफोन करून दिवस ठरवीन !' ती म्हणाली.

तो जेव्हां तेथून जावयास निघाला तेव्हां पंढरीनाथ म्हणाला, 'तुला मी एक गोष्ट सांगतों. पुन्हां या क्लबमध्यें येण्याचा प्रयत्न करूं नकोस. मी येथील मॅनेजरला सूचना देऊन ठेवीन. शिवाय हरि आणि जग्या यांनाहि, त्यांना योग्य वाटेल तें करण्याची परवानगी देईन. ते कसे आहेत तें तुला माहीत आहेच !'

चंद्रवदन घराकडे परततांना आनंदानें गाणें गुणगुणत होता. बहिरी ससाण्यानें त्याला दूर रहाण्यास बजावलें होतें, पण त्यामुळेंच त्याचें कारस्थान हाणून पाडण्याचें चंद्रवदनानें ठरविलें होतें. ज्यावेळीं पंढरीनाथ घनश्यामदास शेठजींची तिजोरी उघडील तेव्हां त्याला ती रिकामी आढळावी अशी तो व्यवस्था करणार होता.

दोन वर्षांपूर्वीं तोच मोत्यांचा कंठा पळविण्याचा विचार त्याच्याहि मनांत आला होता आणि त्याप्रमाणें तो त्या जागेची पहाणी करण्याकरतां गेला होता. पण त्याला तेथे अशी कांहीं माहिती मिळाली होती कीं, त्यामुळें त्याला ती कल्पना सोडावी लागली होती.

घनश्यामदास आपले सर्व दागिने नेहमीं बँकेंत ठेवीत असत आणि बँकेवर दरोडा घालण्याची काळापहाडची तयारी नव्हती. पण आतां ते दागिने चारपांच दिवस शेठजींच्या बंगल्यांत असणार. ते चोरण्याचा बहिरी ससाणा पांच

तारखेच्या रात्रीं प्रयत्न करणार, हें त्याला समजलें होतें. तीन तारखेला वाढ-दिवसाची मेजवानी होती त्यामुळें चार तारखेच्या रात्रीं तो कंठा शेठजींच्या तिजोरींत असणार आणि त्याच रात्रीं तो काळापहाडला मिळणार होता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यानें आपल्या नव्या रहस्यकथेला सुरुवात केली. गोव्यांत असतांना त्याला ती कल्पना सुचली होती आणि त्यानें त्या कथेच्या अर्ध्या भागाचा आराखडाहि आंखला होता. तीन तास काम केल्यानंतर त्यानें बाबाजीनें तयार केलेल्या भोजनपदार्थांचा भरपूर समाचार घेतला.

घनश्यामदासशेठजींच्या घराची त्याला जी माहिती होती. ती त्याच्या दृष्टीनें समाधानकारक नव्हती. पूर्वी त्यानें जेव्हां त्या भागांत फेरफटका केला होता त्यावेळीं त्या जागेचा किती कडेकोट बंदोबस्त करण्यात आला आहे, हें त्यानें पाहिलें होतें.

कोणतीहि नवीन कामगिरी हातीं घेतल्यानंतर प्राथमिक तयारी करण्यांत काळापहाड कित्येक दिवस घालवीत असे. तो त्या जागेची व्यवस्थित पहाणी करीत असे. त्या घरांत शिरण्याच्या आणि बाहेर पडण्याच्या सर्व वाटांची माहिती करून घेत असे तेथल्या पहारेकऱ्याची, शिकारी कुत्र्याची (असल्यास) आणि धोक्याचा इषारा देण्याच्या यंत्राची त्याला खडान् खडा माहिती असे. घरांतील नोकरांची आणि इतर मंडळींची तो इत्थंभूत माहिती मिळवीत असे आणि त्यानंतर त्या कामगिरीमुळें आपल्या स्वातंत्र्याला मुळींच धोका नाहीं अशीं खात्री झाल्यानंतरच तो पुढें पाऊल टाकीत असे

घनश्यामदासशेठजींचा वाडा प्रवेश करण्यास अभेद्य नव्हता किंवा सामान्यहि नव्हता. त्या घरामोंवतीं असलेली उंच भिंत हा पहिला अडथळा होता. पण त्या भिंतीचा बराचसा भाग अंधारांत रहात असल्यामुळें त्या अडचणींतून मार्ग काढणें कठीण नव्हतें. तेथें दोन प्रवेशद्वारें होतीं आणि पहारेकरीहि होते पण ते पहारेकरी रात्रींच्या वेळीं झोंपतात हें चंद्रवदनाला माहीत होतें. त्या झोंपाळू पहारेकऱ्याबद्दल त्या गांवांतल्या चहाच्या दुकानांत एकत्र येणारे गांवकरी खूप चर्चा करीत असत.

पण अशाच एका चर्चेच्या वेळीं रागावलेल्या पहारेकऱ्यानें त्या घराच्या तळमजल्यावरील सर्व खिडक्यांवर आणि दारांवर धोक्याचा इषारा देणारीं यंत्रें बसविलीं आहेत आणि त्यांच्या तारा तोडून ती नादुरुस्त करणें शक्य नाहीं असें सांगितलें होतें.

पण त्या घराच्या पहिल्या मजल्यावर पाठीमागल्या स्नानगृहाच्या खिडकींतून प्रवेश करतां येईल आणि ती खिडकी तेथेंच असलेल्या गटाराच्या पाईपाला धरून गांठतां येईल हें चंद्रवदनानें दुरून दुर्बिणींतून पाहिलें होतें एकच अडचण होती आणि ती म्हणजे ती खिडकी लहान होती. त्या खिडकींतून आपणांला प्रवेश करतां येईल किंवा नाहीं ह्याबद्दल त्याला शंका होती, पण

घरांत शिरण्याचा तो एकच मार्ग होता पहिला मजला अतिशय उंच असल्या-मुळें तेथें तेवढी मोठी शिडी घेऊन जाणें शक्य नव्हतें.

एकदां त्यानें अशाच प्रकारच्या एका घरांत शिरतांना तेथल्या माळ्याच्या शिडीचा उपयोग केला होता पण त्यावेळीं ती शिडी घसरून पडली होती, कांचा फुटल्या होत्या आणि त्या आवाजानें घरांतील सर्व मंडळी जागी झाल्यामुळें काळापहाडला जीव घेऊन पळावें लागलें होतें.

पण घनश्यामदासशेठजींच्या घरांत शिरण्याचा त्याचा निश्चय मात्र अढळ होता. कांहीं झालें तरी तो तसा प्रयत्न करणार होता त्या विचारानें भोजन करतांना तो गालांतल्या गालांत हंसत होता.

भोजन आटोपल्यानंतर त्यानें लिहावयास न बसतां बाहेर फिरावयास जाण्याचें ठरविलें. तो फिरत असतांना त्याला एके ठिकाणीं एक जवाहिरांची मोठीच जाहिरात वाचावयास मिळाली. पाठीमागल्या घरांतच त्या जवाहि-रांचें प्रदर्शन मांडलें होतें रहदारीच्या रस्त्यावर त्या सामान्य घरांत इतक्या बहुमोल जवाहिरांचें प्रदर्शन मांडण्यांत यावें याचें त्याला नवल वाटलें म्हणून त्यानें कुतूहलानें जवळ जाऊन ती जाहिरात पुन्हां एकदां वाचली.

ती जाहिरात लक्षपूर्वक वाचतांच त्याला हंसू कोसळलें. सर्व सुप्रसिद्ध रत्नांच्या हुबेहूब नकला त्या प्रदर्शनांत मांडण्यांत आल्या होत्या आणि तें प्रदर्शन पहाण्याची फी अवघी चार आणे होती. त्यानें तिकीट विकत घेतलें तेव्हां आपण आपला वेळ फुकट घालवीत आहोत असें त्याला वाटलें. कारण त्याला नकली दागिन्यांचा मनस्वी तिटकारा होता.

त्या घरांतील एका विस्तीर्ण खोलीमध्यें तें प्रदर्शन मांडलें होतें आणि तें पहाण्यासाठीं बरीच शाळकरी मुलें आलीं होतीं ते निरनिराळ्या प्रकारचे अलंकार पाहून तीं मुलें अगदीं थक्क झालीं होतीं. भारतांतील अनेक सुप्रसिद्ध रत्नांच्या आणि दागिन्यांच्या नकला तेथें होत्या.

तेथल्या एका कपाटांत घनश्यामदासशेठजींच्या मोत्यांच्या हाराचीहि नक्कल होती. काळ्या मखमलीवर तो मोत्यांचा नकली हार ठेवण्यांत आला होता. तो हार पहातांच त्याला एक अजब कल्पना सुचली त्यामुळें तो इतक्या मोठ्यानें हंसूं लागला कीं, आजूबाजूचीं मुलें त्याचेंच प्रदर्शन पाहूं लागलीं.

० ० ० ०

रात्रीचे दोन वाजले होते. चंद्रवदनानें लिहिलेल्या मजकुरावरून नजर फिरविली व पुढ्यांतील कागद टेबलाच्या खणांत बंद केले सिगारेट पेटवून तो आपल्या झोंपण्याच्या खोलींत गेला तेथल्या खिडकीवरील जाड पडदा व्यवस्थित केल्यानंतर त्यानें भिंतींतच बसविलेलें कपड्याचें कपाट उघडलें.

त्या कपाटांतील कपडे बाबाजी रोज झटकून ठेवीत असे. पण त्या कपाटाचा एक खण असा होता कीं, ज्याचें अस्तित्व बाबाजीलाहि माहीत नव्हतें त्यानें

तेथली एक लपविलेली कळ दाबतांच त्या कपाटाचा एक लहानसा खण उघडला गेला त्या खणांत काळापहाडचा पेहेराव आणि हत्यारें होतीं.

चंद्रवदनानें प्रथम अंगावरील सर्व कपडे काढून टाकले. नंतर त्यानें आपल्या हत्यारांचा पट्टा कमरेंत बांधला. त्यानंतर ज्यामुळें त्याला काळापहाड हें नांव पडलें होतें तो काळा पेहेराव धारण केला. त्यानें पायांत काळे मोजे आणि काळे बूट चढविलें आणि आपल्या गळ्याभोंवतीं एक पांढरा रेशमी मफलर गुंडाळला त्या मफलरमुळें त्याचा काळा शर्ट झांकला गेला होता.

त्यानें त्या कपड्यावर अगदीं हलक्या वजनाचा पायघोळ पावसाळी कोट चढविला. तो कोट असा होता कीं, त्याला केव्हांहि त्याची घडी करून ती आपल्या तुमानीच्या खिशांत घालतां आली असती. त्यानंतर त्यानें आपली हॅट चढविली. आतां जर त्याच्याकडे कुणीं पाहिलें असतें तर रात्रीच्या वेळीं कांहीं कामानिमित्त बाहेर पडलेला तो कुणी सभ्य गृहस्थ आहे असें वाटलें असतें तो पावसाळी कोट आणि पांढरा मफलर खिशांत घालून त्याला क्षणार्धांत तोंडावर काळा मुखवटा चढवून काळापहाड बनतां आलें असतें.

आपल्या घरांतून बाहेर पडण्याची त्याची पद्धतहि विचित्र, पण त्याच्या दृष्टीनें योग्य अशी होती त्याला पाठीमागल्या खिडकींतून नळाला धरून एक अरुंद गल्लींत उतरतां येत असे आणि क्षणांत रस्त्यावर जातां येत असे.

घरांतून बाहेर पडल्यानंतर पुढें काय करावें याबद्दल तो विचार करूं लागला. त्या प्रदर्शनांत मौल्यवान् असें कांहींच नसल्यामुळें तेथें पहारा असण्याची शक्यता नव्हती. पुढल्या दाराला नेहमींप्रमाणेंच कुलूप लावलेलें होतें आणि त्याला तेथून प्रवेश करणें शक्य नव्हतें.

त्या इमारतीजवळ पोहोंचल्यानंतर काळापहाड आजूबाजूकडे पहाण्यासाठीं थांबला. रस्ता निर्मनुष्य पाहिल्यानंतर आणि आपल्या मार्गांत कांहीं अडथळा नाहीं अशी खात्री झाल्यानतर तो त्या इमारतीजवळ गेला.

कांहीं क्षण तो दाराजवळच थांबला आपण त्या घराजवळ गेलों हें कुणाच्याहि लक्षांत आलें नाहीं, याबद्दल त्याला खात्री करावयाची होती.

प्रदर्शनाचें दार अगदीं हमरस्त्यावर असल्यामुळें आणि दुसऱ्या कोणत्याहि बाजूनें आंत प्रवेश करणें शक्य नसल्यामुळें त्यानें पहिल्या मजल्यावरील ऑफिसांत प्रवेश करण्याचें ठरविलें. बाजूलाच जिन्याचें दार होतें. तें त्यानें क्षणार्धांत उघडलें. आंत गेल्यानंतर त्यानें आपल्या गळ्यांतील मफलर काढून खिशांत घातला आणि तोंडावर काळा बुरखा चढविला.

कांहीं क्षण तो त्या दाराजवळ थांबला. आपण तेथें प्रवेश केला हें कुणाच्याहि लक्षांत आलें नाहीं, अशी खात्री झाल्यानंतर त्यानें दार बंद करून आपली टॉर्च पेटविली आणि अतिशय सावधगिरीनें पायऱ्या चढून तो पहिल्या मजल्यावर गेला या ठिकाणीं त्यानें आपली टॉर्च विझविली.

जर त्या इमारतीस एखादा पहारेकरी असला तर घोटाळा होणार होता, म्हणून तो अंधारांतच आपला एक हात भिंतीला टेकीतच पुढें सरकला. या अरुंद मार्गाच्या पलीकडच्या टोंकाला एक कांचेची मोठी खिडकी होती. ती खिडकी रस्त्याच्या बाजूला होती. त्या खिडकीजवळ पोहोंचल्यानंतर त्यानें सावधगिरीनें आपल्या टॉर्चचा पुन्हां उपयोग केला तेव्हां त्याच्या डाव्या हाताला दार दिसलें.

आंतली खोली प्रदर्शनाच्या वरच्या बाजूला आहे, हे तर्कानें ओळखून त्यानें तें दार उघडण्यापूर्वीं बाहेरची पाटी पाहिली होती. तें हिशेब तपासण्याचें ऑफिस होतें. ऑफिस बरेंच मोठें होतें. तें खालच्या प्रदर्शनाच्या लांबीरुंदीशी जुळणारें होतें. तेथली जमीन लांकडी फळयांची होती त्यानें तेथली एक जागा पसंत केली आणि तेथल्या फळयांना बरींच छिद्रें पाडून नंतर एक मोठा चौकोन कापण्यास सुरुवात केली.

कांहीं वेळानें तो थांबला. तोंडावरील बुरखा दूर करून त्यानें घाम पुसला. एका नकली कंठ्यासाठीं आपण इतकी मेहनत करीत आहोंत याबद्दल त्याला मनांतून वाईट वाटत होतें कांहीं मिनिटें विश्रांति घेऊन त्यानें तोंडावर बुरखा चढविला आणि पुन्हां आपल्या कामास सुरुवात केली.

अर्ध्या तासानंतर त्यानें त्याला हवा असलेला चौकोन कापला. त्या फळयांखालीं प्लॅस्टरचें आवरण होतें तें त्यानें दूर केलें. नंतर त्यानें एक दोराची शिडी त्या चौकोनांतून आंत सोडली आणि त्या शिडीचें वरचें टोंक त्या ऑफिसांतील एका जड टेबलला बांधलें आणि त्या दोरीच्या शिडीवरून तो प्रदर्शनाच्या जागेंत उतरला

ज्या कांचेच्या पेटींत नकली मोत्यांचा कंठा ठेवलेला होता. तिला मजबूत कुलूप होतें काळापहाडनें हिरकणीच्या सहाय्यानें कांचेचा तुकडा कापून तो मोत्यांचा कंठा बाहेर काढला आणि खिशांत घातला. तो पुन्हां त्या दोरीच्या शिडीवरून वर जाणार होता, पण त्याचवेळीं त्याला वरच्या ऑफिसांत कुणीतरी बोलत आहे असें वाटलें आणि तो दचकून उभा राहिला.

'हें बघ खंडू, मीं टॉर्चचा प्रकाश पाहिला हें अगदीं खरें आहे. मी समोरच्या कामतच्या दुकानांतून चहा घेऊन बाहेर पडलों आणि तोंच मला या वरच्या खिडकीजवळ प्रकाश दिसला.'

'नाहीं शंकर, तुला तो भासच झाला असावा. निष्कारण आपण आपला वेळ फुकट घालवीत आहोंत साहेबांची फेरी येईल आणि मी जर त्यांना ठरल्या ठिकाणीं भेटलों नाहीं तर ते रागावतील.'

'चोरांना पकडणें हेंसुद्धां तुझेंच काम आहे.' शंकर म्हणाला, 'आल्यासारखी खात्री करूं आणि नंतर परत जाऊं. जिन्याचें दार उघडें होतें हेंसुद्धां तू पाहिलें आहेसच !'

पावलांचा आवाज जवळ जवळ येत होता कोणत्याहि क्षणीं ते दोघे वरच्या ऑफिसांत येण्याचा संभव होता. पुन्हां त्याला बोलणें ऐकूं आलें.

'शंकर, तुला कोणत्या खोलींत प्रकाश दिसला तें सांग म्हणजे आपण ती पाहून खात्री करून घऊं. मला बाहेर जाण्याची घाई आहे.'

'या बाजूच्याच जागेंत मी माझ्याजवळच्या चावीनें दार उघडतों.' शंकरजवळ चावी होती त्याअर्थी तो इमारतीचा पहारेकरी होता हें उघडच होतें. त्याला संशय आला, त्यामुळें त्यानें रस्त्यावरील पोलिसाला बरोबर आणलें होतें.

एकाएकीं त्या कापलेल्या चौकोनांतून काळापहाडला झगझगीत प्रकाश दिसला. पहारेकऱ्यानें वरचा दिवा लावला होता.

'पाहिलेंस ना ? खोली अगदीं रिकामी आहे !' पोलीस हंसून म्हणाला, 'निष्कारण मला त्रास दिलास. शंकर, तुला भासच झाला होता.'

पण पहारेकऱ्यानें आणखीहि कांहीं पावलें पुढें टाकलीं होतीं आणि त्या-बरोबर त्याच्या तोंडून आश्चर्योद्‌गार निघाला होता, 'मला भास झाला होता काय ? तर मग येथें भगदाड कसें पडलें ?'

आतां मात्र तो पोलीस त्वरेनें पुढें झाला होता. 'शंकर तुझें म्हणणें बरोबर आहे. चोरानें आंत दोराची शिडी सोडलेली दिसते. मी खालीं उतरतों. क्षणभर माझा टॉर्च पकड.'

शिपाई शरीरानें बराच आडदांड होता. त्याला त्या चौकोनांतून आंत शिरतांना बरीच मेहनत घ्यावी लागली होती. दोर धरून लोंबकळतांना त्यानें शंकरच्या हातांतील टॉर्च घेतली व नंतर आपली शिटी पुढें करीत तो म्हणाला, 'मीं जर खालीं आरोळी ठोकली तर तूं ही शिटी जोरानें फुंकण्यास सुरुवात कर.'

तो शिपाई मोठ्या धैर्यानें प्रदर्शनाच्या जागेंत उतरला. शंकर जरा घाबरला होता. तेथें शिरलेला चोर प्रदर्शनाऐवजीं त्या वरच्या मजल्यावरहि कुठेंतरी असण्याचा संभव होता, म्हणून तो हातांत ती शिटी धरून त्या चौकोनी भगदाडाजवळ उभा होता. जरा संशय आल्यास तो ती शिटी फुंकण्यास तयार होता.

खालीं कांहीं आपटण्याचा आवाज झाला. त्याबरोबर शंकर अधिकच घाबरला आणि त्यानें विचारलें, 'खंडू, तूं सुरक्षित आहेस ना ?'

'गप्प बैस !' खंडूचा आवाज ऐकूं आला, 'तूं माझ्याकडे न पहातां जिन्याजवळच्या दारावर लक्ष ठेव. चोराचे साथीदार असल्यानें ते तेथूनच आंत शिरतील.'

आज्ञाधारक शंकर तोंड फिरवून दाराकडे पाहूं लागला. खालीं आणखी कांहीं आवाज झाले, पण खंडूच्या सूचनेप्रमाणें त्यानें आतां तिकडे लक्ष दिलें

नाहीं. आणखी कांहीं क्षणांतच त्याच्या खांद्यावर कुणाचातरी हात पडला. त्यानें मागें वळून पाहिलें तेव्हां तो अतिशय दचकला. एक काळा बुरखाधारी त्याच्या मागें उभा होता.

'शंकर, तुझ्या मित्राला तुझी फारच गरज आहे, तेव्हां तूंहि खालीं जा !' तो बुरखाधारी म्हणाला, 'तूं शिडीवरून उतरतोस कीं, मी तुला अलगद खालीं सोडूं ?'

शंकरला एकदम तळमजला गांठण्याची इच्छा नव्हती. तो शिडीवरून खालीं उतरूं लागला, तेवढ्या अवधींत काळापहाडनें रस्ता गांठला होता.

५

दोन दिवसांनंतर चंद्रवदन भोजनासाठीं उठण्याच्या बेतांत असतांना टेलिफोनची घंटा वाजली. रिसीव्हर कानाला लावून तो म्हणाला, 'मी चंद्रवदन बोलत आहें. आपण कोण ?'

'मी कृष्णाकुमारी.' त्याला उत्तर मिळालें, 'मी अतिशय कामांत असल्यामुळें मला यापूर्वीं टेलिफोन करतां आला नव्हता. तुम्ही मला हॉटेलांत नेऊन पार्टी देण्याचें कबूल केलें आहे. आज रात्रीं तुम्हांला सवड आहे काय ? कारण नंतर मला कांहीं दिवसांकरितां बाहेरगांवीं जायचें असल्यामुळें जमणार नाहीं. मी उद्याच मुंबई सोडणार आहें.'

'तर मग आज रात्रीं साडेआठ वाजतां आपण राजमहाल हॉटेलांत जाऊं.' तो म्हणाला 'मी तुला कुठें भेटूं तें सांग.'

'मला तुम्हीं हॉटेलांत भेटा.' ती म्हणाली.

दुपारचें भोजन करतांना चंद्रवदन कृष्णाकुमारीबद्दल विचार करीत होता. ती अत्यंत सुंदर आणि चाणाक्ष होती. त्यांची मैत्री होती, पण एकमेकांवर प्रेम नव्हतें. तो तिच्या शौर्यावर आणि बुद्धिचातुर्यावर खूष होता. आणि ती तो काळापहाड असला तरी वचन पळिणारा होता म्हणून त्याच्यावर लुब्ध होती.

राजमहाल हॉटेलाच्या प्रवेशद्वाराजवळ बरोबर साडेआठ वाजतां त्या दोघांची भेट झाली. तिनें भपकेबाज पेहेराव केला होता. त्याचा पोषाख नेहमीप्रमाणेंच भपकेबाज होता. त्यांच्याकडे पहाणाऱ्याची कांहीं गैरसमजूत होणें स्वाभाविक होतें. कारण ती जोडी रतिमदनाप्रमाणें दिसत होती.

'चंद्रवदन, तुम्हांला पाहून मला नेहमींच आनंद होतो !' तेथल्या एका टेबलाजवळ बसल्यानंतर ती म्हणाली, 'जे मला आवडतात, आणि ज्यांच्यावर माझा विश्वास असतो अशा अगदीं थोड्यांपैकीं तुम्हीं एक आहांत.'

'पण कृष्णाकुमारी, गेल्या खेपेला तूं माणकांचा हार पळवून पैसे मिळविलेस ते खरोखरच खर्च केलेस काय? पढरीनाथनें जेव्हां तुला तसें सांगितलें

तेव्हां मलाहि आश्चर्य वाटलें होतें.'

'होय चंद्रवदन, सध्यां माझें दिवाळें निघालें आहे. मी नशीब अजमावण्यासाठीं पणजीतील त्या जुगारी अड्ड्यांत गेलें होतें. पण तेथें माझे सर्व पैसे घालवून बसलें. म्हणूनच मीं ती अगठी मळविली पण माझी तीहि मेहनत फुकट गेली.'

'मी तुला कांहीं पैसे उसने देऊं काय ?' त्यानें विचारलें.

'नको.' ती म्हणली, मी तुला आठवण्यासारखी कांहीं बातमी सांगूं शकेन. सध्यां मी पंढरीनाथच्या टोळींत सामील झालें आहें आणि गेल्या कांहीं दिवसांत मीं जी माहिती मिळविली आहे ती तुला आठवण्यासारखी आहे. चंद्रवदन, तूं घनश्यामदासांच्या मोत्यांच्या कंठ्याबद्दल ऐकलें आहे काय ?'

'ऐकलें असेल, पण मला आतां तरीं तें आठवत नाहीं.

'हें बघ, चावटपणा करूं नकोस.' ती म्हणाली. 'तूं त्या कंठ्याबद्दल ऐकलेंच असणार. तसला कंठा भारतांतच नव्हे तर साऱ्या जगांत नाहीं. तो कंठा नेहमीं बँकेंत असतो. पण आतां एका वाढदिवसाच्या समारंभामुळें तो वाड्यांत आणला जाणार आहे आणि कांहीं दिवस तेथल्याच तिजोरींत रहाणार आहे, हें ऐकून तुझ्या मनांत कांहीं विशेष विचार येतात काय ?'

त्यानें तिच्याकडे आश्चर्यानें पाहिलें. बहिरी ससाण्याला फसविण्याचा तिचा उद्देश अगदीं स्पष्ट होता.

'म्हणजे तुला असें सुचवायचें आहे कीं —'

'माझें सर्व बोलणें तूं ऐकल्याशिवाय मला कांहींच सुचवायचें नाहीं.' ती म्हणाली, 'घनश्यामदासाच्या वाड्यांतील दोन लहान मुलांना सांभाळण्यासाठीं दाई म्हणून माझी नेमणूक झाली आहे आणि मी उद्यांच त्या कामावर हजर होणार आहें.'

'आतां ईश्वरच त्या दोन लहान मुलांचें संरक्षण करो.' तो म्हणाला.

'तो मेजवानीचा समारंभ आणखी आठ दिवसांनीं होणार आहे.' त्याच्या चेष्टेकडे दुर्लक्ष करून ती पुढें म्हणाली, 'सुदैवानें जर साथ दिली तर तेवढ्या अवधींत मला त्या घराची आणि तेथें रहाणाऱ्या मंडळींची चांगलीच माहिती मिळवितां येईल. मला असें समजलें आहे कीं, ती तिजोरी भक्कम आणि जुन्या पद्धतीची आहे. मला जरी ती उघडणें सोपें जाणार नसलें तरी तूं ती अगदीं सहज उघडशील, अशी माझी खात्री आहे. माझ्या बोलण्याचा उद्देश आतां तरी तुझ्या लक्षांत आला काय ?'

'पण कृष्णाकुमारी, तुला ही कल्पना कुणीं सुचविली ?'

'मला ती कुणीहि सुचविली नाहीं. पण मला पैशांची अतिशय गरज असल्यामुळें तो कंठा कांहीं दिवस घनश्यामदासांच्या घरांत रहाणार आहे हें समजल्यानंतर माझ्या मनांत ती कल्पना यावी हें स्वाभाविकच आहे !'

'तूं तेथें दाई म्हणून काम करणार आहेस ?'

'होय, मी उद्यां सकाळीं कामावर हजर रहाणार आहें. दरमहा पगार रुपये साठ, शिवाय खाणें–पिणें कपडालत्ता.'

'पण हाच विचार पंढरीनाथाच्याहि मनांत आला नसेल कशावरून ?'

'तो बहिरी ससाणा सध्यां इतर कामांत गुंतला आहे. नाहींतर तो कंठाच्या मागें लागला असता. बहिरी ससाणा जर यांत भाग घेत असता तर मी त्याचा कधीं विश्वासघात केला असता काय ?

चंद्रवदनाला तिच्या त्या साळसूदपणाचें मनातून हसूं येत होतें. तो म्हणाला, 'छे ! तसली घाणेरडी कल्पना तुझ्या मनाला कधींच शिवणार नाहीं.'

'जर माझ्याबरोबर सहकार्य करण्याची तुझी इच्छा असेल तर चार तारखेची रात्र मोठी सोईस्कर आहे.' ती म्हणाली, 'त्या रात्रीं मोत्यांचा कंठा घनश्यामदासांच्या तिजोरींत असेल आणि मलाहि तोपर्यंत तुझ्यासाठीं सर्व अंतस्थ माहिती मिळवितां यईल.'

बहिरी ससाण्यानें तो कंठा पांच तारखेच्या रात्रीं पळविण्याचें ठरविलें होतें हें त्याला आठवत होतें. तो म्हणाला, 'समज, मी जर तुझ्या सूचनेप्रमाणें हें काम करण्यास तयार झालों तर तूं काय करणार आहेस ?'

'तुझ्याबरोबरच मी घर सोडीन' ती म्हणाली, 'कंठा नाहींसा झाल्याबरोबर तेथेंच रहाण्यापेक्षां तेथून निघून जाणेंच जास्त सुरक्षित. चंद्रवदन, तुझें काय म्हणणें आहे ?'

'समज, जर मी तुला नकार दिला तरीहि तूं तेथें दाई म्हणून जाशील काय ?' त्यानें विचारलें.

'अर्थातच जाईन' ती म्हणाली.

'मला नाहीं तें खरें वाटत.' तो म्हणाला, 'कारण माझें सहकार्य गृहीत धरूनच तूं ही सर्व योजना आंखली आहेस. मीं नकार दिला तर तूं एकटी तेथें जाऊन करणार काय ?'

'तुझें म्हणणें बरोबर आहे. पण तूं असल्या गोष्टीला नकार देणार नाहींस अशी माझी पूर्ण खात्री आहे कारण तो घनश्यामदासांचा कंठा हें पराक्रमी आणि साहसी काळापहाडला आव्हान आहे !'

त्या दोघांनीं कांहीं वेळ एकमेकांकडे पाहिलें. दोघांचेंहि समाधान झालें. नंतर त्यांनी विषय बदलून एकत्र भोजन केलें आणि दोन तास एकमेकांच्या सहवासांत आनंदानें घालविलें. चंद्रवदन त्या रात्रीं जेव्हां आपल्या घरीं परत आला तेव्हां तो प्रसन्न दिसत होता.

शनिवारीं चंद्रवदन मोटारीनें कल्याण येथें गेला आणि गेल्या खेपेला घनश्यामदासांचा वाडा पहातेवेळीं त्यानें जी जागा हेरून ठेवली होती, तेथें मोटार उभी केली नंतर तो तेथून सुमारें पन्नास यार्डांवर असलेल्या लहानशा

राईकडे गेला. तेथें गेल्यानंतर तो एका छोटया दगडावर बसला आणि तेथून दुर्बिणींतून तो समोरचें दृश्य पाहूं लागला.

तो बसला ती जागा उंचवटयावर होती. त्यामुळें त्याला घनश्यामदासांच्या बंगल्याची पाठीमागली बाजू स्पष्ट दिसत होती. दोन वर्षांत त्या जागेंत कांहींच फरक झालेला नाहीं हें त्यानें ताडलें. सर्व कांही पूर्वीसारखेंच होतें.

पहिल्या खेपेला पाहून ठेवलेल्या छोटया खिडकीवर त्यानें आपली नजर स्थिर केली. त्या खिडकीजवळ असलेल्या नळाला धरून वर चढणें सोपें होतें. प्रश्न एवढाच होता कीं त्याचा आंत प्रवेश होण्याइतकी ती खिडकी मोठी आहे कीं नाहीं. आपलें सडपातळ शरीर कसेंबसें आंत सरकवितां येईल अशी त्याची खात्री पटली.

त्यानंतर दोन तास तो त्या घराकडे जाण्याचे मार्ग आणि तेथली परिस्थिति यांचें सूक्ष्म निरीक्षण करीत होता आणि आपल्या डायरीत सांकेतिक भाषेंत त्याबद्दलची टांचणी लिहीत होता. अखेरीस त्याचें समाधान झालें आणि तो आनंदानें शीळ वाजवीत मोटारीनें मुंबईकडे परतला.

त्यानंतर चार दिवसांनीं कृष्णाकुमारीनें कबूल केल्याप्रमाणें त्याला टेलिफोन केला. टेलिफोन करण्यासाठीं तिला वाडयापासून बरेंच दूर जावें लागलें होतें. तिनें इतरांना समजणार नाहीं अशा भाषेंत त्या घराची आंतली माहिती दिली. आतल्या वाटा आणि अडचणी त्याला सांगितल्या आणि घरांत रहाणाऱ्या मंडळींबद्दलहि माहिती दिली.

तिने त्या पाठीमागल्या छोटया खिडकींतूनच घरांत प्रवेश करणें शक्य आहे, असें सुचविलें आणि मंगळवारी रात्री कोणत्या वेळीं आणि कोणत्या ठिकाणी यावयाचें तें सांगितलें त्याबरोबर त्या घराचाहि नकाशा ताबडतोब पाठविण्याचें कबूल केलें. वाचनालयांतील एका पुस्तकाच्या कपाटामागें ती तिजोरी दडविण्यात आली आहे असें तिने सांगितलें.

तें कपाट बाजूला कसें सरकवितां येईल हें तिला माहीत नव्हतें. पण तें एका बाजूनें हातानें ढकलण्याची व्यवस्था असावी असा त्याचा तर्क होता. त्यानंतर तिनें त्याच्या इतर कांही प्रश्नांचीं उत्तरें देऊन टेलिफोनवरील बोलणें बंद केलें.

त्या रात्रीं चंद्रवदन दोन तास विचार करीत होता, आणि सारखा सिगारेट ओढीत होता. शेवटी त्यानें आपली योजना नक्की केली. त्यावेळीं त्याची मुद्रा अतिशय प्रसन्न दिसत होती.

चार तारखेच्या सकाळीं त्याला कृष्णाकुमारीचें पत्र मिळालें. तिचें काम किती व्यवस्थित होतें हें त्यावरून दिसून आलें. तिनें त्या खिडकीचें मोजमापहि घेतलें होतें आणि अशा प्रकारें त्याच्या मार्गांतील त्या शेवटच्या अडथळयाची त्याला संपूर्ण माहिती दिली.

एकच गोष्ट होती कीं या खेपेला त्याला एका मदतनिसासह काम करावयाचें होतें आणि त्या व्यक्तीवर कितपत विश्वास ठेवावयाचा हाहि एक प्रश्नच होता. आतांपर्यंत कायद्याच्या कचाटयांत न सांपडता त्यानें जें अपूर्व यश मिळविलें होतें त्याचें एकच कारण होतें आणि तें म्हणजे तो सर्व गोष्टी फक्त एकटयाच्याच जबाबदारीवर करीत होता.

कृष्णाकुमारीनें पाठविलेल्या घराच्या नकाशाबरोबर आणखी एक टांचण होतें. घनश्यामदासांच्या घरांतील मंडळी अगदीं यंत्राप्रमाणें वागणारी होती. रात्रीं बरोबर साडेदहा वाजतां सर्व झोंपावयास जात असत. त्यानंतर नोकर घरांतील सर्व दारें आणि खिडक्या बंद करीत असत. साडेअकरा वाजतां सर्व सामसूम होत असे. बारा वाजल्यानंतर त्या घरांत प्रवेश करण्यास कांहीं हरकत नव्हती. बरोबर अडीच वाजतां ती त्या स्नानगृहाच्या छोटया खिडकीजवळ त्याची वाट पहात उभी रहाणार होती व त्याला वाचनालयांत नेणार होती.

त्यानें त्या नकाशाचा चांगला अभ्यास केल्यानंतर पत्रासह तो नकाशाहि जाळून टाकला. अद्याप त्याला कित्येक तासांचा अवधि होता. आणि तेवढया अवधींत त्याला आणखीहि एक गंमतीची योजना आंखावयाची होती.

त्या रात्रीं दहा वाजतां तो आपल्या शय्यागृहांत गेला आणि त्यानें तेथल्या कपाटांतील गुप्त खणांतून काळापहाडचें सर्व साहित्य बाहेर काढलें. व्यवस्थित पोषाख करून आणि आपणांला हव्या असलेल्या सर्व वस्तु बरोबर घेतल्या आहेत अशी खात्री केल्यानंतर तो तेथून बाहेर गेला आणि बिंदुमाधव क्लब-बाहेर उभ्या करण्यांत आलेल्या मोटारींतून एक वेगवान मोटार त्यानें पळविली.

रात्रीची वेळ असल्यामुळें रस्त्यावर विशेष रहदारी नव्हती. त्यामुळें त्याला अगदीं जलद प्रवास करणें शक्य झालें होतें पावणेबारा वाजतां तो घनश्याम-दासांच्या बंगल्याजवळच्या त्या झाडींत पोहोंचला आणि त्यानें पूर्वी हेरून ठेवलेल्या एका ठिकाणीं ती मोटार लपविली.

नंतर त्यानें आपला कोट, हॅट, पांढरा गळपट्टा आणि बरोबर आणलेलें आणखी कांहीं साहित्य पाठीमागल्या भागांत ठेवलें. जर त्याला कांहीं अडच-णीमुळें त्या सर्व वस्तु तेथेंच टाकून निघून जावें लागलें असतें तरी त्याच्याशीं त्याचा कुणीच संबंध जुळवूं शकलें नसतें.

नंतर त्यानें काळे रेशमी मोजे आपल्या हातांत चढविले आणि तोंडावर काळा बुरखा चढविला. त्या रात्रीच्या अंधारांत तो इतका मिसळून गेला होता कीं प्रखर प्रकाशाचा झोत जर त्याच्यावरच सोडण्यांत आला असता तरच त्याचें अस्तित्व इतरांना जाणवलें असतें.

आतां शेवटची एकच गोष्ट शिल्लक राहिली होती. त्यानें मोटारीच्या खणांतून एक लहानशी कातडी बॅग काढून घेतली. ज्यासाठीं त्यानें अतिशय मेहनत घेतली होती तो नकली मोत्यांचा कंठा त्या बॅगेंत होता.

तो हळूहळू घनश्यामदासांच्या बंगल्याकडे जाऊं लागला. टॉर्चचा उपयोग करण्याची सोय नव्हती. वाटेंत बरीच झाडी होती. अशावेळीं काळापहाड आपल्या हातांचा व पायांचा डोळ्याप्रमाणें उपयोग करीत असे. तो आपले दोन्ही हात पुढें करून आणि पायांनीं प्रत्येक खांचखळग्याबद्दल खात्री करीत पावलें टाकीत होता. पंधरा मिनिटांत तो त्या झाडींतून बाहेर पडला.

त्यानंतर बंगल्याभोंवतालच्या भितीपर्यंत सपाट शेतजमीन होती. भित बरीच जुनाट होती आणि त्यामुळें ती खडबडीत बनली होती. काळापहाडला ती ओलांडून पलीकडे जाणें मुळींच कठीण नव्हतें. पलीकडच्या बाजूला उडी घेतल्यानंतर तो कानोसा घेण्यासाठीं थांबला. पण कुठें कसलीहि हालचाल नव्हती आणि रातकिड्यांच्या आवाजाखेरीज दुसरें कांहींच ऐकूं येत नव्हतें.

ज्या ठिकाणीं तो उतरला होता तेथें भाजीपाल्याची लागवड करण्यांत आली होती. त्यापलीकडे थोडी हिरवळ होती आणि नंतर बंगल्यापर्यंतची जमीन सिमेंटकॉंक्रीटची होती. त्या जमिनीपर्यंत पोहोंचल्यानंतर काळापहाडनें बरोबर आणलेले जाड गरम कपड्याचें आवरण आपल्या दोन्ही बुटांवर चढविलें. नंतर तो त्या खिडकीखालच्या भितीजवळ गेला. आतां चालतांना त्याच्या पावलांचा मुळींच आवाज होत नव्हता.

जवळच तो सांडपाण्याचा पाईप होता. त्या पाइपाला धरून तो माकडाप्रमाणें अगदीं सावकाश वर चढला आणि अखेरीस तो त्या खिडकीजवळ पोहोंचला. त्या ठिकाणीं एका हातानें पाईप पकडून दुसऱ्या हातानें त्यानें आपल्या कमरपट्ट्यांतील एक हत्यार बाहेर काढलें आणि एक–दोन मिनिटांतच त्या खिडकीच्या आंतली कडी बाजूला सरकविली.

नंतर त्यानें ती खिडकी अगदीं सावकाश उघडली आणि त्या अरुंद जागेंतून आपलें सडपातळ शरीर आंत घुसविलें. त्याचे पाय आंतल्या मोरीच्या कांठाला लागले. त्या स्थितींत उभें राहून त्यानें आपलें अर्धे शरीर हळूहळू आंत खेंचलें. त्याच्या शरीरावर जर आणखी थोडेंच मांस असतें तर त्याचा आंत प्रवेश झाला नसता.

तें घर अगदीं शांत होतें. त्यानें हळूंच त्या छोट्या न्हाणीघराचें दार उघडलें. पण त्यापूर्वींच त्यानें आवाज होऊं नये म्हणून त्या दाराच्या बिजागऱ्यांना तेल चोपडलें होतें. परक्या घरांत मध्यरात्रीं त्यानें प्रवेश केला होता. पण साहसप्रिय काळापहाडच्या सर्व शरीरांत जणुं विद्युल्लता संचारली होती. संकटाच्या आणि धोक्याच्या जाणिवेनें तो उल्हसित बनला होता.

कृष्णाकुमारीनें त्याला पाठविलेल्या त्या घराच्या नकाशाचा त्यानें अभ्यास केला होता. त्या न्हाणीघराच्या दारासमोरच चांगली आठ फूट रुंदीची वाट असून दोहों बाजूंच्या खोल्यांतून नोकरांच्या रहाण्याची व्यवस्था केली आहे हें त्याला माहीत होतें. त्या मार्गाच्या टोंकाला जाऊन उजवीकडे वळल्यास

त्याला घनश्यामदासांची हत्याराची खोली लागणार होती आणि त्या खोलीं- तून वाचनालयांत जावें लागलें असतें.

त्या ठिकाणीं कुणीं पहाऱ्यावर असतें तरीसुद्धां त्याला काळापहाडच्या अंधारांतील हालचाली समजल्या नसत्या. वाचनालयांत प्रवेश केल्यानंतर त्यानें आपल्या छोटया टॉर्चचा प्रथमच उपयोग करून ती जागा न्याहाळली. तेथल्या तिन्ही बाजूच्या भितींना पुस्तकांचीं कपाटें टेकलेलीं होतीं. चौथ्या बाजूला दोन खिडक्या होत्या आणि त्या खिडक्यांमधल्या भितीला टेकून एक टेबल ठेवलेलें होतें. टेबलाजवळ दोन खुर्च्या होत्या आणि खिडक्यांवर जाड पडदे सोडलेले होते.

दोन्ही खिडक्यांवरील पडदे व्यवस्थित असून बाहेर प्रकाश दिसणार नाहीं अशी खात्री झाल्यानंतर काळापहाडनें त्या टेबलावरील छोटा दिवा लावला. कृष्णाकुमारींनें माहिती दिल्याप्रमाणें तो त्याच्या डाव्या बाजूच्या पुस्तकांच्या कपाटाकडे गेला. तेथेंच कुठेंतरी ती तिजोरी दडविण्यांत आली होती.

त्यानें तें कपाट बाजूनें ढकलण्याचा प्रयत्न केला, पण तें जागचें हललें नाहीं. तेव्हां त्यानें आपल्या टॉर्चच्या सहाय्यानें सूक्ष्म तपासणी करण्यास सुरु- वात केली. त्या कपाटांत ठेवलेलें मोठमोठाले ग्रंथ कुणीं कधींहि वाचीत नसावें असें दिसत होतें. जेव्हां त्यानें एका खणांतील ग्रंथ बाहेर काढला तेव्हां त्याला तेथे असलेली गुप्त कळ दिसली.

त्यानें ती कळ दाबली त्याबरोबर तें सबंध कपाट दाराप्रमाणें बाहेर आलें. त्या कपाटापाठीमागल्या पोकळींत ती तिजोरी होती. त्यानें दूर उभे राहून त्या तिजोरीचें निरीक्षण केलें तेव्हां तिजोरीला जोडलेल्या विजेच्या तारा त्याला दिसल्या. त्यानें त्या तारा कापल्या आणि तेथें बसविलेलें धोक्याचा इषारा देणारें यंत्र नादुरुस्त केलें.

तिजोरी जुन्या पद्धतीची होती. त्यानें आपल्या पट्ट्यांतील साहित्य बाहेर काढलें आणि ती उघडण्यास सुरुवात केली. त्याला आपलें काम ठरलेल्या वेळेप्रमाणें उरकावयाचें होतें. त्यानें थोडया वेळांतच ती तिजोरी उघडली.

आंतमध्यें बरींच कागदपत्रें होती. कांहीं पोलादी पेटया होत्या. तेथील एका पेटीवर बँकेचें लेबल होतें. त्यानें फक्त तेवढीच पेटी बाहेर काढून ती उघडली. आंत तो जगप्रसिद्ध मोत्यांचा कंठा होता. तो कांहीं क्षण त्या अपूर्व कंठ्याकडे पहातच राहिला. नंतर त्यानें तो आपल्या खिशांत घातला आणि त्याऐवजीं बरोबर आणलेला नकली कंठा त्या पेटींत ठेवून ती बंद केली.

नंतर त्यानें तिजोरी बंद करून कपाट पूर्ववत् बंद केलें आणि तो आनंदानें हंसला. पंचावन्न मिनिटांचा अवधि होता तेवढया अवधींत तो मोटारीकडे जाऊन पुन्हां ती तिजोरी उघडण्यासाठीं तेथें परत येणार होता आणि त्यावेळीं त्याला तेथल्या छोटया न्हाणीघरांत कृष्णाकुमारी भेटणार होती.

' नमस्ते महाराज !'

काळापहाड दचकून मागें वळला. दारांत एक गृहस्थ उभा होता. त्याच्या हातांत एक पिस्तुल होतें.

तो बनाव इतका अचानक आणि अनपेक्षित होता कीं, क्षणभर काळापहाड त्या गृहस्थाकडे टक लावून पहातच राहिला. कृष्णाकुमारीनें त्याचा विश्वासघात केला तर नसेल ना ? पण त्यानें तो विचार लागलींच बाजूला केला. एक वेळ बहिरीससाणा तसें करील, पण कृष्णाकुमारीच्या हातून तसें घडणें शक्य नव्हतें. शिवाय विश्वासघात करण्यांत तिचें स्वतःचेंच अधिक नुकसान झालें असतें. ' नमस्ते !' तो संभावितांप्रमाणें हात जोडून म्हणाला.

' तुझा आवाज सुसंस्कृत आहे.' तो माणूस एक–दोन पावलें पुढें टाकीत म्हणाला, ' पण तुझा हा काळा पेहेराव मोठा विचित्र दिसतो...अरे देवा ! तूं तर काळापहाड !'

' तुझा तर्क बरोबर आहे.' तो म्हणाला.

आंत आलेला गृहस्थ टेबलाजवळ सरकला आणि आपल्या डाव्या हातानें टेलिफोन चांचपडूं लागला. ' ज्याच्याबद्दल वर्तमानपत्रें बरीच ओरड करतात तो तूंच तर ?' तो गृहस्थ म्हणाला.

काळापहाडला फक्त एकच आशा होती. त्याला थोडा वेळ काढावयाचा होता. त्याच्या पाठीमागल्या बाजूला ती तिजोरी होती. पण तेथें इतर कांहीं बचावाचें साधन नव्हतें. तो त्या गृहस्थाच्या लक्षांत येणार नाहीं अशा प्रकारें अगदीं हळूहळू पुढें सरकत होता..

' मला तुझा चेहरा पाहिला पाहिजे. तूं तोंडावरील बुरखा दूर कर.' तो गृहस्थ कठोर स्वरांत म्हणाला. काळापहाडपासून तो सुमारें दहा फुटांवर होता. तो अर्धवट टेबलावर वांकला होता. त्यानें आपला डावा हात टेलिफोनच्या रिसीव्हरवर ठेवला होता. तो छोटया गालिचावर उभा होता आणि त्या गालिच्याचें दुसरे टोंक काळापहाडपासून तीन फुटांवर होतें.

' तुम्हीं माझा चेहरा पाहिलांत तरी ओळखणार नाहीं.' काळापहाड म्हणाला, ' पण आपण कोण तेंहि मला समजलें नाहीं.'

' माझें नांव घनश्यामदास. मी या घराचा आणि तूं तिजोरींतून जें काढून घेतलें आहेस त्याचा मालक आहें. तूं त्या मोत्यांच्या कंठ्यासाठीं आला असणार. जर तूं तो काढून घेतला असशील तर तावडतोब माझ्या स्वाधीन कर.

' मी तो काढून घेण्यापूर्वीच तुम्हीं येथे आलां.' काळापहाड हळूच पुढें सरकत म्हणाला.

' मला याबद्दल खात्री केली पाहिजे. पण नाहीं. मी तपासणीकरितां तुझ्या जवळ यावें अशीच तुझी इच्छा असणार. मी आतां पोलिसांना टेलिफोन करतों. तेच तुझी झडती घेतील.'

घनश्यामदासांनीं टेलिफोनचा रिसीव्हर उचलला आणि काळापहाड आणखी पुढें सरकला.

'तूं आहेस तेथेंच उभा रहा, नाहींतर मला पिस्तुल झाडावें लागेल.' घनश्यामदास म्हणाले.

काळापहाडचा पाय आतां त्या गालिच्याला स्पर्श करीत होता. तो म्हणाला, 'पण तुम्हीं ऐनवेळीं येथें कसें आलांत ?'

'ती एक गंमत आहे. माझी दाढ दुखूं लागली म्हणून मी खालीं आलों.' घनश्यामदास म्हणाले, 'मला एक पुस्तक हवें होतें. मी दाराजवळ आलों तेव्हां मला आंतला प्रकाश दिसला आणि मी येथून जाण्यापूर्वीं दिवा मालविला होता, हें मला पक्कें आठवत होतें. कुणीतरी चोर शिरला असावा हेंच तो प्रकाश मला सांगत होता. सुप्रसिद्ध काळापहाड केवळ माझ्या दाढदुखीमुळें पकडला गेला ही गंमतच म्हणावयाची !'

'गंमत तर खरीच.' काळापहाड म्हणाला. पण आतां त्यानें आपले दोन्हीं पाय गालिच्याच्या टोंकाजवळ व्यवस्थित आणले होते.

'हरि, त्वरा कर, पकड त्याला.' काळापहाड आपले हात वर उचलून मोठ्यानें म्हणाले.

'ही अगदींच पुळचट कल्पना आहे.' आजूबाजूला न पहातां घनश्यामदास म्हणाला, 'तुझ्यासारखा बुद्धिमान चोर कांहीं निराळीच शक्कल काढील असें मला वाटलें होतें.'

'असली शक्कल कीं काय ?' काळापहाडनें विचारलें आणि त्याचवेळीं त्यानें गालिच्याचें एक टोंक दोन्हीं पायांत अडकवून पाठीमागें उडी घेतली. त्यामुळें घनश्यामदासांच्या पायाखालचा गालिचा खेचला गेला आणि ते जोरानें खालीं पडले. त्यावेळीं त्यांचें डोकें टेबलाच्या कांठावर आपटलें आणि त्यामुळें ते बेशुद्ध झाले.

काळापहाड लागलींच उभा राहिला. त्याच्या वेळापत्रकांतील कांहीं मोलाचीं मिनिटें या अचानक उद्‌भवलेल्या अडथळ्यामुळें निष्कारण खर्ची पडली होतीं. त्यानें घनश्यामदासांचें तें अवजड धूड खेंचीत बाजूच्या खोलींत नेलें. त्यांच्याच रुमालाचा बोळा त्यांच्या तोंडांत कोंबला. नंतर त्यांचे हात-पाय बांधले व त्यांना तेथल्या एका पडद्याआड लपविलें.

नंतर तो पुन्हां वाचनालयांत गेला. त्यानें तेथला गालिचा सारखा केला. नुकत्याच झालेल्या त्या झटापटीचीं सर्व चिन्हें नाहींशी करून तो त्या न्हाणीघरांतील खिडकींतून बाहेर पडला आणि शक्य त्या त्वरेनें मोटारीकडे गेला.

त्यानें मोत्यांचा कंठा मोटारींतीलच खणांत ठेवला आणि तो पुन्हां आल्या वाटेनें बंगल्याकडे परतला. कृष्णाकुमारीनें ठरविलेली वेळ झाली होती. पांच मिनिटांनंतर त्या अरुंद खिडकीवाटें त्यानें दुसऱ्यांदा त्या घरांत प्रवेश केला.

पण त्याला कृष्णकुमारी तेथें आढळली नाहीं.

कित्येक मिनिटें निघून गेलीं तेव्हां आपला कांहीं समजुतीचा घोटाळा झाला नसेल ना असें त्याला वाटलें. कदाचित् कृष्णाकुमारी वाचनालयांत तर त्याची वाट पहात नसेल ना ? पण आपण न्हाणीघरांत भेटूं असें ती म्हणाली होती अशी त्याची खात्री होती.

आणखी पंधरा मिनिटें वाट पाहिल्यानंतर त्यानें वाचनालयांत पुन्हां प्रवेश करण्याचें ठरविलें. तेथलें दार बंद होतें. आपण तेथून निघून जाण्यापूर्वी तें बंद केल्याचें त्याला आठवत नव्हतें. या खेपेला तें उघडतांना किंचित् वाजलेंहि आणि त्याबरोबर काळापहाड सावध झाला. नेहमीं त्याच्या सहाय्याला धांवून येणारें त्याचें अंतर्मन कांहींतरी कुठें बिघडलें आहे असें त्याला सुचवीत होतें. पण काय घडलें असावें याची तो कल्पना करूं शकत नव्हता.

त्यानें आपल्या मनांतली सर्व भीति दूर केली आणि कोणत्याहि संकटाशीं सामना देण्याच्या बेदरकारीनें तो पुढें झाला. पण त्यानें एक पाऊल पुढें टाकतांच जमिनीपासून दोन फुटांवर दारांत आडव्या बांधलेल्या दोरीला अडखळून तो जोरानें खालीं आपटला.

तो उठून बसला होता तोंच दोघां इसमांनीं त्याचे हात पकडले आणि तिसऱ्या माणसानें त्याच्या तोंडावर टॉर्चचा प्रकाश फेंकला. नंतर ओळखीचा आवाज ऐकू आला, 'काळापहाड ?'

तो आवाज ओळखतांच काळापहाडच्या विचारचक्राला जोराची चालना मिळाली त्या रात्रीं पंढरीनाथ तेथें कसा आला असावा ? त्या दोघांची लठ्ठालठ्ठी लावण्याच्या खुनशी इराद्यानें कृष्णाकुमारीनें त्याला मुद्दाम तर फसविलें नव्हतें ? पण त्यामुळें तिचा काय फायदा झाला ? पंढरीनाथला तिचाहि संशय येणार होता आणि तसें घडल्यास तो तिला त्या चोरीचा हिस्सा खचितच देणार नव्हता पण कृष्णाकुमारी कुठें होती ? आतांपर्यंत तरी तिच्या अस्तित्वाची कांहींच निशाणी आढळली नव्हती.

'काळापहाड, तूं येथें काय करीत आहेस ?' पंढरीनाथानें विचारलें, 'त्या रात्रीं दाराबाहेर उभें राहून तूं आमचें बरेंच बोलणें ऐकलें होतेंस तर? हरी, हा दोष तुझा गाफिलपणाचा आहे. आजच्या रात्रींच तिजोरी उघडण्याचें आपण तिघांनीं ठरविलें नसतें तर काळापहाडनें सर्व घोटाळा केला असता!'

'त्या तिघांनीं ठरविलें होतें !' काळापहाड मनांत म्हणाला. त्याचा अर्थच असा होता कीं, कृष्णाकुमारीकडून सर्व माहिती मिळाल्यानंतर तो तिला फसविण्याचा प्रयत्न करीत होता. केवळ कृष्णाकुमारीनेंच विश्वासघात करण्याचा प्रयत्न केला नव्हता तर बहिरी ससाणाहि तेंच करीत होता ! त्यामुळें काळापहाड मोठ्यानें हंसूं लागला.

'तुला हंसायला काय झालें ?' त्याच्या बरगडींत आपलें पिस्तुल खुपसून

जग्या रागानें म्हणाला, 'पण कृष्णाकुमारीचें काय ?' त्यानें विचारलें: 'तुम्हीं आज रात्रीं येणार हें तिला माहीत आहे का ?'

'तिला माहीत नसेल तर त्यांत बिघडलें कुठें ? तिनें मागें मला फसविलें होतें त्याबद्दल तिला चांगलीच अद्दल घडली पाहिजे. मी तिलाहि माझ्या प्रकरणांत नाक खुपसूं नको असें बजावलें होतें.'

'मी याचा निकाल लावूं काय ?' हरीनें आशेनें विचारलें.

'गप्प बैस हरि !' पंढरीनाथ कठोर स्वरांत म्हणाला, 'काळापहाड तूं येथें आलाच आहेस तेव्हां तुलाच आमच्यासाठीं तिजोरी उघडावी लागेल. नंतर मी तुझ्यासाठी अशी युक्ति योजणार आहें कीं, तूं पुन्हां कधींहि आम्हांला त्रास देऊं शकणार नाहीं. चलारे, न्या त्याला तिजोरीकडे आणि ती उघडण्यास त्याला भाग पाडा.'

ते त्याला तिजोरीकडे खेचीत असतांना काळापहाडनें मुळींच गडबड केली नाही. तिजोरी उघडल्यामुळें जरी पंढरीनाथला नकली मोत्यांचा कंठा मिळणार असला तरी त्यानें दिलेली धमकी जर खरी करून दाखविली तर काळापहाड खात्रीनें संकटांत सांपडणार होता आणि बहिरी ससाणा धूर्त होता आणि आपले शब्द खरें करणारा होता.

काळापहाडनें पुस्तकांचें कपाट बाजूला सरकविण्यांत कांहीं वेळ घालविला. नंतर त्यानें धोक्याचा इषारा देणाऱ्या तारा पुन्हां कापल्या.

'हुषार माणूस !' त्याच्याकडे बारकाईनें पहाणारा पंढरीनाथ म्हणाला, 'मला खरोखरच वाईट वाटतें !'

काळापहाड अगदीं शांतपणें काम करीत होता. ते तिघेहि त्याच्याकडे बारकाईनें पहात होते. त्या परिस्थितींतून कसें निसटावें याबद्दल तो मनांत सारखा विचार करीत होता. मोत्यांचा कंठा हस्तगत केल्यानंतर बहिरी ससाण्याचा काय करण्याचा उद्देश असावा ? तो त्याला तिजोरींत अडकविणार होता कीं, पोलिसांच्या स्वाधीन करणार होता ?

बहिरी ससाणा अधीर झाला होता. तो म्हणाला, 'ती जुन्या पद्धतीची तिजोरी उघडण्यास तुला इतका वेळ कां झाला ? चल लवकर आटप.'

आतां आपणांला आणखी वेळ काढतां येणार नाहीं, हें लक्षांत आल्यामुळें काळापहाडनें तिजोरी उघडली. पंढरीनाथानें आपल्या दोघां साथीदारांना त्याच्यावर नजर ठेवण्यास बजावून तो त्याला बाजूला ढकलून पुढें झाला. त्यानें तिजोरींतून नेमकी बँकेचें लेबल असलेली पेटी बाहेर काढली. आपल्या-जवळच्याच चावीनें त्यानें ती क्षणार्धांत उघडली आणि आंतील कंठा समाधानाचा सुस्कारा सोडीत खिशांत घातला.

आणि त्याचवेळीं बंगल्यांत कुठेंतरी मोठ्यानें घंटानाद होऊं लागला.

६

ते चौघेजण एकमेकांकडे पहात राहिले. जग्या आणि हरि यांनीं अभद्र शिव्या देण्यास सुरुवात केली. ते घाबरले होते. पण बहिरीससाण्यानें त्यांना हुकमी आवाजानें गप्प बसविलें आणि काळापहाडकडे पाहून तो तोंड वेडें-वांकडें करून हंसला.

'आतां ज्यानें त्यानें आपापल्यापुरतें पहावें.' त्यानें हुकूम सोडला.

काळापहाडला बहिरीससाण्याबद्दल आदर वाटला. तो त्याच्याप्रमाणेंच संकटाच्या वेळीं न डगमगतां लढणारा बहाद्दर होता. त्याला नीतितत्त्वाची चाड नसे. तो प्रसंगीं निर्दय बनत असे. तो समोरासमोर लढणारा होता. त्यानें या खेपेला आपल्याप्रमाणेंच पळून जाण्याची संधि दिली होती. काळापहाड-बरोबरच्या द्वंद्वयुद्धांत तिसऱ्याची मदत घेण्याची त्याची इच्छा नव्हती.

पण तो धोक्याचा इषारा देणारा घंटानाद कसा होऊं लागला? हें कृत्य कृष्णाकुमारीचें असावें काय? काळापहाडला तसें वाटेना. स्वतःच्या स्वार्थाकरितां ती जरी प्रतिस्पर्ध्यांना हाणून पाडण्यास तयार झाली होती आणि बहिरीससाण्याप्रमाणें जरी तिला नीतीची चाड नसली तरी तें सबंध घर जागें करण्यांत तिचा कांहीं फायदा नव्हता.

नाहीं, तें दुसऱ्या कुणाचें तरी काम होतें. आणखी कुणीतरी चोरानें त्या दाराच्या खिडकीवाटें आंत शिरण्याचा प्रयत्न तर केला नसेल? पण तसें घडण्याची फारशी शक्यता नव्हती. नंतर काळापहाडला घनश्यामदासांची आठवण झाली ते आतां शुद्धीवर आले असावेत आणि त्यांनींच कोणत्यातरी युक्तीनें धोक्याचा इषारा देणाऱ्या यंत्राला चालना दिली असावी.

काळापहाड दाराजवळ जाण्यापूर्वी त्याला अनेकांच्या बोलण्याचे व हाल-चालींचे आवाज ऐकूं आले.

'या घरांतील माणसांना झोंपच नसावी!' बहिरीससाणा म्हणाला, 'तं आमच्या पाठीमागून ये. आम्ही भोजनाच्या खोलीच्या खिडकीला शिडी लावली आहे.'

'तुम्ही त्याची चिंता करतां कशाला? चला!' जग्या म्हणाला.

वाचनालयाच्या पलीकडच्या दारांतून बाहेर पडल्यानंतर पंढरीनाथ आणि त्याचे सहकारी तेथल्या कोंपऱ्यांतल्या खोलीकडे धांवले. काळापहाड त्यांच्या-मागून जाणार होता तोंच तेथल्या जिन्यावरून कांहीं माणसें वर आलीं आणि त्याच्या रोखानें धांवलीं.

त्या तिघांमागून जाण्याचा आपला मार्ग बंद झाला आहे असें दिसून येतांच काळापहाड मागें फिरला आणि वाचनालयांत प्रवेश करून त्यानें दार आंतुन बंद केलें. नंतर तो पलीकडच्या हत्यारांच्या खोलींतून बाहेर पडला.

त्यानें तेंहि दार बंद केलें आणि पाठलाग करणाऱ्यांना कांहीं काळ थोपवून धरण्याच्या इराद्यानें हातीं लागेल तें सामान त्या दाराला टेंकून ठेवलें.

गोंगाटावरून असें दिसत होतें की पाठलाग करणारे पंढरीनाथ आणि मंडळी यांच्याकडे दुर्लक्ष करून त्याच्याच मागें धांवत होते. प्रसंग मोठा आणीबाणीचा आहे हें जाणून काळापहाड वेगानें त्या स्नानगृहांतील छोट्या खिडकीकडे धांवला.

आतां तळमजल्यावरील त्या बाजूच्या खिडक्या उघडण्यांत आल्यामुळें खिडकीखालीं भरपूर प्रकाश पसरला होता. इतकेंच नव्हे तर कांहीं माणसें बाहेर उभीं होतीं आणि उंच मान करून त्याच खिडकीकडे पहात होतीं.

त्या खिडकीच्या पडद्याआड उभा असलेला काळापहाड तेथून निसटावयाचें कसें याचा विचार करीत होता त्या घरासभोंवतीं मंडळींची गर्दी वाढत होती; निदान एकाच्या हातांत तरी जोडनळीची बंदूक होती.

त्या खिडकींतून खालीं उतरतां येत नव्हतें वर चढावें तर ती भिंत इतकी उंच होती कीं, सरड्याचेंहि पाय ठरले नसते. त्यांच्या पाठीमागल्या बंद दारावर कुऱ्हाडीचे घाव बसत होते कोणत्याहि क्षणीं अनेक माणसें आंत घुसणार होतीं आणि त्यानंतर सुप्रसिद्ध रहस्यकथा लेखक चंद्रवदन हाच काळापहाड आहे हें जगजाहीर होणार होतें.

फक्त एकच मार्ग होता. तो म्हणजे खिडकीबाहेरच्या धारेवर उभे राहून आणि चार फूट उंच उडी मारून वरच्या खिडकीचा कांठ पकडावयाचा. जर उडी साधली नाहीं किंवा हात निसटला तर इतक्या उंचावरून खालीं कोसळल्यानंतर मृत्यु निश्चित होता.

त्यानंतर त्याला पूर्वी त्याच्या नजरेंतून सुटलेली एक गोष्ट दिसली. त्या खिडकीखालीं सुमारें सहा इंच बाहेर आलेला एक खिळा होता. त्याच्याजवळ दोरी असती तर त्यानें झोल टाकून तिचा फांस त्या खिळ्यांत अडकवला असता. खालीं जमा झालेले लोक आतां त्या खिडकीजवळ उभ्या असलेल्या काळ्या आकृतीकडे पहात होते. त्याची धडपड पाहून ते ओरडले.

त्याच वेळीं एक मोटार तेथें आली आणि सहा पोलीस खालीं उतरून घराकडे धांवले. तेव्हां जमा झालेल्या बघ्यांनीं पुन्हां आरोळी ठोकली. त्या पोलिसांबरोबर एक साध्या वेषांतील अधिकारी होता. त्यानें वर पाहिलें आणि त्या काळ्या आकृतीला ओळखलें.

'काळापहाड !' तो आश्चर्यानें म्हणाला.

तेथें जमा झालेल्या मंडळींनीं तें नांव ऐकलें आणि कांहीं क्षण सर्वच गप्प बसले. पण नंतर ते पुन्हा ओरडूं लागले. इतकेंच नव्हे तर कांहीं गंमतीनें काळापहाडचा जयजयकार करूं लागले. अत्यंत रहस्यमय डाकू काळापहाड कीं, ज्याच्या साहसाचीं वर्णनें त्यांना अधूनमधून वर्तमानपत्रांतून वाचावयास

मिळत होतीं. जो गरिबांच्या वाटेला जात नव्हता, पण श्रीमंतांची खोड मोडीत होता. ज्याला पकडण्याचे पोलीस खात्याचे सर्व प्रयत्न विफल ठरले होते, तोच काळापहाड त्या घरांत शिरला होता.

लोकांची उत्सुकता आणि उत्साह अनिवार वाढला होता. काळापहाड आतां पोलिसांच्या हातीं सांपडणार होता त्यामुळें ते नाचत होते, ओरडत होते आणि त्यामुळेंच त्या गर्दीला मागें हटवून आपलें काम साधणें पोलिसांना कठीण जात होतें.

काळापहाडनें पडदा खेंचला. त्या पडद्याला लांब गुळगुळीत काठी होती आणि मजबूत व लांब दोरीहि होती. दार मोडण्याच्या बेतांत होतें. वरची एक फळी तुटली होती त्यामुळें दार फोडणारांचे घामाघूम चेहरे दिसत होते. प्रत्येकजण मिळेल त्या बाजूच्या दारावर प्रहार करीत होता. त्यांच्या उत्साहातिरेकानें कुणालाच धड काम करतां येत नव्हतें व त्यामुळें दार फोडावयास उशीर होत होता हें काळापहाडचें सुदैवच म्हणावयाचें.

त्यानें अतिशय त्वरेनें पडद्याच्या कांठाला वरच्या बाजूला एक खांच पाडली. दोरीचा निसरडा फांस बनवून दोरी त्या कांठाच्या खांचेंत अडकविली. नंतर तें साहित्य खिडकीजवळ ठेवून तो तेथल्या दिव्याकडे गेला आणि त्यानें फ्यूज उडविला.

एकाएकीं सर्वत्र अंधार पडतांच दारावर हल्ला करणारे गोंधळले. कांहींच्या हातांत कुऱ्हाडी होत्या आणि आपण एकमेकांना जखमी करूं या भीतीनें ते थांबले. तेथें जो प्रचंड कोलाहल माजला होता तो एकदम शांत झाला. तेवढ्या अवधींत काळापहाड खिडकीच्या कांठावर उभा राहून आणि आपलें अर्धें अंग बाहेर काढून काठींत अडकविलेला दोरीचा फांस त्या वरच्या खिळ्यांत अडकविण्याचा प्रयत्न करीत होता त्यावेळचा प्रत्येक क्षण त्याच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचा होता.

अचानक पडलेल्या अंधारामुळें खालीं झालेल्या गर्दींतहि गोंधळ माजला होता. त्यांतील एखाद्याजवळ टॉर्च असेल आणि तो वरच्या खिडकीवर प्रकाश सोडील अशी काळापहाडला भीति वाटत होती. तसें झालें तर पोलिसांना तो पुढें कोणती हालचाल करणार हें समजणार होतें.

डाव्या हातानें खिडकीचा कांठ पकडून उजव्या हातांतील काठीनें दोरीचा फांस वरच्या खिळ्यांत अडकविण्याचा त्यानें तीन वेळां प्रयत्न केला. तो फसला. त्यामुळें एक तर ती काठी अपुरी असावी किंवा तो खिळा भलतीकडे असावा असें वाटूं लागलें. त्याच्या पाठीमागल्या दारावर पुन्हां कुऱ्हाडीचे प्रहार होऊं लागले आणि तें कोणत्याहि क्षणीं कोसळण्याची भीति होती.

ज्यावेळीं त्यानें तेथून बाहेर पडण्याची सर्व आशा सोडली त्याचवेळीं दोरीचा फांस त्या वरच्या खिळ्यांत अडकला. काठी खोलींत फेंकून आणि

दोरी खेंचून त्यानें तो फांस घट्ट बसविला आणि त्या खिळयामध्यें आपलें वजन सहन करण्याची शक्ति असूं दे अशी आपल्या इष्ट देवताची प्रार्थना करून तो दोरीला धरून वर चढूं लागला.

तो थोडें अंतर वर चढला नाहीं तोंच दार कोसळून पडण्याचा आवाज झाला. त्यानें वरच्या खिडकीच्या कांठाला हात घातला तेव्हां त्याला त्या खालच्या खोलींत घुसलेल्यांच्या तोंडून बाहेर पडलेले आश्चर्योद्गार ऐकावयास मिळाले. ऐन कोंडींत पकडलेली शिकार आपल्या हातून निसटली याबद्दल त्यांना आश्चर्य वाटलें होतें आणि त्यांची निराशा झाली होती.

पण त्याचवेळीं त्याला वाटणारी भीति खरी ठरली. कुणीतरी खालून टॉर्चचा प्रकाश त्या खिडकीवर सोडला. नंतर तो प्रकाश त्याच्या काळया आकृतीवर स्थिर झाला आणि त्याबरोबर अनेकजण मोठयानें ओरडले.

काळापहाडनें उजव्या हातांत पकडलेली दोरी सोडली आणि वरच्या खिडकीचा कांठ दोन्ही हातांत पकडून त्यानें गोलांटी उडी घेतली आणि तो वरच्या अंधाऱ्या खोलींत आदळला.

त्या लहानशा दोरीच्या सहाय्यानें वर चढणाऱ्या काळापहाडला जेव्हां पोलिसांनीं आणि जमावानें पाहिलें तेव्हां तो कोणत्याहि क्षणीं खालीं आपटणार अशा अपेक्षेनें ते सर्व स्तब्ध होते. पण जेव्हां ती गोष्ट शक्य झाली तेव्हां इन्स्पेक्टर तेथें येईपर्यंत पोलिसांचें नेतृत्व करणारा जमादार शामराव हा एकदम सावध झाला.

काळापहाडसारख्या नामांकित चोराला पकडलें तर शामरावाला खात्रीनें बढती मिळणार होती. तो हाताखालच्या शिपायांना ओरडून म्हणाला,' पाताडे आणि राणे, तुम्ही या बाहेर गोळा झालेल्या मूर्खांना संभाळा. शेळयामेंढयाप्रमाणें सैरावैरा धांवूं देऊं नका. या घरासभोंवतीं त्यांची सांखळी तयार करा आणि माझ्याबरोबर चला.'

शामराव शिपायांसह धांवतच जिन्याजवळ गेला, पण तेथेंच थांबला. 'भोसले, तू फ्यूज दुरुस्त करण्याचा प्रयत्न कर. घरांतील कुणीतरी माणूस तुला जागा दाखवील. फाळके, काटे, या घराला किती जिने आहेत ?'

'साहेब, दोन आहेत.' घरांतील नोकरांपैकीं कुणीतरी म्हणाले, 'एक हा आणि दुसरा पाठीमागचा.'

'पाठीमागल्या जिन्याचें दार बंद करून घ्या.' शामरावानें हुकूम सोडला. 'काटे, तूं नोकरांना जमवून त्या जिन्यावर पहारा कर. फाळके, तूं या जिन्याजवळ उभा रहा. आम्ही एकदम वरच्या मजल्यावर जातों आणि तेथून काळापहाडचा शोध करीत खालीं येतो. तो कुठेंतरी सांपडणारच.'

अशाप्रकारें शामरावानें अगदीं व्यवस्थित शोध करण्यास प्रारंभ केला. घराच्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या काळापहाडनें खिडकींतून खालीं पाहिलें.

आतां तेथें जमलेल्या मंडळीचें घरासभोंवतालीं कडें निर्माण करण्यांत येत होतें. त्या कड्याच्या पलीकडच्या हिरवळीवर घनश्यामदासांना शुद्धीवर आणण्याचा दोघे नोकर प्रयत्न करीत होते. त्यांना गरम कॉफी पाजण्यांत यत होती शेठजींचा त्यावेळचा अवतार पाहून काळापहाडला त्याहि परिस्थितींत हसूं आलें.

पोलिसांना मदत करणाऱ्या नोकरांशिवाय बाकीच्या सर्वांना त्या बंगल्याबाहेर काढण्यांत आलें होतें. पोलिसांनीं तिसऱ्या मजल्यापासून व्यवस्थित शोध करण्यास सुरुवात केली होती. जिन्याचें खालचें टोंक दाबून धरण्यांत आलें होतें. बाहेर शेंकडों डोळे जागरूकतेनें घरावर नजर ठेवीत होते. त्यामुळें तेथून निसटण्याची फारच थोडी आशा होती.

कोणत्याहि प्रकारें तळमजला गांठणें आवश्यक होतें. तें शक्य झालें तरच त्याला घराबाहेर पडण्याचा प्रयत्न करतां येणार होता. घरांत अद्याप अंधार होता पण कोणत्याहि क्षणीं तेथील दिवे दुरुस्त होण्याची शक्यता होती. पुन्हां त्याला फ्यूज उडवितां आली असती पण ती या खेपेला विरुद्ध पक्षानें लागलीच दुरुस्त केली असती शामराव मोठा हुषार दिसत होता. त्यानें वरच्या मजल्यावर तपासणीचें काम सुरूं केलें, हें पावलांच्या आवाजावरून स्पष्ट दिसत होतें.

त्याला कल्पनांमागून कल्पना सुचत होत्या. आणि प्रत्येक कल्पना अपरिहार्य म्हणून तो बाजूला फेकीत होता. वरच्या मजल्यावरील तपासणीचें काम संपल्यानंतर पोलीस खालीं येणार होते. त्यामुळें त्याला एक तर तिसऱ्या मजल्यावर जावें लागणार होतें. पण तेवढ्यानें भागणार नव्हतें. कारण पुन्हां पोलीस त्याहि मजल्यावर येणार होते.

कुणीतरी तो उभा होता, त्या खोलीच्या खिडकीवर टॉर्चचा प्रकाश सोडला आणि त्यामुळें त्याला ती खोली पाहतां आली. घनश्यामदासांच्या कारभाऱ्याची ती खोली असावी असें तेथल्या सामानावरून आणि टेलिफोनवरून दिसलें. काळापहाड मोठ्यानें हंसला. त्याला एक अशक्य कोटींतील कल्पना सुचली होती. ती कल्पना अंमलांत आणण्याच्या मार्गांत अनेक अडचणी होत्या. पण काळापहाड कधींच अडचणींना डगमगला नव्हता.

तिसऱ्या मजल्याच्या जिन्याजवळ शामरावानें आपल्या सर्व मदतनिसांना गोळा केले. काळापहाड तेथें आला नाहीं अशी त्याची खात्री झाली होती, तिसऱ्या मजल्यावर जाण्याचा तो आपल्या माणसांना हुकूम देणार होता तोंच एक गृहस्थ धांपा टाकीत वर आला. त्याच्या पाठीमागें घनश्यामदासांचा मुख्य नोकर होता. तो गृहस्थ म्हणजे शामरावाचे वरिष्ठ अधिकारी इन्स्पेक्टर काळे होते.

शामरावानें सर्व हकीकत सांगितल्यानंतर इन्स्पेक्टर काळे म्हणाले, ‘तो

माणूस या मजल्यावर नाहीं अशी तुझी खात्री आहे ना ?'

आपलें श्रेय हिरावून घेण्यासाठीं ऐनवेळीं इन्स्पेक्टर काळे तेथें आले म्हणून कांहींशा नाराजीनें शामराव म्हणाला, 'होय, साहेब.'

'जा शामराव, तूं आतां खालच्या मजल्यावर जाऊन व्यवस्थित तपास कर.' इन्स्पेक्टर म्हणाले.

ते अर्ध्या जिन्यावर पोहोंचले नाहींत तोंच वर टेलिफोनची घंटी वाजली. 'टेलिफोन कुठें आहे ?' काळेंनीं मुख्य नोकराला विचारलें, 'बहुधा सुपरिंटेंडेंटसाहेबांचा टेलिफोन असावा. शामराव, तूंहि माझ्याबरोबर चल. कदाचित् साहेबांना सविस्तर माहितीची गरज लागेल.'

ते पुन्हां वर गेले. नोकरानें टेलिफोन दाखविला. इन्स्पेक्टरांनीं रिसीव्हर कानाला लावला आणि ते म्हणाले, 'मी काळे बोलत आहें.'

'तो बंगल्याची तपासणी करणारा गाढव कुठें आहे ? मला ताबडतोब बोलावयाचें आहे.'

काळेंनीं तत्परतेनें रिसीव्हर शामरावांच्या हातीं दिला आणि ते म्हणाले, 'ही तुझी काय भानगड आहे ती तूंच पहा.'

'मी शामराव बोलत आहे, साहेब.'

'तुम्ही अद्याप त्या घरांतच काय करीत आहांत ? अद्याप तुम्हांला तो सांपडला नाहीं ?'

शामरावचा चेहरा उतरला. त्यानें घनश्यामदासांचा आवाज ओळखला होता. शेठजीचें सरकार-दरबारीं वजन होतें. तो हळूंच म्हणाला, 'साहेब, तुम्हीं रागावलां आहांत. आमचीं कांहीं चूक झाली आहे काय ?'

'चूक ? घोडचूक झाली आहे' शेठजीची गर्जना ऐकूं आली. 'तो पाजी माणूस माझेच कपडे घालून सरळ दारांतून बाहेर पडला आणि त्याला कुणीं अडविलें नाहीं. तुम्ही पोलीस खात्यांत शिरला कशाला ? तो सुरूच्या बागेकडे पळत सुटला आहे—'

शामरावानें रिसीव्हर खालीं आपटला आणि तो इन्स्पेक्टरकडे वळून घाईघाईनें म्हणाला, 'साहेब, तो निसटला ! सुरूच्या बागेकडे पळत सुटला आहे. ती बाग आहे कुठें ?'

'घराच्या उजव्या बाजूला लहानशी बाग आहे.'

सर्व मंडळी जिन्यावरून धांवत सुटली. धांवतांना इन्स्पेक्टर काळे म्हणाले, 'आतां त्या बागेभोंवतीं वेढा घातला पाहिजे.'

धांवणाऱ्या मंडळींना घरापासून कांहीं अंतरावर अंधारांत चांचपडत असलेली एक व्यक्ति दिसली आणि इन्स्पेक्टरबरोबर धांवणारा नोकर म्हणाला, 'माझ्या मालकाच्या अंगावर हेच कपडे होते !'

'तर मग तोच काळापहाड !' शामराव म्हणाला.

सर्वजण त्या व्यक्तीवर तुटून पडले आणि खालीं पाडण्यांत आलेल्या त्या माणसाच्या तोंडावर टॉर्चचा प्रकाश सोडीत शामराव म्हणाला, 'हरामखोर, शेवटीं तुला मींच पकडलें--अरे देवा! हे तर घनश्यामदास!'

शेठजी धांपा टाकीत संतापानें म्हणाले, 'हा कोणता शहाणपणा आहे? माझ्यावर कां हल्ला चढवितां?'

'मालक, त्यांना वाटलें तुम्हीच काळापहाड.' नोकर म्हणाला.

'मी?' संतापानें शेठजी म्हणाले, 'मी त्या पाजी चोरासारखा दिसतों, असें तुमचे म्हणणें आहे? मी आतां सुपरिंटेंडेंटसाहेबांना कळवितों.'

'पण साहेब. तुमचे कपडे घालून तो फरारी झाला असें तुम्हीच टेलिफोन करून कळविलें ना?' शामराव लाचारीनें म्हणाला. इन्स्पेक्टर काळे लगबगीनें बाजूला झाले होते.

आतां मात्र शेठजींचा राग अनावर झाला. ते ओरडून म्हणाले, 'गाढवा! तूंच मला घराबाहेर काढलेंस आणि मी टेलिफोन करणार कसा?'

० ० ० ०

काळापहाड आनंदानें गाणें गुणगुणत मोटार चालवीत होता. सुदैवानें चांगली साथ दिल्यामुळेंच त्या बिकट प्रसंगांतून त्याची सहीसलामत सुटका झाली होती.

घनश्यामदासांबरोबर बोलण्याची संधि मिळाल्यामुळेंच तो त्यांच्या आवाजाची हुबेहूब नक्कल करूं शकला होता आणि दुसरें, ज्या खोलींत त्यानें प्रवेश केला होता तेथें टेलिफोन होता.

मुंबईच्या हद्दींत प्रवेश केल्यानंतर काळापहाडनें ती चोरलेली मोटार एके ठिकाणीं उभी केली. आतां फक्त मोटारीच्या खणांतून तो मौल्यवान कंठा काढून घेणें एवढेंच काम शिल्लक राहिलें होतें. त्यानें त्या खणांत हात घातला पण कंठाऐवजीं त्याच्या हाताला एक कागद लागला.

त्यानें तो कागद टॉर्चच्या प्रकाशात पाहिला. त्यावर लिहिलें होतें--

"प्रिय काळापहाड,

"माझा तर्क अगदीं अचूक होता हें तुम्हींहि कबूल कराल. तुम्ही माझ्या जागीं असतां तर जें केलें असतें तेंच मीं केलें आहे आणि एरव्हीं तर तुम्ही मला फसविणार होतां हें सिद्ध झालेंच आहे.

"माझ्या पत्रांत बरा वाजल्यानंतर त्या घरांत शिरण्यास तुम्ही हरकत नाहीं, असें मीं लिहिलें होतें आणि त्यानंतर पावणेदोन वाजतां मी तुम्हांला भेटणार होतें, पण मला फसविण्याच्या उद्देशानें तुम्ही आधींच तेथें याल अशा तर्कानें मी बंगल्याच्या पाठीमागें दडी मारून बसलें होतें.

"तुम्हीं कंठा घेऊन घरांतून बाहेर पडल्यानंतर मी तुमच्या मागेंच होतें. तुम्हीं नकली कंठा खिशांत घालून पुन्हां वाड्याकडे जातांच मी खरा कंठा

काढून घेऊन पसार झाले. तुम्हीं वाईट वाटून घेण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण यालाच म्हणतात जशास तसें.

" पण तुम्ही मला केलेल्या मदतीबद्दल मला तुमचे आभार मानलेच पाहि- जेत. तुम्हांला तुमच्या आवडत्या मैत्रिणीची आठवण राहील ना ?"

काळापहाडनें प्रथम तोंड वेडेवांकडे केलें. नंतर तो हंसूं लागला.

७

दुसऱ्या दिवशीं सर्व लोकप्रिय वर्तमानपत्रांनीं मोठाल्या मथळ्याखालीं त्या धाडसी चोरीची हकीकत प्रसिद्ध केली जीं शिष्ट वर्तमानपत्रें होतीं त्यांनीं चार-दोन छोटया परिच्छेदांत त्या घटनेचें वर्णन केलें होतें. पण कांहींनीं त्या घटनेला अतिशय भडक प्रसिद्धि दिली.

दैनिक 'समाचार' हें वृत्तपत्र या दुसऱ्या वर्गातलें होतें आणि त्याचा प्रमुख वार्ताहर चितु वांद्रेकर हा एक हिकमती माणूस होता. वांद्रेकरानें लिहिलेला लेख खालीलप्रमाणें होता--

अपूर्व दरोडा

" घनश्यामदासांच्या अमूल्य मोत्याच्या कंठयाची चोरी.

" गेल्या रात्रीं कल्याणजवळील शेठ घनश्यामदासांच्या बंगल्यामध्यें कित्येक चमत्कारिक प्रकार घडले आणि तेथील प्रत्येक माणूस अगदीं खडखडीत जागा असतांना अशक्य वाटणारी गोष्ट प्रत्यक्षांत घडली आणि ज्या कंठयाचा विमा उतरविण्यास कंपन्या धजत नसत त्या घनश्यामदासांच्या जगप्रसिद्ध मोत्यांच्या कंठयाची चोरी झाली. विशेष गंमत म्हणजे चोरी करणारा माणूस पोलिसांच्या ओळखीचा होता आणि तरीहि पोलीस त्याला अटक करूं शकले नाहींत. आणि काळापहाडनें पोलिसांच्या नाकावर टिच्चून आपल्या मस्तकावर आणखी एक यशाचा तुरा खोंवला.

" काळापहाड हें नांव कुणाला माहीत नाहीं ? गुन्हेगारीच्या क्षेत्रांत त्यानें वेळोवेळीं मिळविलेल्या नेत्रदीपक विजयांची कुणाला माहिती नाहीं ? निदान या पत्रानें तरी अनेकवेळां काळापहाडच्या आश्चर्यजनक कारकीर्दीची माहिती वाचकांना कळविली आहे. अनेक वर्षें हा काळापहाड विजयावर विजय मिळवीत आहे आणि पोलीस त्याला पकडण्यास असमर्थ ठरले आहेत.

. " आम्ही प्रामाणिक नागरिक आहोंत आणि दरवर्षीं पोलीस खातें पोसण्या साठीं सरकारला कर भरीत असतों. त्या आमच्या पैशाचा काय उपयोग होतो ? एवढें मोठें पोलीस खातें पण तें एका काळापहाडला पकडूं शकत नाहीं ? 'दैनिक समाचार' चे असें स्पष्ट म्हणणें आहे की, जनतेनें याबद्दल सरकारला आणि पोलिसांना जाब विचारला पाहिजे.

" आमच्या खास वार्ताहरानें सी. आय्. डी. अधिकाऱ्यांची मुलाखत घेऊन पुढीलप्रमाणें माहिती मिळविली आहे. हा अज्ञात चोर अनेक वर्षे अजिंक्य राहिला आहे. कित्येक बहुमोलाचीं रत्नें जणुं अदृश्य झालीं आहेत आणि त्यामागें या काळापहाडचाच हात आहे.

" तो पायाच्या नखापासून डोक्यावरील केंसांपर्यंत काळा पेहेराव करतो. एखाद्या घरांत शिरावयाचें किंवा तिजोरी उघडायचें त्याचें चातुर्य आश्चर्यजनक आहे. ज्यांनीं त्याचें बोलणें ऐकलें आहे त्यांचें काळापहाड हा सुशिक्षित व सुसंस्कृत माणूस आहे असें म्हणणें आहे. आमच्या खास वार्ताहरानें ज्यांची मुलाखत घेतली तेहि आदरानें म्हणाले कीं, काळापहाड कोणतेंहि शस्त्र हातीं न घेतां केवळ आपल्या बुद्धिचातुर्यानेंच आपलें काम साधतो."

त्यानंतर घनश्यामदासांच्या चोरीचें वर्णन करून लेखकानें शेवटच्या परिच्छेदांत पुन्हां पोलिसांवर हल्ला चढविला होता.

" राजा महेंद्रनाथ हे दरसालाप्रमाणें आपल्या इष्ट मित्रांना थाटाची मेजवानी देणार असून तो कार्यक्रम पुढल्या आठवड्यांतच होणार आहे. नेहमीं त्यांच्या पाहुण्या अनेक रत्नालंकारांनीं सजलेल्या असतात आतां काळापहाडच्या भीतीनें त्यांनीं आपले दागिने घरींच ठेवावे काय ? कीं पोलीस निदान या खेपेला तरी अधिक बंदोबस्त करणार आहेत ?"

चंद्रवदन आनंदानें हंसला. खरोखरच चितू बांद्रेकरला जनतेची फार आस्था असावी ! आणि आतां वर्तमानपत्रांनीं विशेषतः दैनिक समाचारानें पोलिसांविरुद्ध आघाडीच उघडल्यामुळें अनेक पोलीस अधिकाऱ्यांना वरिष्ठांकडून चांगलीच तंबी मिळणार हेंहि स्पष्ट होतें.

नवलाची गोष्ट ही कीं, कोणत्याहि वर्तमानपत्रानें, इतरांनीहि मोत्याचा कंठा पळविण्याचा प्रयत्न केला होता व त्यांनीं यशस्वी रीतीनें पोलिसांना झुकांडी दिली, या गोष्टीचा उल्लेख केला नव्हता. फक्त एकाच वर्तमानपत्रानें घनश्यामदासांची आया त्या रात्रीपासून नाहींशी झाली आहे असा ओझरता उल्लेख केला होता. सर्व वर्तमानपत्रांनीं फक्त काळापहाडलाच जास्तींत जास्त प्रसिद्धि दिली होती.

त्या बातमीचा एक परिच्छेद वाचून मात्र काळापहाडनें आपलें तोंड वेडेवांकडे केलें. त्यांत चुकीची बातमी होती. राजा धनराज गिरजीचा माणकांचा हार आणि घनश्यामदासांचा मोत्याचा कंठा काळापहाडनें हस्तगत केला असें जें लिहिलें होतें तें बरोबर नव्हतें. मात्र तो हार आणि हा कंठा मिळविण्यासाठीं त्यानें अतोनात पैसे खर्च केले होते, हें मात्र खरें होतें.

दोन्ही खेपेला त्याला अगदीं ऐनवेळीं कृष्णाकुमारीनेंच फसविलें होतें. तो मोत्याचा कंठा हस्तगत करण्यासाठीं त्यानें कितीतरी मेहनत घेतली होती आणि कृष्णाकुमारीनें फक्त त्याच्या हालचालींवर नजर ठेवून तो काढून

घतला होता. त्याला प्रथम तिचा अतिशय राग आला. पण नंतर त्याची खिलाडू वृत्ति जागृत होऊन तो हंसू लागला.

त्याचवेळीं बाबाजी आंत आला आणि म्हणाला, 'मालक, तुम्हांला भेटायला कॅप्टन पंढरीनाथ आले आहेत.'

चंद्रवदन हंसून म्हणाला, 'तर मग त्यांना आंत घेऊन ये.'

आंत आलेल्या पंढरीनाथाशीं हस्तांदोलनासाठी चंद्रवदनानें पुढें केलेल्या हाताकडे दुर्लक्ष केलें. त्याचा चेहरा रागावलेला होता. तो म्हणाला, 'चंद्रवदन, मला तुमच्याबरोबर कांहीं खाजगी बोलावयाचें आहे'

चंद्रवदनानें इषारा करतांच बाबाजी निघून गेला. त्याबरोबर पंढरीनाथ म्हणाला, 'तूं वर्तमानपत्रांत तीच बातमी वाचीत होतास तर?'

'होय, त्यांची सर्वच बातमी जरी बरोबर नसली तरी त्यांनीं मला खूपच प्रसिद्धि दिली आहे.' चंद्रवदन हंसून म्हणाला.

'सांग तें सत्य!' पंढरीनाथ रागानें म्हणाला, 'तो कंठा मिळविण्याच्या प्रयत्नासाठीं मला किती खर्च आला आहे हें तुला माहीत आहे?'

'नाहीं, मला तें कसें माहीत असणार?'

आपल्या हाताच्या मुठी आवळून पंढरीनाथ रागानें म्हणाला, 'माझ्या तावदीबाहेर खर्च झाला आहे. हरि आणि जग्या हे त्यांच्या मेहनतीचे पैसे मागत आहेत आणि त्यांना बरीच रक्कम आगाऊ द्यावी लागली. अडीचशें रुपयांची घनश्यामदासांच्या मुख्य नोकराला लांच द्यावी लागली. तेव्हां त्यानें कृष्णाकुमारीला आयाची नोकरी दिली. कृष्णाकुमारीनें कामासाठीं म्हणून माझ्याकडून पांचशें रुपये घेतले. त्याशिवाय इतर माहिती गोळा करण्यासाठीं मीं तीन हजार रुपये खर्च केले. इतका खर्च करून शेवटीं काय झालें तर काळापहाडला बजाविलें असतांनाहि त्यानें मध्यें नाक खुपसलें. मीं सर्व मेहनत केली आणि फायदा तुझा झाला.'

'पण तूं दुसऱ्या रात्रीं येणार अशी कल्पना होती.' चंद्रवदन म्हणाला, 'तूं जर ठरविल्याप्रमाणें वागला असतास तर तुला माझा त्रास झाला नसता. शिवाय तुला मोत्यांचा कंठाहि मिळाला आहे.'

'होय, मला कंठा मिळाला आहे खरा.' संतापानें पंढरीनाथ म्हणाला, 'पाठीमागें लागलेल्या लोकांच्या तावडींतून कसेंबसें सुटल्यानंतर मीं तो कंठा पाहिला. त्यावेळीं मला काय आढळलें असेल असें तुला वाटतें?'

'मला वाटतें, कंठा बनावट असावा.' चंद्रवदन म्हणाला.

'होय, त्या कंठ्याची किंमत पुरी पन्नास रुपयेंहि नव्हती! घनश्यामदासांचा सुप्रसिद्ध कंठा बनावट होता! पण काय रे, तें तुला कसें समजलें? तूं तर तो अगदीं दुरून पाहिला होतास.'

'तो नकली कंठा मींच एका तासापूर्वीं तिजोरींत ठेवला होता.'

आतां मात्र पंढरीनाथाचा संताप अनावर झाला. त्यानें आपलें पिस्तुल काढलें आणि तें चंद्रवदनावर रोखून तो म्हणाला 'अस्सल कंठा स्वाधीन करण्यास मी तुला फक्त एक मिनिटाचाच अवधि देतों. त्यानंतर मी तुला जागच्या जागीं ठार करीन !'

'पण तो कंठा आतां माझ्याजवळ नाहीं.' चंद्रवदन म्हणाला.

पंढरीनाथ जरी अतिशय भडकला होता आणि त्या अवस्थेत त्याच्या हातून कोणताहि अविचार घडूं शकला असता, हें जरी खरें असलें तरी चंद्रवदन खरें बोलत आहे, अशी त्याची खात्री पटली. आपलें पिस्तुल खालीं ठेवून तो म्हणाला, 'जर तुझ्याजवळ नाहीं तर आहे कुणाजवळ ? मालकाला कंठा मिळाला असें वर्तमानपत्रांनीं छापलेलें नाहीं.'

'हें बघ पंढरीनाथ, मी येथें आहें आणि तूंहि येथें आहेस. पण तिसरी व्यक्ति येथें नाहीं.'

'म्हणजे कृष्णाकुमारीनें तो पळविला असें तुझें म्हणणें आहे ?' पंढरीनाथानें दचकून विचारलें.

'तिनें तसें पत्रानें मला कळविलें आहे. पण मी तुला सविस्तर हकीकत सांगतों.' चंद्रवदन म्हणाला आणि त्यानें आदल्या रात्रीं घडलेल्या प्रकारासंबंधींची सर्व सविस्तर माहिती सांगितली.

पंढरीनाथ आरामानें खुर्चीवर बसला. त्यानें एक हात आपल्या कपाळावरून फिरवला आणि तो म्हणाला, 'म्हणूनच ती आपल्या हिश्श्याची मागणी करण्यासाठीं आली नाहीं तर ? माझी कल्पना होती कीं ती या खेपेला तरी लबाडी करणार नाहीं.'

'ती लबाडी करूं शकणार नाहीं असा तूं बंदोबस्तहि केला होतास !' चंद्रवदन हंसून म्हणाला.

'यांत हसण्यासारखें काय आहे ?' पंढरीनाथानें चिडून विचारलें, 'जर ती माझ्या हातीं सांपडली तर मी तिची मानच पिळवटीन ! त्या विश्वासघातकी स्त्रीवर मीं विश्वासच कसा ठेवला तें मला समजत नाहीं.'

'जाऊं द्या झाल्या गोष्टींबद्दल पश्चात्ताप करण्यांत काय अर्थ ?' चंद्रवदन म्हणाला, 'तूं आतां वेळेवर आला आहेस तेव्हां आपण फराळ करूं या.'

पंढरीनाथानें कांहींच उत्तर दिलें नाहीं. त्याचें मौन हीच संमति समजून चंद्रवदनानें बाबाजीला न्याहारीचें साहित्य आणावयास सांगितलें. आणि त्या दोघांनीं फराळावर यथेच्छ ताव मारला.

त्यानंतर सिगारेट पेटवून व अर्धवट हंसत पंढरीनाथ म्हणाला, 'जरी कृष्णाकुमारीजवळ तो कंठा असला तरी ती या खेपेला परदेशीं फरारी होऊं शकणार नाहीं. मीं तिचा पासपोर्टच पळविला आहे.'

'तुमचा एकमेकांवर अतिशय विश्वास दिसतो !' चंद्रवदन चेष्टेनें म्हणाला.

त्याच्या त्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून पंढरीनाथ म्हणाला, 'आपण तिला गांठली पाहिजे एकदां तरी आपण दोघें एकत्र होऊन तिला धडा शिकवला पाहिजे. तेव्हां जें कांहीं झालें गेलें तें विसरून जा आणि यावेळीं मला मदत कर. पासपोर्ट नाहींसा झाल्यामुळें तिला तो कंठा परदेशीं विकणें शक्य होणार नाहीं. कारण नवीन पासपोर्ट मिळविण्यास बरेच दिवस लागतील. आणि तेवढ्या अवधींत आपणांला तिला गांठतां येईल.'

'पण समज, ती कुठें रहात आहे हें जर आपण शोधून काढलें तर तूं काय करशील?' चंद्रवदनानें विचारलें.

'मी वाटेल तें करून तिच्याकडून तो कंठा परत मिळवीन!'

'आणि तिनें तो कुणाला विकला असला तर?'

'नाहीं. जर तिनें तो परदेशीं विकला तरच तिला योग्य किंमत मिळेल.'

'पण पंढरीनाथ, तिनें आपल्यावर मात करून तो कंठा मिळविला आहे. तेव्हां तो तिच्याजवळच राहिला तर बिघडलें कुठें?'

'चंद्रवदन, तुझ्याइतका मर्ख मीं कुठें दुनियेंत पाहिला नाहीं. तुझ्यावर तिच्या सौंदर्याचा प्रभाव पडलेला दिसतो. तो कंठा परत मिळेपर्यंत मी तरी स्वस्थ बसणार नाहीं. तूं माझ्याबरोबर भागीदारी करणार कीं नाहीं तें सांग.'

चंद्रवदनानें क्षणभर विचार केला. पंढरीनाथाबरोबर तसें ठरविण्यांत कांहीं नुकसान नव्हतें झाला तर फायदाच होणार होता.

'ठीक आहे. मला तुझें म्हणणें मान्य आहे. मी चौकशी करून तिच्याबद्दलची माहिती मिळवितों. पण आपण दोघांनीं एकमेकांशीं कसें संधान जुळवायाचें?' चंद्रवदनानें विचारलें.

'मी एक-दोन दिवसांत येथेंच तुला भेटेन. मी आतां जातों. फराळाबद्दल मी तुझा आभारी आहें. कदाचित् वैयक्तिक दृष्ट्या तूं मला तितका अप्रियहि नसशील. पण काळापहाड, लक्षांत ठेव, जर तूं मला फसविण्याचा प्रयत्न केलास, तर ईश्वरसुद्धां तुझें संरक्षण करूं शकणार नाहीं.'

पंढरीनाथ तेथून निघून गेल्यानंतर आपल्या लेखनाला सुरुवात करण्यापूर्वी चंद्रवदनानें सिगारेट ओढीत विचार केला. अशाप्रकारचा कंठा विकत घेणारा एकच माणूस त्याच्या माहितीचा होता आणि शक्य तितक्या लवकर त्या माणसाला भेटावयाचें असें त्यानें ठरविलें. त्याचवेळीं त्याला कृष्णाकुमारीलाहि पुन्हां भेटण्याची इच्छा होती.

जरी कांहीं नवीन घडामोडी घडल्या नव्हत्या तरी संध्याकाळच्या सर्व वर्तमानपत्रांनीं घनश्यामदासांच्या बंगल्यांतील चोरीला पुन्हां प्राधान्य दिलें होतें. पोलिसांना डिवचण्यांत आल्यामुळें या खेपेला आपण लवकरच कांहीं धडपड करणार आहोंत असें त्यांच्यातर्फें जाहीर करण्यांत आलें. अर्थातच ती केवळ जनतेची फसवणूक होती कारण इन्स्पेक्टर काळे किंवा शामराव यांना

कांहींच पुरावा मिळाला नव्हता.

पण त्या वर्तमानपत्रांतील एका परिच्छेदाकडे त्याचें लक्ष वेधलें होतें. राजा महेंद्रनाथ आपल्या इष्टमित्रांना मेजवानी देणार होते आणि त्या ठिकाणीं पोलीस कडेकोट बंदोबस्त करणार होते. त्याशिवाय महेंद्रनाथांची बायको कित्येक खाजगी डिटेक्टिव्हांचा पहारा बसविणार होती.

त्या बंदोबस्ताचें वर्णन करतांना संपादकानें लिहिलें होतें कीं, अशाप्रकारची सावधगिरी पोलिसांनीं कधींहि घेतली नव्हती आणि काळापहाड कितीहि धूर्त असला तरी तो महेंद्रनाथांच्या बंगल्यांत त्या रात्रीं प्रवेश करूं शकणार नाहीं. आणि जर त्यानें ती अशक्य कोटींतील गोष्ट साध्य केली; तर तो आंत जातांच पकडला जाईल.

शेवटीं संपादकांनीं म्हटलें होतें, ' राजा महेंद्रनाथांची चोरी करणें काळापहाडला कदापीहि शक्य नाहीं. '

तें वाचतांच चंद्रवदन कृष्णाकुमारीलाहि विसरला होता. पोलिसांनीं, राजा महेंद्रनाथांनीं आणि त्या संपादकांनीं त्याला आव्हान दिलें होतें आणि काळापहाडला आव्हान देणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हती. गेल्या दोन शतकांत त्याच्या तका साहसी आणि संकटाशीं झगडण्यांत आनंद मानणारा पराक्रमी पुरुष निर्माण झाला नव्हता

° ° ° °

महेंद्रनाथांचा वाडाहि ठाणें शहरापासून बराच दूर आणि एकांतांत होता. तो वाडा फार भव्य होता. कित्येक शतकें तो महेंद्रनाथांच्याच कुटुंबाच्या मालकीचा होता आणि आजहि तो फार चांगल्या स्थितींत होता.

या सर्व गोष्टी चंद्रवदनाला वर्तमानपत्रावरून समजल्या होत्या. पण त्याला त्या वाड्याची प्रत्यक्ष पहाणी करावयाची होती. पोलिसांनीं तेथें कोणत्या प्रकारचा बंदोबस्त केला आहे, याबद्दलची माहिती मिळवायची होती. तो मोटारीनें तेथें गेला आणि त्यानें वाड्याजवळच्या खेड्यांतील चहाच्या दुकानासमोर आपली मोटार उभी केली.

खेड्यांतील चहाचीं दुकानें म्हणजे चालतींबोलतीं वर्तमानपत्रेंच होतीं, हें त्याला अनुभवानें समजलें होतें. सुमारें वीस मिनिटें त्यानें त्या हॉटेलमध्यें चहापानांत आणि तेथें जमलेल्या मंडळींबरोबर गप्पागोष्टी करण्यांत घालविलीं, पण त्याला विशेष महत्त्वाची अशी माहिती मिळाली नाहीं.

आदल्याच दिवशीं त्या वाड्याभोंवतीं कांटेरी तारांचें तात्पुरतें कुंपण घालण्यास सुरुवात झाली होती. कुंपणाच्या बाहेरच्या आणि आंतल्या बाजूला पहारा करण्यासाठीं बरीच मोकळी जागा सोडली होती. कुंपणाच्या तारा इतक्या जवळ जवळ होत्या कीं, त्यांतून कुणालाहि उडी मारून आंत जाणें अशक्य होतें. त्या सर्व कुंपणावर रात्रीच्या वेळीं लखलखीत प्रकाश सोडण्यांत

येणार होता आणि त्या तारांतून विजेचा प्रवाह खेळविण्यांत येणार होता.

त्यानंतर पांच मिनिटें चंद्रवदनानें त्यांच्याबरोबर निराळ्याच गोष्टी केल्या आणि तो तेथून निघाला. आपण पुन्हां प्रवासाला लागण्यापूर्वी त्या भागांत दोन तास सहज भटकणार आहोंत असें त्यानें दुकानदाराला सांगितलें होतें.

तो भरभर पावलें टाकीत महेंद्रनाथांच्या वाड्याकडे चालला होता. हवा छानदार होती. त्यामुळें तो उत्साहित बनला होता. लवकरच तो उजवीकडे वळला आणि त्यानें वाड्याकडे जाणारा मुख्य रस्ता गांठला. तो सुमारें तीनशें यार्डांवर गेला तोंच एका माणसानें त्याला हांक मारून थांबविलें.

'तुम्हांला काय हवें आहे ?' त्या माणसानें त्याच्याकडे पहात विचारलें.

'त्याच्याशीं तुला काय करावयाचें आहे ?' चंद्रवदनानें उलट विचारलें.

चंद्रवदनाचा खणखणीत आणि रुबाबदार आवाज ऐकून त्या माणसानें हात जोडून त्याची क्षमा मागितली. 'माफ करा साहेब, येथून जाणाऱ्या येणाऱ्या प्रत्येकाची चौकशी करण्याचा मला हुकूम देण्यांत आला आहे.'

'पण कां ?' चंद्रवदनानें विचारलें.

'कारण साहेब, हा रस्ता फक्त वाड्याकडे जात असून तो खाजगी आहे. त्यामुळें ज्याला कांहींच हक्क नाहीं, अशा माणसाला या रस्त्याचा उपयोग करतां येणार नाहीं.'

'मला वाडा पहावयाचा होता, म्हणून मी येथें आलों. वाड्याकडे जाणारा हाच एक रस्ता आहे असें मला सांगण्यांत आलें होतें.'

'साहेब, क्षमा करा. पास नसेल त्याला येथून जातां येणार नाहीं.'

'भल्या माणसा, हें तुझें बोलणें मोठें रहस्यमय आहे.' चंद्रवदन हंसून म्हणाला, 'या वाड्यांतील मंडळी अणुशक्तीचे प्रयोग करीत आहे काय ?'

'साहेब, मी तुमचा फार आभारी आहे.' तो म्हणून चंद्रवदनानें पुढें केलेली सिगारेट घेत म्हणाला, 'तुम्ही म्हणतां तसलें कांहीं नाहीं, पण हा सर्व बंदोबस्त काळापहाडसाठीं आहे. तुम्ही त्याचें नांव ऐकलें आहे काय ?'

'काळापहाड ? नांव कुठेंतरी ऐकल्यासारखें वाटतें.'

'साहेब, काळापहाड हा फार मोठा हिकमती चोर आहे! आणि अलीकडे सर्व वर्तमानपत्रें त्याच्यासंबंधीं लिहीत आहेत.'

'आतां लक्षांत आलें.' चंद्रवदन म्हणाला, 'त्या चोरानें अगदीं अलीकडे कुठेंतरी चोरी केली आहे ना ?'

'होय साहेब ! वाड्यांत येत्या आठवड्यांत एक मोठी मेजवानी आहे आणि त्या रात्रीं काळापहाडनें कोठीं चोरी करूं नये, म्हणून हा बंदोबस्त करण्यांत आला आहे. साहेब, तुमचें काय काम आहे तें जर तुम्ही मला सांगाल तर मी तुमच्याकरितां चटपट करीन; पण मालक जर तुमच्या ओळखीचे नसले तर तुम्हांला वाडा पहावयास मिळणार नाहीं.'

'माझें काम तितकेंसें महत्त्वाचें नाहीं. मीं माझ्या नवीन कथेंत या भागाचें वर्णन करण्याचें ठरविलें होतें आणि या वाड्याचा उल्लेख त्यांत करावा असा माझा विचार होता.'

'साहेब, तुम्ही कथा लिहितां काय ?' त्या माणसानें उत्सुकतेनें विचारलें.

'होय, माझें नांव आहे चंद्रवदन.'

'सुप्रसिद्ध रहस्यकथा-लेखक चंद्रवदन ते तुम्हींच तर नव्हे ?'

'होय, तोच मी !'

त्या माणसाचा सर्व संशय अजिबात दूर झाला. कारण तो रहस्यकथांचा वाचक होता आणि चंद्रवदन हा त्याचा आवडता लेखक होता. त्यानें तसें त्याला सांगितलें आणि कुंपणापर्यंत त्याला स्वत:बरोबर नेण्याचें कबूल केलें.

'तेथें जो माणूस आहे तो कदाचित् तुम्हांला आंतहि सोडील. पण अर्थातच त्याबद्दल माझी खात्री नाहीं.'

'तुमच्या त्या मित्राला त्रास देण्याची इच्छाहि नाहीं. मला नुसता वरवर हा प्रदेश पहावयाचा आहे. पण ही काळापहाडची काय भानगड आहे ? तो पुढल्या आठवड्यांत येथें येणार आहे असें तुम्हांला खरोखरच वाटतें काय?'

त्या पहारेकऱ्यानें चंद्रवदनाला कुंपणापर्यंत नेलें. कुंपण आतां जवळजवळ तयार झालें होतें. प्रथम जरी तो सावधगिरी बाळगीत होता तरी चंद्रवदनाच्या व्यक्तिमत्त्वाचा परिणाम झाल्यामुळें त्यानें आतां मनमोकळेपणानें त्या ठिकाणीं करण्यांत आलेल्या बंदोबस्तासंबंधींची माहिती त्याला सांगितली.

त्या सर्व कुंपणांत विद्युत्प्रवाह खेळविण्यांत येणार असून कुंपणाच्या आंत व बाहेर सक्त पहारा करण्यांत येणार होता. मेजवानीच्या रात्रीं डिटेक्टिव्ह नोकरांचे वेष धारण करणार होते. त्या रात्रीं वापरण्यात येणाऱ्या सर्व खोल्या बंद करण्यांत येणार होत्या आणि त्यांच्या दारावर धोक्याची सूचना देणारीं आधुनिक यंत्रें बसविण्यांत येणार होतीं.

सर्व पाहुण्यांना निमंत्रणपत्रिका दाखविण्यांत आल्याशिवाय आंत प्रवेश मिळणार नव्हता आणि त्या पत्रिकांची कुणालाहि नक्कल मिळणार नाहीं अशी व्यवस्था केली होती. शिवाय यजमान व यजमानीणबाईंच्या खास ओळखीच्याच माणसांना निमंत्रणें पाठविण्यांत येणार होतीं आणि इतक्या बंदोबस्तांतून जर काळापहाड आंत आलाच तर त्याला तेथें अडविण्याची अगदीं चोख व्यवस्था होती.

त्या पहारेकऱ्याला संशय येऊं न देतां जितकी माहिती मिळविणें शक्य होतें तेवढी मिळाल्यानंतर चंद्रवदनानें विषय बदलून त्या भागांतील प्रेक्षणीय स्थळांसंबंधींची माहिती विचारली. नंतर त्यानें आपल्या स्वाक्षरीसहित एक नवीन कथा त्याला पाठविण्याचें कबूल करून त्याचा निरोप घेतला. खूष झालेल्या पहारेकऱ्यानें त्याचे खूप आभार मानले.

मोटारीनें मुंबईकडे परत जातांना मिळालेल्या माहितीच्या आधारें चंद्रवदनानें विचार केला. राजा महेंद्रनाथांच्या वाड्यांत प्रवेश करणें ही अशक्य गोष्ट तर होतीच, पण प्रवेश केल्यानंतर तेथून बाहेर पडणें त्याहूनहि अशक्य होतें. संरक्षणाच्या योजनेंत यत्किंचितहि उणीव राहूं देण्यांत आली नव्हती.

एकदां अशाच प्रकारें बंदोबस्त करण्यांत आलेल्या एका घराच्या आवारांत काळापहाड मोटारीच्या खालच्या भागाला माकडाप्रमाणें चिकटून आंत गेला होता. पण त्यानें तीच युक्ति जरी अंमलांत आणली तरी त्याला तेथून बाहेर पडणें शक्य नव्हतें. त्या कुंपणाच्या आंत आणि बाहेर हत्यारबंद पहारेकरी पहारा करणार होते त्याशिवाय तेथें शिकारी कुत्रेहि असणार होते.

चंद्रवदन घरीं पोहोंचला तो खिन्न बनला होता. त्या संपादकानें लिहिलें होतें तें सत्य होतें. काळापहाडला जर त्याचें स्वातंत्र्य प्रिय असलें तर तो त्या मेजवानीच्या रात्रीं राजा महेंद्रनाथांच्या वाड्यांत जाऊं शकत नव्हता.

मनाला थोडा विरंगुळा वाटावा या हेतूनें तो पायीं आपल्या क्लबमध्यें गेला. त्या ठिकाणीं त्याच्या ओळखीचीं अनेक माणसें होतीं. कांहीं वेळ क्लबमध्यें गप्पागोष्टी करण्यांत घालविल्यानंतर चंद्रवदन तेथून बाहेर जाऊं लागला तोंच दोन इसम आंत आले आणि त्यांपैकीं एकानें त्याला हांक मारली.

‘चंद्रवदन, तूं इतके दिवस होतास कुठें?’ त्यानें विचारलें. प्रश्न विचारणारा एका प्रसिद्ध वर्तमानपत्राचा दुय्यम संपादक होता.

‘मी गोव्याला गेलों होतों आणि तीन–चार आठवडे तेथें राहिलों.’ चंद्रवदन म्हणाला, ‘तेथें आपला रमेशहि मला भेटला होता.

‘मोठा सुदैवी आहेस.’ उपसंपादक उसासा सोडीत म्हणाला, ‘जेव्हां विचारावें तेव्हां तूं कुठल्या ना कुठल्या बाहेरगांवाहून परत आलेला असतोस! बरी आठवण झाली. मी विसरणारच होतों. हा माझा मित्र प्रभाकर; याला तुझ्या कथा वाचण्याची फार वाईट खोड लागली आहे.’

त्यांच्या आग्रहानें चंद्रवदन पुन्हां तेथल्या एका टेबलासमोर बसला. प्रभाकर आणि तो उपसंपादक एकाच वर्तमानपत्रांत काम करणारे होते. त्यांच्या गप्पा ऐन रंगांत आल्या होत्या.

नंतर अचानक आठवण होऊन उपसंपादकानें विचारलें, ‘प्रभाकर, तूं महेंद्रनाथांच्या मेजवानीला हजर राहणार आहेस काय?’

‘होय, संपादकांनीं मला खास आमंत्रणपत्रिका दिली आहे. पण तेथें माझ्या ओळखीचें कुणीहि नसणार. त्या ठिकाणी काळापहाड येण्याचा संभव आहे असें म्हणतात आणि तेवढ्याचकरितां मी तेथें जाणार आहें. बाकी काळापहाडचा निष्कारण बाऊ करण्यांत येत आहे, असें माझें स्वतःचें मत आहे.’

‘तुझें म्हणणें बरोबर नाहीं.’ उपसंपादक म्हणाला, ‘तेथें जरी विजेच्या तारांचें कुंपण तयार करण्यांत आलें असलें आणि पोलिसांची फौज तयार

ठेवण्यांत आली तरी तुला कांहीं गंमत पहावयास मिळेल असा माझा तर्क आहे. कारण काळापहाड हा डिवचल्यानंतर स्वस्थ बसणारा प्राणी नाहीं.

'पण इतका बंदोबस्त असतांना तो तेथें येण्याचा मूर्खपणा करील, असें तुम्हांला वाटतें ?'

त्याचवेळीं आणखी एका माणसानें त्या संभाषणांत भाग घेतला. 'तोच तर मुद्द्याचा प्रश्न आहे.' तो माणूस म्हणाला, 'काळापहाड आपल्या मनांत येईल तेथें जाऊं शकतो. म्हणूनच पोलिसांनीं इतकी जाहिरात करून त्याला डिवचलें आहे तो तेथें यावा असा त्यांची इच्छा आहे.'

'जर मी काळापहाड असतों तर त्या ठिकाणापासून शंभर मैल दूर राहिलों असतों.' चंद्रवदन म्हणाला.

त्यानंतर संभाषण निराळ्या विषयाकडे वळलें. चंद्रवदन त्या रात्रीं घरीं परतला त्यावेळीं त्याला एक अपूर्व कल्पना सुचली होती. ती कल्पना इतकी साहसी होती कीं, ती यशस्वी होण्याचा संभव नव्हता.

८

राजा महेंद्रनाथांचा वाडा नानाविध विद्युद्दीपांमुळें अमरपुरींतील इंद्राच्या राजवाड्याप्रमाणें शोभत होता. वाड्याच्या आवारांतील झाडांनाहि नानारंगी कंदील टांगण्यात आले होते. घरांतील प्रत्येक दिवा प्रकाशित झाला होता आणि विद्युत्प्रवाह खेळविण्यांत आलेल्या त्या सभोंवतालच्या कांटेरी कुंपणावर प्रकाशझोत टाकण्यांत आला होता. वाड्यांत किंवा वाड्या-बाहेर अशी एक इंचभरहि जागा नव्हती कीं जेथें अंधार होता.

कांटेरी तारांच्या कुंपणाबाहेर आणि आंत सशस्त्र पहारेकरी फेऱ्या घालीत होते आणि त्यांच्यापैकीं कांहींबरोबर पटाईत शिकारी कुत्रेहि होते. फाटका-जवळ मोटारींची आणि आंतील माणसांची चौकशी करण्यांत येत होती आणि प्रत्येकाची निमंत्रणपत्रिका काळजीपूर्वक तपासून पाहुण्यांना परत देण्यांत येत होती. आणि ती त्यांनीं आपल्याजवळ बाळगावी आणि जातांना फाटकावरील खास माणसाला परत द्यावी असें सांगण्यांत येत होतें.

कांहींनीं जेव्हां त्या प्रकाराबद्दल नापसंती दर्शविली तेव्हां ती व्यवस्था त्यांच्याच हिताच्या दृष्टीनें करण्यांत आली आहे अशी नम्रतापूर्वक माहिती देण्यांत येत होती. ही तपासणी झाल्यानंतर एक माणूस त्या मोटारीच्या पायफळीवर उभा राहून तिला वाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ नेत असे. त्या ठिकाणीं महेंद्रनाथांचा मुख्य कारभारी प्रत्येक मोटारींत निमंत्रणपत्रिकेंत नमूद केलेलेच पाहुणे आहेत हें पाहून त्यांना आंत सोडीत होता.

काळापहाडला फाटकांतून आंत चोरून प्रवेश करणें अशक्य होतें. पाहु-ण्यांच्या मोटारी वाड्यासमोर ओळीनें उभ्या करण्यांत येत होत्या. ज्यांचे

ड्रायव्हर होते त्या सर्वांना ताबडतोब कांहीं अंतरावर असलेल्या एका बठ्या घरांत नेण्यांत येत होतें. त्या घराभोंवतीं कडक पहारा होता. कुणाहि ड्रायव्हरला मालकाचें बोलावणें आल्याशिवाय तेथून बाहेर पडतां येत नव्हतें.

पाहुण्यांत जी तरुण मंडळी होती त्यांना ती सर्व पद्धत नवलाईची वाटत होती. ते बंदुका घेऊन उभ्या असलेल्या पहारेकऱ्यांची चेष्टाहि करीत होते.

पण वाड्यांतील वातावरण मात्र आनंदी होतें. कांहीं नोकर पाहुण्यांचा आदरसत्कार करतांना चुका करीत होते, पण त्याकडे दुर्लक्ष करण्यांत येत होतें. राजा महेंद्रनाथ आणि त्यांची पत्नी या दोघांच्याहि चर्येवर चिंतेची छटा उमटली होती.

जव्हां अशा प्रकारच्या बंदोबस्ताची कल्पना त्यांना सुचविण्यांत आली तेव्हां त्यांनीं कुरकुर केली होती. पण शेवटीं त्यांनीं मान्यता दिल्यानंतर पोलिसांनीं केलेला तो खास बंदोबस्त पाहून त्यांनाहि आश्चर्य वाटलें होतें, आणि ते भांबावले होते जेव्हां कोणत्याहि पाहुण्यानें त्याबद्दल तक्रार केली नाहीं तेव्हां त्यांचें समाधान झालें आणि मेजवानीला सुरुवात झाली.

आणि या अवधींत काळापहाड मोठ्या मजेंत होता. ज्याला आपली मोटार वळविण्यांत आली आहे अशी अजीब कल्पना नव्हती, त्या माणसाच्या मोटारींतून तो बेधडक वाड्याच्या आवारांत शिरला होता. फाटकाजवळ ती मोटार थांबविण्यांत आली होती आणि निमंत्रणपत्रिका तपासणाऱ्या अधिकाऱ्यानें तो जनसत्तेचा खास बातमीदार प्रभाकर देवधर आहे अशी स्वतःची खात्री करून त्याला आंत सोडलें होतें.

एक अडथळा तर दूर झाला होता, पण दुसऱ्या अडथळ्याची त्याला भीति वाटत होती. वाड्याच्या प्रवेशद्वाराजवळ उभा असलेला महेंद्रनाथांचा कारभारी तेथली तपासणी झाल्यानंतर पाहुण्यांचें नांव मोठ्यानें पुकारीत होता. आपणांला ओळखणारें तेथें कुणी फारसें नाहीं असें प्रभाकर म्हणाला होता. पण जें कुणीं ओळखत होते त्यांच्यातील एखादा कारभारी नांव पुकारतांना जर जवळपास असला तर घोटाळा होणार होता.

पण काळापहाडचें सुदैव त्याला साथ देत होतें. कारभाऱ्यानें प्रभाकर म्हणून नांव पुकारल्यानंतर तो बेधडक आंत गेला. खऱ्या प्रभाकरला ओळखणारें तेथें कुणीहि नव्हतें. महेंद्रनाथांनीं आणि त्याच्या पत्नीनें नम्रतेनें पण हंसून त्याचें स्वागत केलें.

मेजवानीसाठीं तळमजल्यावरील प्रशस्त दिवाणखाने योजिले होते. मधल्या दिवाणखान्यांत एक उंच व्यासपीठ तयार करण्यांत आलें होतें. तेथें मुख्य करमणुकीचे कार्यक्रम होते. दुसऱ्या दिवाणखान्यांत पाहुण्यांसाठीं नानाप्रकारचीं खाद्यपेयें तयार ठेवण्यांत आलीं होतीं; आणि तिसरा दिवाणखाना पाहुण्यांना गप्पागोष्टी करण्यासाठीं मोकळा ठेवण्यांत आला होता.

काळापहाड प्रथम खाद्यपेयांच्या दिवाणखान्यांत गेला आणि त्यानें तेथें उंची पेयांचा भरपूर आस्वाद घेतला. करमणुकीच्या कार्यक्रमाकडे इतर पाहुण्यांचें विशेष लक्ष नव्हतें. बहुतेकांच्या नजरा घड्याळाकडे वळत होत्या. आणि ज्याच्याबद्दल इतकी जाहिरात करण्यांत आली होती, तो काळापहाड खरो-खरच तेथें येईल किंवा तो बंदोबस्त पाहून तेथून दूर राहील याबद्दल ते विचार करीत होते. स्त्रिया वारंवार आपल्या दागिन्यांवरून हात फिरवून ते सुरक्षित आहेत याबद्दल खात्री करून घेत होत्या. जसा वेळ निघून जाऊं लागला आणि कांहींच घडलें नाहीं; तशी तेथली अस्वस्थता कमी झाली आणि त्या रात्रीं विशेष कांहीं घडणार नाहीं असें सर्वांना वाटूं लागलें.

आतां पाहुणे बेसावध होऊं लागले. पण जे चुका करणारे नोकर होते ते अधिकच सावध झाले. काळापहाडनें एक सुंदर मैत्रीण गांठली होती आणि तो तिच्याबरोबर बोलत होता.

'तो चोर जर येथें येईल तर बरें होईल.' ती म्हणाली.

'ही तुमची इच्छा अगदीं जगावेगळी दिसते.' काळापहाड हंसून म्हणाला, 'चोर यावा आणि त्यानें तुमच्या मैत्रिणीचे दागिने पळवावे असें तुम्हांला वाटतें काय ?'

'अर्थातच नाहीं. पण तो पहावयास मिळाला असता तर बरें झालें असतें.' ती म्हणाली, 'माझी अशी कल्पना आहे कीं तो दिसण्यांत तुमच्यासारखाच ऐटबाज असावा !'

'तुम्ही माझी काळापहाडबरोबर तुलना केल्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें.' तो म्हणाला.

'तुलना करण्याचा माझा विचार नाहीं.' ती लागलीच म्हणाली, 'तो गंमत म्हणून चोऱ्या करतो असें वर्तमानपत्रें म्हणतात. तें खरें असेल कांहो ?'

'बहुधा तो दिसण्यांत ओबडधोबड, ओंगळ आणि दाढी वाढविलेला असणार. तसेंच त्याचा स्वभाव निष्ठुर असून तो आपल्या बायकोला खूप मार देत असावा असा माझा तर्क आहे !' तो म्हणाला.

'तुम्ही माझी चेष्टा करीत आहां.' ती लटक्या रागानें म्हणाली, 'मी अगदीं पैज लावून सांगतें कीं तो उंच, सडपातळ आणि देखणा असावा.'

चंद्रवदनानें घाईघाईनें विषय बदलला आणि ती संधि साधून तिच्या जवळून दूरहि झाला. तेथल्या कुणालाहि आपली विशेष आठवण राहूं नये हा तर त्याच्या योजनेचा एक भाग होता. वेळच आली तर त्यांच्यापैकीं कुणालाहि त्याचें वर्णन करतां येऊं नये अशी त्याची इच्छा होती.

अनेक पाहुण्यांचे दागिने त्याला मोह पाडणारे होते त्यांतील यजमानीण-बाईंच्या गळ्यांतील हिऱ्याचा कंठा त्याचें विशेष लक्ष वेधून घेत होता. एका पाहुणीच्या गळ्यांत पाणीदार मोत्यांचा सुंदर कंठा होता.

त्यानें आपल्या घड्याळाकडे पाहिलें. अडीच वाजले होते. अर्ध्या तासानें तो आपल्या मुख्य कामाला सुरवात करणार होता. बरोबर दोन वाजून पंचावन्न मिनिटांनीं तो सिगारेट ओढण्यासाठीं त्या दिवाणखान्याच्या कोंपऱ्यांत गेला. त्यावेळीं त्याच्या उजव्या हातांत तारा कापण्याचें हत्यार होतें.

व्यासपीठावर नृत्याचा कार्यक्रम चालू होता. त्यासाठीं बरेच दिवे मालविण्यांत आले. आतां इतर पाहुण्यांप्रमाणेंच नोकराच्या वेषांत वावरणाऱ्या डिटेक्टिव्हांनाहि काळापहाड येथें येणार नाहीं असें वाटूं लागलें होतें.

त्याचवेळीं एक स्त्री किंचाळली, 'माझा गळ्यांतला हार नाहींसा झाला!'

'अहो, माझा मोत्याचा कंठा गेला!' दुसरी म्हणाली.

नृत्याचा कार्यक्रम थांबला. सर्व पाहुणे एकमेकांकडे पाहूं लागले. काळापहाडनें प्रहार केला होता.

नंतर पहारेकऱ्यांनीं एकाच वेळीं जोराची हालचाल केली. धोक्याची घंटा वाजली. आवाराच्या फाटकाचें दार आणि वाड्याचा मुख्य दरवाजा एकाच वेळीं बंद झाला. इन्स्पेक्टर धांवतच नृत्याच्या दिवाणखान्यांत आले आणि त्यांनीं हुकूम सोडले.

'तुमच्यांतील कुणीहि आपापल्या जागेवरून हालतां कामा नये. आज रात्रीं काळापहाडनें कोणत्यातरी युक्तीनें येथें प्रवेश केला आहे आणि कमींत कमी दोन चोऱ्या केल्या आहेत. पण आम्हांला तुमचें सहकार्य मिळालें तर तो पकडला जाईल.'

सर्व पाहुणे जागच्या जागीं थांबले. आपल्यांतील कोण काळापहाड आहे हें पहाण्यासाठीं ते एकमेकांवरून नजर फिरवूं लागले. सर्व दारें–खिडक्या बंद करण्यांत आल्या होत्या. कांहीं पाहुणे हवेसाठीं बाहेर गेले होते, त्यांनाहि आंत आणण्यांत आलें होतें.

काळापहाडनें आपल्या घड्याळाकडे पाहिलें. पांच मिनिटें कमी होतीं. आतां पोलीस किती जलद हालचाल करतात यावरच सर्व अवलंबून होतें.

'सध्यां बाहेरच्या आवाराची आणि घराच्या इतर भागाची तपासणी सुरू आहे.' इन्स्पेक्टर सर्वांना उद्देशून म्हणाले, 'जर चोर बाहेर मिळाला नाहीं तर मला मोठ्या नाइलाजानें पण राजा महेंद्रनाथांच्या परवानगीनें तुम्हां सर्वांची झडती घ्यावी लागेल.'

काळापहाड इतर कुठेंहि न सांपडतां त्या पाहुण्यांतच आहे असा इन्स्पेक्टरांच्या बोलण्याचा रोख दिसत होता. दोन मिनिटें शिल्लक राहिलीं आणि एक माणूस धांवतच आंत आला.

'साहेब, आवारांत कुणी नाहीं आणि कुणीहि फाटकांतून बाहेर गेलेलें नाहीं.' तो माणूस इन्स्पेक्टरांना म्हणाला.

दुसरा एक माणूस आला. 'साहेब, घराच्या इतर भागांत कुणीहि नाहीं.'

तो म्हणाला.

इन्स्पेक्टर गंभीर मुद्रेनें मजबारांकडे वळले व म्हणाले, 'राजा महेंद्रनाथ जमा झालेल्या पाहुण्यांची झडती घेण्याखेरीज दुसरा कांहींहि मार्ग नाहीं.'

'पण तुम्हांला तसें करतां येणार नाहीं. माझ्या बोलण्याचा अर्थ असा-'

'साहेब, माझें असें स्पष्ट मत आहे कीं, काळापहाड याच दिवाणखान्यांत आहे.' इन्स्पेक्टर म्हणाले आणि अनेकांच्या तोंडून आश्चर्योद्गार निघाला 'साहेब तुम्ही पोलिसांना मदत करण्याचें कबूल केलें आहे आणि येथील सर्व पाहुण्यांची झडती घेणें हा एकच मार्ग आहे. जर सर्व पुरुष उजव्या बाजूला आणि स्त्रिया डाव्या बाजूला होतील तर हा दुर्दैवी प्रकार थोड्याच वेळांत संपवितां येईल.'

पाहुणे मंडळींचे दोन भाग बनूं लागले, त्याचवेळीं विमानाचा आवाज ऐकूं येऊं लागला. तो आवाज कुठून येत असावा हें प्रथम कुणाणाच समजेना व आधींच अस्वस्थ झालेली ही मंडळी त्या अचानक येऊं लागलेल्या विमानाच्या आवाजानें अधिकच बेचैन झाली.

एक वयस्क बाई कीं, जिचा हार नाहींसा झाला होता, ती मोठ्यानें किंचाळली त्या विमानाचा कारस्थानी काळापहाडशीं कांहीं संबंध असावा काय ? कीं तें योगायोगानें त्याचवेळीं तेथें आलें असावें याबद्दल इन्स्पेक्टर डोकें खाजवीत होते.

'साहेब, तें विमान-कुणीतरी त्या विमानांतून ओरडत आहे!' बाहेरच्या बागेंतून आंत धांवत आलेला एक इसम म्हणाला.

तेंनच लांब टांगा टाकून इन्स्पेक्टर बाहेर गेले आणि सर्व पाहुणे एकाच वेळीं त्यांच्यामागें धांवले. पहारेकरी सर्वांना आपापली जागा सोडूं नये म्हणून बजावीत होते, पण कुणीहि त्यांच्या बोलण्याकडे लक्ष दिलें नाहीं.

बाहेरच्या हिरवळीवर सर्व पाहुणे गोळा झाले. पहारेकरी आतां जास्तच सावधगिरीनें कुंपणाभोंवतीं पहारा करूं लागले. वरून एक छोटें हेलिकॉप्टर जातीचें विमान खालीं उतरत होतें. त्यावर लावलेल्या दिव्याच्या प्रकाशांत विमानाच्या खालच्या भागांत रंगविलेलीं 'राणी छाप' हीं अक्षरें स्पष्ट दिसत होतीं विमानांतून कुणीतरी लाऊडस्पीकरवरून बोलत होता.

'राणी छाप मध वापरा. अतिशय शुद्ध आणि काश्मीरी मध प्रत्येक शहरांतील मोठ्या दुकानांतून मिळूं शकेल. सकाळीं चहापानाच्यावेळीं पावाला लावून वा झोंपतेवेळीं गरम पाण्यांतून घ्या. प्रत्येकाची तब्येत मस्त करणारा ओरिजी काश्मीरी मध वापरा. लक्षांत ठेवा, राणी छाप मध---'

तें विमान जसजसें खालीं उतरत होतें तसतसा तो आवाज मोठा होत होता. इन्स्पेक्टरांनीं रागानें मूठ आवळली आणि ते, तें विमान दूर घेऊन जाण्यास वैमानिकाला ओरडून सांगूं लागले.

'मी याबद्दल त्याला तुरुंगांत घालीन.' इन्स्पेक्टर रागानें म्हणाले.

'त्यानें त्याचवेळीं तें जाहिरातीचें विमान येथें आणलें! पुन्हां तें कधींहि विमानांत बसूं शकणार नाहींत! त्याला येथून निघून जावयास सांगा.'

इन्स्पेक्टरांचे मदतनीसहि हतबल झाले होते. 'राणी छाप मध' हे शब्द इतक्या जोरानें पुकारण्यांत येत होते कीं, त्यांचे आवाज वैमानिकाला ऐकूं जाण्याची शक्यताच नव्हती.

आतां राजा महेंद्रनाथांचे पाहुणेहि ओरडूं लागले होते. कांहीं गंमतीनें आणि हंसत राणी छाप मध म्हणूनहि ओरडत होते. विमानाच्या लाऊड-स्पीकरमधून सारखा आवाज ऐकूं येत होता. 'राणी छाप मध वापरा! राणी छाप मध वापरा.'

त्यानंतर विमानांतून दोराची एक शिडी सोडण्यांत आली. काय प्रकार घडत आहे हें प्रथम इन्स्पेक्टरांच्या लक्षांत आलें. ते मोठ्यानें ओरडून म्हणाले, 'तुम्हीं सर्व मागें व्हा! काळापहाड विमानांतून फरारी होणार आहे! तो पहा! पकडा त्याला!'

जमिनीपासून सुमारे तीन फुटांवर लोंबत असलेल्या त्या शिडीकडे काळा-पहाड वेगानें धांवत होता. त्यानें आपल्या तोंडाच्या खालच्या भागावर रुमाल पट्टा बांधला होता आणि हॅट इतकी खालीं ओढली होती कीं, फक्त डोळेच दिसत होते. त्याच्या अंगावर काळ्या रंगाचा पावसाळी कोट होता.

इतरांपासून काळापहाड सुमारें पन्नास यार्ड दूर होता. आपण आतां सुटलों असें म्हणून तो स्वतःचें अभिनंदनहि करीत होता. पण त्याचवेळीं शिडी वर गेली. वैमानिकाला उंचीचें प्रमाण बरोबर साधलें नव्हतें.

त्याच्या पाठीमागून धांवणारी दोन माणसें सुमारें तीस यार्डांवर पोहोंचलीं होतीं. वैमानिकानें आपली चूक सांवरली आणि त्याचवेळीं कुंपणाजवळील एका शिकारी कुत्र्यानें काळापहाडकडे धांव घेतली. कुत्रा अगदीं जवळ येऊन ठेपला होता आणि शिडी पकडण्यासाठीं अद्याप पंधरा यार्ड धांवणें भाग होतें.

कुत्रा अगदीं जवळ आला तेव्हां काळापहाडनें आपला काळा रेनकोट काढून तो त्याच्या अंगावर भिरकावला. पण तसें करण्यांत कांही बहुमोलाचे क्षण निघून गेले होते आणि एका साध्या वेषांतील डिटेक्टिव्हनें काळापहाडला पकडण्यासाठीं आपला हात पुढें केला होता. इन्स्पेक्टर ओरडून हुकूम देत होते. पण त्यांचें बोलणें कुणालाहि ऐकूं येत नव्हतें. विमानांतील लाऊड-स्पीकरवरून सारखा गजर चालला होता. 'राणी छाप मध वापरा सकाळीं दुपारीं, रात्रीं राणी छाप मध वापरा!'

काळापहाडनें आपल्या पावसाळी कोटांत कुत्र्याला गुरफटलें होतें. पाठी-मागें धांवणाऱ्या डिटेक्टिव्हांच्या धापांचा आवाज त्याला ऐकूं येत होता. त्यानें हात मागें करून त्याला दूर ढकललें आणि उजव्या हातानें शिडी पकडली

तो भराभर पायऱ्या चढून वर आऊं लागला. पण तो डिटेक्टिव्हहि कांहीं कमी नव्हता. त्यानें ती शिडी आपल्या दोन्ही हातांनीं पकडली. काळापहाडनें पायऱ्या चढतांना वैमानिकाला कांहीं सूचना दिल्या. वैमानिक हंसला आणि त्यानें मान हलविली. डिटेक्टिव्ह शिडीच्या पायऱ्या चढून वर जात होता. पण विमानाचा वेग आणि स्वतःच्या शरीराचें वजन यामुळें त्याला तसें करणें शक्य झालें नाहीं आणि तो विमानाखालीं लोंबकळूं लागला.

आवारांत जमा झालेले लोक प्रथम आश्चर्यानें, नंतर रागानें आणि कांहीं विशेष पहावयास मिळालें म्हणून आनंदानें ओरडत होते. पण आतां जेव्हां त्यांनीं त्या पोलीस अधिकाऱ्याला दोराची शिडी पकडून विमानाखालीं झोके घेतांना पाहिलें तेव्हां ते सर्व एकदम गप्प बसले. अगदीं क्षुल्लक कारणहि भयंकर अपघातास कारणीभूत होईल हें आतां सर्वांच्याच लक्षांत आलें.

इन्स्पेक्टरनें त्या विमानासंबंधीं सी. आय्. डी. ऑफिसला टेलिफोन करावयास एका शिपायाला पिटाळलें. काळापहाडला पकडण्यांत आपण अयशस्वी ठरलों या जाणिवेनें ते खजिल झाले होते. आतां ते विमानाकडे पहातच राहिले. काळापहाड काय करील ? त्या काळापहाडनें आतांपर्यंत कधीं प्राणघातक शस्त्र वापरलें नव्हतें; त्यानें कधीं मानवी हत्या केली नव्हती, तो शेवटीं त्या दोरीला लटकणाऱ्या माणसाचा बळी देऊन स्वतःचे प्राण वांचविणार काय ?

पण आतां तें विमान आवाराच्या दुसऱ्या कोपऱ्यांत खालीं उतरत होतें. सर्वजण त्या दिशेला धांवले. पण तेथें असलेल्या पोहोण्याच्या तलावामुळें त्यांना अधिक पुढें जातां येईना. तें छोटें हेलिकॉप्टर तलावावर स्थिर झालें. दोर कापण्यांत आला आणि तो हवेंत लटकणारा डिटेक्टिव्ह पांच–सहा फुटांवरून खालीं कोसळला आणि त्यामुळें उसळलेल्या पाण्यामुळें अनेक बघ्यांचे कपडे भिजले. तो डिटेक्टिव्ह चार फूट पाण्यांतून धडपडत बाहेर आला.

• • • •

माणेकजी जाहिरात कंपनीच्या मालकांना पोलिसांनीं अतिशय त्रास दिला. त्यांचा वैमानिक म्हणाला, 'पूर्वी मला सांगण्यांत आल्याप्रमाणें मी त्या माणसाला कड्यापासून सात मैलांवर खालीं उतरवलें. त्यानें पैसे दिले तेव्हां मीं तसें का करूं नये ? तुम्ही त्याला अटक करणार होतां हें मला कसें समजावें ?'

'साहेब, तुम्ही आमचें बोलणें ऐकून घेत नाहीं.' माणेकजी तेथें चौकशीसाठीं आलेल्या अधिकाऱ्याला म्हणाला, 'मी जाहिरातीचा धंदा करतों आणि त्यासाठीं एक हेलिकॉप्टर घेतलें आहे ती गोष्ट साऱ्या दुनियेला माहीत आहे. मी अनेक सिनेमाकंपन्यांची आणि मोठ्या व्यापाऱ्यांची कामें करतों.

'राणीछाप मधाची जाहिरात करावयास मला टेलिफोननें सांगण्यांत आलें त्याबद्दलचे मागे पैसे आगाऊ देण्यांत आले आणि जाहिरात कशी

करावी याबद्दलच्या लेखी सूचनाहि देण्यांत आल्या आणि मी त्याप्रमाणें माझें हेलिकॉप्टर ठरविलें.

'राणीछाप मध कंपनीचा एक माणूस महेंद्रनाथांच्या घरीं मेजवानीसाठीं जमलेल्या पाहुण्यांना मधाचे नमुने आणि जाहिराती वाटणार होता आणि नंतर तो दोराच्या शिडीवरुन विमानांत चढणार होता. आतां तुम्हीच सांगा, मला याबद्दल संशय कां यावा ? प्रत्येकजण जाहिरातीची कांहीं नवीन टूम काढतो. त्यांतलाच हा प्रकार असेल, असें मला वाटलें. माझा व्यवस्थापक अनंत हरी यांनाहि ही नवीन टूम आवडली. ते म्हणाले, आपण इतक्या नवीन कल्पना काढतों पण ही असली टूम आपणांलाहि कधीं सुचली नव्हती......'

पूर्वी ज्या वर्तमानपत्रांनीं काळापहाडबद्दल लिहितांना आपला हात आंखडला होता त्यांनींहि या खेपेला त्याच्यावर स्तंभच्या स्तंभ लिहिले. दैनिक समाचारनें तर काळापहाडवर एक खास अंकच प्रसिद्ध केला. पोलीस खात्याला अनेक दूषणें देऊन त्यांनीं काळापहाडची मनसोक्त वाखाणणी केली होती.

दैनिक समाचारचा मुख्य वार्ताहर चितू वांद्रेकर यानेंच तो अंक सजविला होता आणि या खेपेला संपादकांनीं चितूवर एक खास कामगिरी सोंपविली होती.

वार्ताहरांपैकीं फक्त प्रभाकर हा खास निमंत्रणानें त्या मेजवानीला हजर होता त्याची भेट घेऊन चितूनें माहिती मिळवावी व पोलिसांच्या मदतीशिवाय काळापहाडला शोधून काढावें असें संपादकाचें म्हणणें होतें. चितूनें ती कामगिरी स्वीकारली. आपणाला यश मिळेल अशी त्याला फारशी खात्री नव्हती.

जेव्हां प्रभाकर त्या मेजवानीला हजर राहिलाच नव्हता. तो क्लोरोफॉर्मच्या गुंगींत आपल्या घरीच झोंपला होता ही गोष्ट जाहीर झाली, तेव्हां प्रत्येक वर्तमानपत्रानें आपापल्या परीनें निरनिराळे तर्क लढविले.

प्रथम पोलिसांनीं प्रभाकरच्या घराला वेढा दिला. नंतर वार्ताहरांची टोळधाड तेथें गेली. त्या दुहेरी हल्ल्यामुळें प्रभाकर चिडला होता. अशा परिस्थितींत चितू वांद्रेकरानें त्याच्या घरांत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. प्रभाकर त्याला पहातांच दार बंद करणार होता पण चितूनें आपला एक पाय आंत सरकविला होता.

'मित्रा, दया कर. तूं जर मला कांहीं माहिती दिली नाहींस तर माझ्यावर नोकरी गमविण्याची पाळी आली आहे !' चितू म्हणाला.

'चितू, तुला जर माहिती मिळाली नाहीं तर ती तूं तुझ्या अफाट कल्पनाशक्तीनें तयार करूं शकशील. आधीं माझ्या दारांतला पाय मागें घे.'

'हें बघ, काळापहाड पकडला जाईल. अशा प्रकारची माहिती देणाऱ्या आमच्या वर्तमानपत्रानें दहा हजारांचें बक्षीस जाहीर केलें आहे. त्याची अर्धी रक्कम पांच हजार रुपये होते आणि तूं जर मला माहिती दिलीस तर तेवढे

पैसे तुला मिळतील.'

प्रभाकर घुटमळला. नंतर चितुला त्यानें आपल्या घरांत घेतलें.

'प्रभाकर, तो काळापहाड दिसण्यांत कसा आहे हें तूं मला सांगूं शकशील काय ?' चितूनें विचारलें.

'मला त्याबद्दल मुळींच कल्पना नाहीं असें मीं पन्नास पोलीस अधिकाऱ्यांना आणि शंभर वार्ताहरांना सांगितलें आहे.'

'ठीक आहे. चिडूं नकोस. पण तुला त्यानें बेशुद्ध कसें केलें तें सांग.'

'मी मेजवानीला जाण्यासाठीं कपडे करीत आरशासमोर उभा होतों. तेव्हां मला एक काळी छाया दिसली. पण मी मागें वळण्यापूर्वींच माझ्या नाका-तोंडावर क्लोरोफॉर्मचा रुमाल दाबून धरण्यांत आला. मी खूप धडपड केली; पण त्याच्या पोलादी पकडींतून माझी सुटका झाली नाहीं. त्यानंतर मी बेशुद्ध झालों आणि आज सकाळीं दहा वाजतां शुद्धीवर आलों. आतां तूं कृपा करून येथून जाशील काय ?'

'जरा थांब !' चितू बाद्रेकर घाईघाईनें म्हणाला, 'संपादकांनीं माझ्यावर काळापहाडला पकडण्याची कामगिरी सोंपविली आहे मीं जर तसें केलें तर मला दहा हजार रुपये मिळतील आणि तूं जर मला योग्य मार्ग दाखविलास तर अर्धी रक्कम तुला मिळेल.'

'पण पोलिसांना जें कित्येक वर्षे साधलें नाहीं तें तूं करणार कसा ?'

'तूं गेल्या आठवड्यांत काय केलेंस तें मला नीट आठवणीनें सांग. कारण कधीं ना कधीं तुझी काळापहाडबरोबर भेट झाली होती यांत शंका नाहीं.' चितू म्हणाला.

'म्हणजे मी चोरांच्या संगतींत असतों असें तुझें म्हणणें आहे काय ?' प्रभाकरनें रागानें विचारलें.

'नाहीं, पण काळापहाड नेहमीं चांगल्या मंडळींत वावरतो हें आपणांला माहीत आहे. ज्यांनीं त्याचें बोलणें ऐकलें आहे त्यांचें काळापहाड सुशिक्षित आणि सुसंस्कृत आहे, असें म्हणणें आहे. तो बुद्धिमान आहे त्यावरून कुणालाहि त्याचा संशय येऊं नये असें तो वागत असणार. तो कुणीहि असूं शकेल. तूं त्या मेजवानीला हजर रहाणार हें कुणालातरी माहीत होतें तेव्हां आमंत्रण मिळाल्यापासून तूं त्यासंबंधीं कुणाजवळ ेलला होतास काय ?'

'फारच थोड्या मित्रांजवळ. मला त्या ठिकाणीं कुणीहि ओळखत नसल्यामुळें मला त्या आमंत्रणाबद्दल फारसा उत्साहहि वाटत नव्हता.'

'काळापहाडला तुझ्यासारखाच माणूस हवा होता.'

'पोलिसांचेंहि तेंच म्हणणें आहे.' प्रभाकर म्हणाला, 'पण मी त्या मेजवानीबद्दल कुणाजवळ बोललों होतों तें मला आठवत नाहीं. पण आतां आठवलें. मी आपल्या क्लबमध्यें बोललों होतों. त्यावेळीं तेथें ५-६ माणसें

होतीं. पण तीं सर्वच माझ्या परिचयाचीं होतीं '

' तर मग त्यांतलाच एक काळापहाड असणार.' चितू वांद्रेकर म्हणाला. ' तेथें कोण होतें ?'

' माझ्या मित्रांपकीं कुणीतरी काळापहाड आहे असें तूं म्हणतोस ? कांहीं वेळानें मीच काळापहाड असेंहि म्हणशील !' प्रभाकर रागानें म्हणाला.

' मी कुणाचाहि संशय घेत नाहीं. रागावूं नकोस. पण तेथें कोण कोण हजर होते तें सांग.'

प्रभाकरानें आपल्या मित्रांचीं नांवें सांगितलीं. ते सर्व वृत्तपत्रांत काम करणारे असल्यामुळें त्यांना चितू वांद्रेकरहि ओळखत होता. नंतर प्रभाकर म्हणाला, ' आणखी एक नांव आठवलें. रहस्यकथालेखक चंद्रवदनहि तेथें होता. पण चितू आतां तूं जा, मला झोंपायचें आहे.'

' ठीक आहे. पण जाण्यापूर्वीं तुला एक सूचना देतों. हीं नांवें तूं पोलिसांना सांगूं नकोस. जर यांतील एखादा काळापहाड असला तर ते त्याला पकडतील आणि आपणांला बक्षीस मिळणार नाहीं. जर तूं तोंड उघडलें नाहींस तर आपणांला बक्षीस मिळण्याची बरीच आशा आहे.'

' मला कुणाजवळहि या विषयावर बोलण्याची इच्छा नाहीं. मरो तो काळापहाड !' प्रभाकर म्हणाला आणि त्यानें जोरानें दार बंद केलें.

० ० ० ०

चंद्रवदन आनंदांत होता. त्याच्या नव्या कादंबरीचा चांगलाच खप होत होता आणि त्या सकाळींच त्याला प्रकाशकानें पाठविलेला चेक मिळाला होता. फक्त त्याच्या त्या आनंदावर एकाच गोष्टीची छाया पसरली होती. त्याला घनश्यामदासांच्या कंठाबद्दल किंवा कृष्णाकुमारीबद्दल कांहींच माहिती मिळाली नव्हती.

सकाळची वेळ होती. बाहेरचें वातावरण प्रसन्न दिसत होतें. लेखनाला सुरुवात करण्यापूर्वीं समोरच असलेल्या चौपाटीवर फेरफटका करावा असें त्याच्या मनांत आलें व तो कपडे चढवून बाहेर पडला. समोरच्या पादपथावर असलेल्या चितू वांद्रेकरानें तें पाहिलें आणि तो हंसला.

तीन दिवस तो प्रभाकराकडून मिळविलेल्या यादींतील माणसांबद्दल चौकशी करीत होता. चंद्रवदनाचें नांव यादींत अगदीं शेवटीं होतें. त्या यादींतील इतर कुणीहि काळापहाड असणें शक्य नव्हतें. संपादक तर सारखें मार्गी लागले होते. त्यानें रस्ता ओलांडला आणि चंद्रवदनाच्या दारावरील घंटीचें बटण दाबलें. बाबाजीनें दार उघडलें.

' चंद्रवदन घरींच आहेत काय ?' त्यानें विचारलें.

' नाहीं साहेब, ते बाहेर गेले आहेत.' बाबाजी विनयानें म्हणाला.

' खेदाची गोष्ट आहे. आतां तूंच मला सांग — पण तुझा चेहरा मला

ओळखीचा वाटतो. मी तुला कुठें पाहिलें असावें?' चितू वांद्रेकर बाबाजीकडे टक लावून पहात म्हणाला.

'मला सांगतां येणार नाहीं.'

'जरा थांब! मीं तुला कोर्टांत पाहिलें होतें. त्यावेळीं तुझें निराळेंच नांव असणार. मी कोर्टांतल्या बातम्या गोळा करीत असें. ती जुनी हकीकत आहे. त्यावेळीं तुझ्यावर विश्वासघाताचा आरोप होता कीं चोरीचा?'

'साहेब, मला तुमचें हें बोलणें समजत नाहीं.' बाबाजी म्हणाला.

'मीं काय बोलतों तें मला बरोबर समजतें. मित्रा, माझी स्मरणशक्ति तीव्र आहे व जरी नांव बदललें तरी तुला तुझा जुना इतिहास लपवितां येणार नाहीं. आतां आठवलें. त्यावेळीं तुला घरफोडीबद्दल पाच वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली होती.'

बाबाजीच्या अंगावर शहारे आले. ती खरोखरच फार जुनी पण वाईट गोष्ट होती. ती शिक्षा भोगल्यानंतर बाबाजी चंद्रवदनाकडे नोकरीला होता व त्यानें आपल्या आयुष्याला निराळें वळण लावलें होतें.

'साहेब, मी येथें कामाला आहें. चंद्रवदनाचा मी हरकामी नोकर आहें.

'म्हणजे, तूं सुधारलास वाटतें? तुझें नांव काय?'

'बाबाजी' त्यानें हलक्या आवाजांत उत्तर दिलें.

'ठीक आहे बाबाजी मला एक दोन गोष्टी विचारावयाच्या आहेत. मीं सुप्रसिद्ध लेखकांवर एक लेखमाला सुरू केली आहे म्हणून मी चंद्रवदना-संबंधीं तुला कांहीं विचारणार आहें.'

'साहेब, मला मालकाबद्दल विशेष माहिती नाहीं. तुम्हीं त्यांनाच भेटा.

'हें बघ, उडवाउडवी करूं नकोस. तूं मला हवी असलेली माहिती दिली नाहींस तर तुझ्या मालकाला तुझा सर्व इतिहास सांगितला जाईल.'

'मालकांना माझा इतिहास माहीत आहे.' बाबाजी म्हणाला.

चितू वांद्रेकरला वाटलें कीं, ज्याअर्थीं चंद्रवदनानें एका चोराला नोकर ठेवला आहे त्याअर्थीं त्याला तसें करण्याचें कांहीं विशेष कारण असावें. असला नोकर काळापहाडला क्वचित् उपयोगी पडला असता.

दमदाटीनें तो वळणार नाहीं असें दिसून आल्यानंतर चितू वांद्रेकरनें आपलें धोरण बदललें आणि दहा रुपयांच्या दोन नोटा खिशांतून काढून तो सलगीच्या स्वरांत म्हणाला, 'हें बघ मित्रा, तुझें नुकसान करण्याची माझी इच्छा नाहीं. माणसानें जगावें व इतरांनाहि जगूं द्यावें. जर मला माझ्या लेखमालेसाठीं तूं कांहीं माहिती दिलीस तर तुला हे वीस रुपये मिळतील; तुझ्या मालकाला कोणता नाद आहे, त्यानें किती पुस्तकें लिहिलीं आहेत, वगैरे माहिती मला हवी आहे.'

'मला त्याबद्दल विशेष माहिती नाहीं.' बाबाजी म्हणाला.

तो लोभी असावा अशा समजुतीनें चितूनें आणखी एक दहाची नोट बाहेर काढली आणि त्याला विचारलें, 'तुझे मालक आराम करण्यासाठीं कोणत्या बाहेरगांवीं जातात? त्यांना फोनोग्राफ प्रिय आहे कीं रेडिओ?'

बाबाजीनें या प्रश्नांचीं उत्तरें देण्यास सुरवात केली. पण त्यानें सत्य सांगितलें नव्हतें. त्यानंतर चितू बांद्रेकरानें महत्त्वाचा प्रश्न विचारला तो म्हणाला, 'बाबाजी, चंद्रवदन गुरुवारीं रात्रीं कुठें होते?'

'गुरुवारीं रात्रीं?' डोकें खाजवीत बाबाजी म्हणाला, 'मालकांची त्या रात्रीची वागणूक मलाहि चमत्कारिक वाटली.'

'ती कशी?' अधिक उत्सुकतेनें बांद्रेकरानें विचारलें.

'त्या रात्रीं मालक अकरा वाजतांच घरीं परतले. त्यांनीं प्रमाणाबाहेर ढोंकली होती. त्यामुळें रात्रभर मला त्यांच्या उशाजवळ बसून रहावें लागलें.'

बाबाजीनें पैसे घेतले नाहींत आणि चितू बांद्रेकरानेंहि तेथून जातांना ते त्याला देण्याचा प्रयत्न केला नाहीं.

अर्ध्या तासानें चंद्रवदन चौपाटीवरून फेरफटका करून परत आला आणि बाबाजीनें चितू बांद्रेकरांची सर्व हकीकत त्याला सांगितली. चंद्रवदन जेव्हां आपल्या बैठकीच्या खोलींत गेला तेव्हां त्याची मुद्रा विचारी दिसत होती.

ज्या दैनिक समाचारानें त्याला बरीच प्रसिद्धि दिली होती, त्याच दैनिकाच्या वार्ताहराला त्याचा संशय आला होता आणि तो वार्ताहर चंद्रवदनाचें काळापहाडशीं संबंध जुळविण्याचा प्रयत्न करीत होता.

पण त्याला तसा संशय येण्याचें कारण काय? प्रभाकरकडूनच त्याला तशी माहिती मिळाली असावी तर मग प्रभाकरला आणि वार्ताहराला त्याच्याबद्दल संशय आला होता. चंद्रवदन तोंड वेडेंवांकडें करून हंसला. आयुष्यांतील गुंतागुंत वाढत होती!

दारावरील घंटीचा आवाज आला. दाराकडे जाणाऱ्या बाबाजीच्या पावलांचा आवाज त्यानें ऐकला. वार्ताहराप्रमाणें पोलीस तेथें आले असावेत काय? त्यांनींहि चंद्रवदनाचा काळापहाडशीं संबंध जुळविला असेल काय?

दार उघडलें गेलें आणि कृष्णाकुमारी आंत आली.

९

'चंद्रवदन, तुम्हांला पुन्हां भेटण्यांत किती आनंद होत आहे याचें मी वर्णन करूं शकत नाहीं.' ती हंसून म्हणाली.

'तूं!' तो हंसून म्हणाला. ती अतिशय धूर्त आहे हें त्याला माहीत होतें. पण अशा प्रकारें तिनें स्वतःच भेटावयास यावें याचे त्याला नवल वाटलें. तो मोत्यांचा कंठा हस्तगत करण्यासाठीं तो तिचा शोध करीत असणार हें तिला चांगलें माहीत होतें.

'चंद्रवदन, एका जुन्या मैत्रिणीचें स्वागत करण्याची ही रीत नव्हे.' ती हंसून म्हणाली, 'तुला भेटून कितीतरी दिवस झाले. आणि तुला पहाण्याची मला अनिवार इच्छा झाली. मी कशीबसें सर्व धैर्य एकवटून येथें आलें आणि तूं फक्त 'तूं !' म्हणूनच थांबलास.'

'पण तूं येथें...?'

'मी येथें काय करीत आहें असेंच ना ?' तिनें विचारलें. 'मला असा एक महत्त्वाचा प्रश्न विचारावयाचा आहे कीं, त्याचें उत्तर फक्त तूंच देऊं शकशील. दुसरी गोष्ट ही कीं, मी अतिशय कंटाळलें आहें आणि तूं मला आज रात्रीं कुठेंतरी जेवायला नेलें पाहिजेस.'

'पण पुन्हां एकदां माझा विश्वासघात केल्यानंतर तुला यथें येण्याची हिंमत तरी कशी झाली ?'

'प्रिय चंद्रवदन, मीं जर तसें केलें नसतें तर तुम्ही माझा विश्वासघात करणारच होतां. मीं त्याबाबतींत तुमच्यावर मात केली एवढेंच काय तें. आणि तुम्हांला त्याबद्दल राग येत असेल तर तुमच्यांत खेळाडूवृत्ति नाहीं असें म्हणावें लागेल. तुम्हांला साहसाची आवड आहे, आणि तें करण्याची तुम्हांला केवळ माझ्यामुळेंच संधि मिळाली. खरें म्हटलें तर तुम्हीं माझं कौतुक केलें पाहिजे.'

या तिच्या स्पष्टीकरणानंतर फक्त एकच गोष्ट करणें शक्य होतें. आणि ती त्यानें केली. तो मोठ्यानें हंसला असली विचित्र तरुणी त्याला पूर्वी कधींहि भेटली नव्हती. ती सुंदर होती. सत्यासत्याची तिला चाड नव्हती. पण ती दिलदारहि होती.

पण त्यानें मुद्दाम आपली मुद्रा थोडी कठोर बनविली आणि तो म्हणाला, 'मीं तुझ्या एकाहि प्रश्नाचें उत्तर देणें किंवा तुझें कांहीं ऐकणें शक्य नाहीं.'

'चंद्रवदन, मी जें कांहीं सांगणार आहें तें ऐकण्यांत तुला आनंदच होईल. तूं मला आवडतोस म्हणून मी तुला ते सांगणार आहें. खरेंच चंद्रवदन, जर तशी परिस्थिति असती तर मीं तुझ्याबरोबर लग्न केलें असतें. तूं इतका लाजूं नकोस. तूं मला जेवायला नेणार कीं नाहीं.'

'मोठ्या आनंदानें.' तो म्हणाला.

'त्याबद्दल मी प्रथम तुझे आभार मानतें. आतां दुसरी गोष्ट म्हणजे चोरीचा माल विकत घेणारा तुझ्या ओळखीचा कुणी विश्वासू माणूस आहे काय ? जो मला फसवणार नाहीं असा माणूस हवा आहे.'

'पण तुला कोण फसविणार ?' तो हंसून म्हणाला.

'मी थोडी पेंचांत अडकलें आहें. मला या देशाबाहेर जाऊन माझ्या नेहमींच्या माणसाला तो कंठा विकावयाचा होता आणि त्यामुळें मी कित्येक वर्षें मजेंत घालवूं शकलें असतें. पण त्या पाजी पंढरीनाथानें माझा पास-

पोर्टच पळविला आहे आणि सध्यांच्या काळांत नवीन पासपोर्ट मिळविणें कठीण असल्यामुळें मला कांहीं हालचाल करतां येत नाहीं. मी पैशाच्या अडचणींत असल्यामुळें तुझ्याकडे धांव घेतली आहे. खरें सांग, मला तुझ्याशिवाय कोण मदत करणार?'

'म्हणजे, या तुझ्या बोलण्याचा अर्थ असा कीं, मी कष्ट करून जो मोत्याचा कंठा पळविला तो विकत घेणारा व्यापारी मीं तुला गांठून दिला पाहिजे!'

'होय, असा थोडासा अर्थ होतो.' ती हंसून म्हणाली, 'पण जे कांहीं पैसे मिळतील त्यांतला अर्धा भाग मी तुला देण्यास तयार आहें.'

चंद्रवदनानें जलद विचार केला. तिचें बोलणें वावगें नव्हतें. पण ती अगदीं स्वखुषीनें अर्धा हिस्सा देईल अशी त्याला खात्री वाटत नव्हती. पण जर खरोखरच ती पैशांच्या अडचणींत असली तर तिला तशा प्रकारच्या तड-जोडीस मान्यता देणें भाग होतें.

काळापहाड या नात्यानें त्याच्याकडून योग्य भावांत चोरीचा माल घेणारा एक व्यापारी होता आणि त्या व्यापाऱ्याला काळापहाड कोण हें माहीत नसल्यामुळें तो धोकाहि देऊं शकत नव्हता. पण प्रश्न असा होता कीं, कृष्णा-कुमारी आपला शब्द खरा करील काय? कीं तिनें ते सर्वच पैसे पळविण्याची कांहीं योजना आंखली असेल?

'कृष्णाकुमारी, मी तुझें तें काम करूं शकेन.' तो म्हणाला, 'तूं तो कंठा माझ्याजवळ दे, म्हणजे मी तो विकण्याचा प्रयत्न करीन.'

'नाहीं, कंठा माझ्याजवळच राहूं दे. समज, तुझ्या हातून तो कुठें हरवला तर तुला दुःख होईल आणि माझेंहि नुकसान होईल. मोत्याचा कंठा जगप्रसिद्ध असल्यामुळें व्यापाऱ्याला तो पहाण्याची आवश्यकता भासणार नाहीं.'

चंद्रवदनानें तो विषय बदलला आणि तो म्हणाला, 'आतां कुठेंतरी जेवायला येण्याची तुझी तयारी आहे काय? त्यानंतर आपण चित्रपट पाहूं.'

तिनें तें म्हणणें अगदीं आनंदानें मान्य केलें. हवा चांगली असल्यामुळें त्या दोघांनीं चालतच बाहेर जाण्याचें ठरविलें. घरापासून कांहीं अंतरावर गेल्या-नंतर कृष्णाकुमारीनें सहज त्याचा हात पकडला.

'तूं मागें पाहूं नकोस. पण एक काळ्या केसांचा, मध्यम उंचीचा, सामान्य पोषाखाचा तेलकट माणूस आपण तुझ्या घरांतून बाहेर पडल्यापासून तुझा सारखा पाठलाग करीत आहे, हें तुझ्या लक्षांत आहे काय?'

चंद्रवदनाला बाबाजीनें केलेलें वर्णन आठवलें. तो वार्ताहर अद्याप पाठलाग करीत होता, ज्याअर्थी त्याचा संशय दूर झाला नव्हता. चंद्रवदनाच्या नजरेंत मिस्किल छटा चमकली. चिंतू वांद्रेकराचा निदान या खेपेला तरी पाठलाग करून कांहीं फायदा होणार नव्हता.

संपादकानें चिंतूला खर्चाच्या आणि वेळेच्या बाबतींत बरीच सूट दिली

होती. अट फक्त एकच होती कीं, त्यानें काळापहाडला शक्य त्या त्वरेनें उघडकीस आणलें पाहिजे. सध्यां गुन्हेगार-जगांत बरीच शांतता होती आणि त्यामुळें नेहमीं सनसनाटीच्या बातम्या प्रसिद्ध करणाऱ्या दैनिक समाचाराला कांहीं खळबळजनक बातमी हवी होती.

चंद्रवदन हाच काळापहाड असला पाहिजे, अशी चिंतू वांद्रेकराची खात्री पटली होती आणि त्यामुळें त्यानें त्याचा पाठलाग करण्याचें काम सुरू केलें होतें. केव्हांना केव्हांतरी काळापहाड एखादी नवीन कामगिरी हातीं घेईल त्यावेळीं त्याला मुद्देमालासह पोलिसांच्या स्वाधीन करावयाचें आणि नंतर संपादकांकडून दहा हजार रुपये मिळवावयाचे असें त्यानें ठरविलें होतें.

पण जेव्हां त्यानें सुरुवात केली तेव्हां आपणांला वाटत होतें तितकें तें काम सोपें नाहीं, असें त्याच्या लक्षांत आलें. चंद्रवदन कधीं बाहेर पडतो याची वाट पहात त्याला तास तास रस्त्यावर उभें रहावें लागत होतें. शिवाय चंद्रवदनाच्या पायीं चालण्याच्या हौसेमुळें त्याला बरीच पायपीट करावी लागत होती. त्यामुळें चंद्रवदन जेव्हां कृष्णाकुमारीला घेऊन त्या हॉटेलांत गेला आणि तेथून बाहेर पडल्यानंतर चित्रपटगृहांत शिरला तेव्हां फक्त रात्रींच त्याच्यावर पाळत ठेवावयाची असा चिंतू वांद्रेकरानें निर्णय घेतला.

त्या रात्रीं दहा वाजतां जेव्हां चंद्रवदन भपकेबाज पोषाख करून आपल्या क्लबमध्यें गेला तेव्हां चिंतू वांद्रेकर त्यांच्यामागें होता. चंद्रवदन जेव्हां क्लब-मध्यें शिरला तेव्हां त्या रात्रीं तो तेथेंच आपल्या क्लबमध्यें वेळ घालविणार असा तर्क करून चिंतू आपल्या घरीं परतला आणि आपण जें करीत आहों त्यांत कुठें चूक तर नाहींना याबद्दल विचार करीत बसला. पण चंद्रवदन क्लबमध्यें पुढल्या दारानें शिरला आणि थोडयाच अवकाशांत मागल्या दारानें तेथून निघून गेला. चिंतू वांद्रेकराला पाठलाग करण्याच्या कलेंत अद्याप खूप शिकावयाचें होतें.

घेला मारवाड्याचे चांदी-सोन्याचे सामान्य दागिने विकण्याचें दुकान होतें आणि तो त्याच्या दुकानाच्या वरच्या भागांत रहात होता. तळमजल्यावरील दुकान हा केवळ देखावा होता. पण त्याचा धंदा वरच्या मजल्यावर आणि तोहि रात्र संपल्यानंतर सुरू होत असे.

घेला मारवाडी चोरीचा माल विकत घेणारा मोठा व्यापारी होता. आणि चोरांनीं कष्टानें मिळविलेले अलंकार अगदीं कमी भावांत विकत घेऊन तो खूप श्रीमंत बनला होता. घेला मारवाड्याचा व्यवहार चोख असल्यामुळें नाइलाजानें का होईना, पण माल विकणाऱ्याला त्याच्या अटी मान्य कराव्या लागत असत. कांहीं माल असा असे कीं तो घेलाच विकत घेऊं शकत होता.

दुसरी एक गोष्ट होती कीं, घेलाकडे एकदां गेल्यानंतर त्यानें देऊं केलेले पैसे नाकारणें बरेंच धोक्याचें होतें. कारण अशीं कांहीं नाखूष मिन्हाइकें

घेलाकडून बाहेर पडल्यानंतर पोलिसांकडून पकडली गेलीं होतीं.

घेलाचें फक्त एकच गिऱ्हाईक असें होतें कीं, जें त्याला मुळीच भीत नव्हतें. काळापहाडला घेलास घाबरण्याचें कांहींच कारण नव्हतें. तो पूर्वी कांहीं न कळविता अचानक घेलाला भेटत असे आणि आपला माल योग्य किमतीनें विकत घेण्यास घेलाला भाग पाडीत असे.

टेबलावर ठेवलेल्या दोन हिऱ्यांच्या कंकणांकडे पहात घेला हंसत होता. दोन हजाराला त्यानें तीन कंकणें विकत घेतलीं होतीं आणि जर तीं पंधरा हजाराला आपण विकलीं नाहीं तर आपलें नांव घेलाच नाहीं...

'मला तीं कंकणें आवडलीं !'

घेला दचकून मागें वळला. 'कोण ? काळापहाड ! अचानक एखाद्या भुताप्रमाणें माझ्यासमोर उभा राहून मला घाबरवण्याऐवजीं तूं माणसाप्रमाणें मला भेटावयास कां येत नाहींस ?'

खरें म्हटलें तर काळापहाडला घेलाच अधिक घाबरत होता. 'नमस्ते घेला !' काळापहाड चेष्टेनें म्हणाला, 'कंकणें फार चांगलीं आहेत पण तीं तूं मिळविलींस कोठून ?'

घेलानें आधी तीं कंकणें टेबलाच्या खणांत घाईघाईनें बंद केलीं आणि तो म्हणाला, 'तुझ्या दृष्टीनें तीं अगदीच सामान्य आहेत; पण तूं माझ्यासाठीं काय आणलें आहेस ?'

'घनश्यामदासांचा कंठा.' काळापहाड म्हणाला.

'मीं त्याबद्दल वाचलें आहे. पण तो एवढा प्रसिद्ध कंठा मला चांगल्या भावांत विकतां येईल कसा ?'

'मला कंठ्याबद्दल चार लक्ष रुपये हवे आहेत.' काळापहाड म्हणाला.

'चार लक्ष रुपये ! तूं समजतोस तरी काय ? मलाच त्या कंठ्याचे एक लक्ष रुपये करतां येतील किंवा नाहीं याबद्दल शंका आहे. माझें कमिशन लक्षांत घेऊन मी तुला फार तर पंचवीस हजार रुपये देऊं शकलों असतों.'

त्यानंतर त्या दोघांची रकमेबद्दल घासाघीस सुरू झाली. शेवटीं चार लक्षांचाच सौदा ठरला. घेलाला निदान एक लक्ष रुपयांचा तरी फायदा होईल असा काळापहाडचा तर्क होता.

'काळापहाड, तूं आतां माझ्याबरोबर कांहीं पेय घेतलें पाहिजेस. मलाहि तो घनश्यामदासांचा कंठा पहाण्याची–हातांत धरण्याची फार इच्छा होती. तो कंठा लवकर माझ्या हातीं दे.'

'तो माझ्याजवळ नाहीं.' काळापहाड म्हणाला.

'पण तूं माझ्यावर कधींच विश्वास ठेवीत नाहींस.' घेला म्हणाला, 'तूं माझ्याबरोबर कांहीं पेय घेणार काय ? कीं त्यांत मी विष मिसळवीन अशी तुला भीति वाटते ?'

काळापहाड फक्त हंसला; व नंतर कांहींशा कठोर आवाजांत म्हणाला ' घेला, माझें बोलणें लक्षपूर्वक ऐक. मी तो कंठा स्वतः घेऊन येणार नाहीं! एक तरुणी तो तुझ्या स्वाधीन करील. पण तिला तूं फक्त दोन लक्ष रुपये दे बाकीचे पैसे मी पुन्हां येऊन घेऊन जाईन. तिनें कितीहि गडबड केली तरी तिला फक्त अर्धीच रक्कम द्यावयाची.'

' ती तुला फसवेल अशी भीति वाटते काय ?' घेलानें हंसून विचारलें.

' मला काय वाटतें याबद्दल तूं विचार करूं नकोस.' करड्या स्वरांत काळापहाड म्हणाला, ' मात्र मीं सांगितल्याप्रमाणें वाग. त्यांत जर कांहीं चूक झाली तर काळापहाडशीं गांठ आहे हें लक्षांत ठेव !'

घेला मारवाडी घाईघाईनें म्हणाला, ' काळापहाड, तूं त्याबद्दल मुळींच चिंता करूं नकोस.'

सुखरूपपणें घरीं परतल्यानंतर चंद्रवदनानें कपडे बदलले आणि तो आराम-खुर्चीवर बसून सिगारेट ओढूं लागला कं याच्या बाबतींत कृष्णाकुमारीबरो-बर भागीदार करण्यांत आपण चूक करीत आहोंत काय ? घेलाच्या मदतीनें त्याला ती सर्व रक्कमहि मिळवितां आली असती, पण जरी तो चोर होता तरी प्रामाणिक आणि आपल्या शब्दाला जागणारा होता शिवाय ऐषआरामानें जगण्यासाठीं त्याला चोऱ्या करण्याची आवश्यकता नव्हती. केवळ साहसाची आवड म्हणूनच तो तसें करीत होता.

नंतर कृष्णाकुमारीचा विचार मनांतून बाजूला काढून तो चितू वांद्रेकरा-कडे वळला चितूच्या सुदैवानें जर त्याला कांहीं पुरावा मिळाला आणि जर चंद्रवदन व काळापहाड ही एकच व्यक्ति आहे असें तो सिद्ध करूं शकला तर ?

पण चितूचा बंदोबस्त करण्यासाठीं तो आपलें शारीरिक बळ वापरणार नव्हता. त्यानें दुसरी सिगारेट पेटविली आणि काय करावें याबद्दल विचार करूं लागला. चितू घमेंडखोर होता. त्याला सर्व श्रेय स्वतःलाच हवें होतें. काळापहाडला पकडल्यामुळें मिळणाऱ्या प्रसिद्धीमुळें आणि पैशामध्यें तो इतर कुणाशीं भागीदारी करणार नव्हता. जर तसें असलें आणि जर...

चंद्रवदनाच्या पुढयांतील रक्षापात्रांत सिगरेटच्या राखेचा ढीग बनत होता

१०

पंढरीनाथ ऊर्फ बहिरीससाणा चांगल्या मनःस्थितींत नव्हता. अलीकडे सर्वच कांहीं त्याच्या इच्छेविरुद्ध घडत होतें. आणि घनश्यामदासांच्या तिजो-रींतील काढून घेतलेला कंठा बनावट आहे असें उघडकीस आल्यानंतर त्याच्या आत्मविश्वासाला जोराचा धक्का बसला होता.

काळापहाडनें त्याला हातोहात फसवून तो कंठा लांबविला आणि शेवटीं कृष्णाकुमारीनें त्या दोघांवरहि मात केली म्हणून तो अधिकच वैतागला होता.

त्यामुळें जग्गा आणि हरीहि त्याच्याजवळ जाण्यास भीत होते.

कंठा हातीं लागल्यानंतर तो कुठें आणि कुणाला विकावयाचा हें त्यानें आधींच ठरविलें होतें. पण त्याची सर्व मेहनत फुकट गेली होती. आतां तो जग्गा आणि हरि मुंबईतील चोरीचा माल विकत घेणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांना भेटत होते. आणि त्यांच्याकडून कृष्णाकुमारीची माहिती मिळविण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्यांची निराशा झाली होती. कुणाहि व्यापाराला कृष्णाकुमारी भेटली नव्हती म्हणून शेवटीं त्यानें नाइलाजानें काळापहाडची भेट घेतली होती. पण तेथेंहि त्याला कृष्णाकुमारीचा पत्ता मिळाला नव्हता.

पंढरीनाथ अशा मनःस्थितींत असतांना चंद्रवदन त्याला भेटावयास गेला.

'नमस्ते पंढरीनाथ.'

'नमस्ते चंद्रवदन, काय पेय घेणार तें सांग.' पंढरीनाथ म्हणाला.

त्या दोघांच्या हितसंबंधाचा संघर्ष होण्याची वेळ आली नसली तर ते दोघे एकमेकांशीं मित्रत्वानेंच वागत असत. त्यांच्यांतील कुणीहि दुसऱ्याचा हेतुपूर्वक विश्वासघात केला नसता आणि त्या दोघांनाहि एकमेकांच्या कर्तृत्व-शक्तीबद्दल आदर होता.

'मी फक्त कॉफी घेईन.' चंद्रवदन म्हणाला, 'पण पंढरीनाथ, ही जागा फार चांगली आणि आरामशीर आहे.'

'होय पण ही जागा आमच्या ताब्यांत रहाणें केवळ तुझ्यावर अवलंबून आहे. थोडें भाडें थकलें आहे आणि घरमालक फार त्रास देऊं लागला आहे. तूं काय मला पांच–दहा हजार रुपये उसने देऊं शकणार नाहींस.'

'अर्थातच नाहीं.' चंद्रवदन हंसून म्हणाला.

'मला तसें वाटलेंच होतें! आणि तूंच आमच्या दुःखाचें कारण आहेस. जर तूं निष्कारण मधें पडला नसतास तर मी यावेळीं राजमहाल हॉटेलांत रहात असतों. पण तूं येथें कां आलास?'

'मला कृष्णाकुमारी भेटली होती.'

'काय म्हणालास!' पंढरीनाथ मोठ्यानें आरोळी ठोकून म्हणाला. काय भानगड आहे तें पहाण्यासाठीं जग्गा तेथें धांवत आला, चंद्रवदनाला पहातांच त्यानें आपलें पिस्तुल बाहेर काढलें आणि त्याच्यावर रोखलें. रागावलेल्या पंढरीनाथानें एक उशी जोरानें जग्गाच्या अंगावर फेंकली. जग्गानें बाजूला उडी मारूनच ती चुकविली.

'चालता हो!' पंढरीनाथ ओरडून जग्गाला म्हणाला.

'पण...पण तुम्हींच तर मदतीसाठीं हांक मारलीत.'

'चालता हो! नाहींतर...' पण जग्गा पूर्वीच तेथून पळाला होता.

'कुठें? कधीं? कसें घडलें? अद्याप तिच्याजवळ तो कंठा आहे काय?' पंढरीनाथानें भराभर प्रश्न विचारले.

'होय, कंठा तिच्याजवळ आहे आणि तिच्याजवळचे संपले आहेत.'

'तुला कसें समजलें ? काळापहाड, आतां आपणांला तिला चांगला धडा शिकविला येईल. कित्येक आठवडे मेहनत करावी लागली तरी आपण तो कंठा परत मिळवूं. तिनें आपला अनेकदां विश्वासघात केला आहे. तिला नीतीचा अर्थच समजत नाहीं. पण तुला हंसायला काय झालें ?'

'कांहीं नाहीं.' चंद्रवदन म्हणाला. पण पंढरीनाथ नीतीच्या गोष्टी बोलूं लागला होता म्हणून त्याला हंसूं आलें होतें.

'तो कंठा आपणांला कसा मिळवितां येईल ?' पंढरीनाथानें विचारलें.

'मी तुला तेंच सांगण्यासाठीं आलों होतों.' चंद्रवदन म्हणाला. पासपोर्टच्या मोबदल्यांत ती अर्धे पैसे देण्यास तयार आहे. तो कंठा विकत घेणारा एक व्यापारी तिनें गांठला आहे आणि तिला परदेशीं जाण्याची घाई असल्यामुळें पासपोर्ट हवा आहे. ती त्या व्यापाऱ्याला घेऊन आपल्याकडे येईल आणि तो आपणां तिघांसमक्ष ठरलेली रक्कम देईल.'

कृष्णाकुमारी मोत्याचा कंठा घेऊन आपल्याकडे येणार हें समजतांच पंढरीनाथाच्या मनांत कोणते विचार येतील हें चंद्रवदन ओळखून होता. तो म्हणाला, 'आणखी एक गोष्ट त्याठिकाणीं फक्त तूं आणि मी हजर असलें पाहिजे. जर जग्या आणि हरि तुझ्याबरोबर असले, तूं त्यांना दडवून ठेवशील तर तेंहि तिला चालणार नाहीं.'

पंढरीनाथ मनांत हंसला. ज्याच्याजवळ कधींहि शस्त्र नसतें असा माणूस एक स्त्री आणि चोरीचा माल विकत घेणारा व्यापारी या तिघांचा तो एकटाच समाचार घेऊं शकला नाहीं तर तो बहिरीससाणा कसला ?

'तुला ही सूचना कितपत पसंत आहे ?' चंद्रवदनानें विचारलें.

'तिच्याबरोबर भागी करणें माझ्या जिवावर येतें, पण मला तसें करणें भाग आहे.' तोंड वेडेंवाकडें करीत पंढरीनाथ म्हणाला, 'तूं तिच्याबरोबर सर्व नक्की केलें आहेस काय ?'

'होय, पण तुला तें मान्य असेल तर.'

'आम्हीं असें ठरविलें आहे कीं, महालक्ष्मीच्या समुद्रकिनाऱ्याजवळ अनेक मोठीं घरें आहेत. त्यांतील एका घरांतील मंडळी एका महिन्यांसाठीं बाहेरगांवीं गेली आहेत. त्या रिकाम्या घरांत आपण आजपासून चार दिवसांनीं एकत्र भेटून हा व्यवहार पूर्ण करूं.

'त्या घराच्या पहिल्या मजल्यावर एक छोटीशी बैठकीची खोली असून तेथें एकच खिडकी आहे आणि त्या खिडकींतून दुसऱ्या घराची पाठीमागली बाजू दिसते. आपण त्याठिकाणीं रात्रीं दहा वाजण्याच्या सुमारास एकत्र जमायचें आणि जातांना एकटेच जायचें.'

'मोत्याच्या एका कंठयाच्या वांटणीसाठीं ही बरीच गुंतागुंतीची योजना

आहे.' पंढरीनाथानें नाखुषी दर्शविली. पण ती जागा त्याचा हेतु साध्य करण्याजोगी एकांतांतील असल्यामुळे तो मनांतून खूष झाला होता.

'नायका कशा असतात हें तुला माहीत आहे!' चंद्रवदन म्हणाला, 'स्त्री हीच दुनियेंतील केवढी मोठी तरी गुंतागुंत आहे!'

कांहीं वेळानें चंद्रवदनानें पंढरीनाथाचा निरोप घेतला. त्यानें महत्त्वाच्या अशा एक-दोन गोष्टी सांगण्याचें मुद्दाम टाळलें होतें. त्यानें कृष्णाकुमारीच्या नांवाचा उपयोग केला होता. पण महालक्ष्मीवरील एक घर एक महिनाभर रिकामें रहाणार आहे ही माहिती तिला असणें शक्य नव्हतें.

दुसरी गोष्ट ही कीं, त्या घरापासून थोडयाच अंतरावरील एका घरांत रहाणाऱ्या शालिनी नांवाच्या बाईनें तिच्या सर्वांत धाकटया मुलीच्या वाढदिवसानिमित्त एक कार्यक्रम आंखला होता आणि मुख्य पाहुणे म्हणून त्याला बोलाविलें होतें. त्याठिकाणीं वार्ताहरहि हजर रहाणार होते आणि त्याची हजरी तेथें नोंदण्यांत येणार होती. ती गोष्ट त्याच्या दृष्टीनें महत्त्वाची होती.

चितू वांद्रेकराचा संशय अद्याप दूर झाला नव्हता. पण चंद्रवदन एका घरांत मेजवानीला हजर असतांना त्याचवेळीं जर काळापहाडनें दुसऱ्या कोणत्या घरांत चोरी केली तर त्याचा तो संशय दूर होणार होता.

चितु वांद्रेकर पाठलाग करीत शालिनीबाई घरापर्यंत येणार होता. इंच्या नंतर त्याचें लक्ष त्या रिकाम्या घराकडे वेधलें जाणार होतें. जांत त्याची आणि पंढरीनाथाची भेट होणार होती आणि जरी त्यानें बुरखा धारण केला असला तरी त्याचा आणि चंद्रवदनाची शरीरयष्टि जुळणारी नव्हती.

आपण निष्कारण चंद्रवदनाला काळापहाड समजत होतों अशी चितू वांद्रेकरची खात्री होणार होती. कृष्णाकुमारीचा तेथें येण्याचा उद्देश नव्हता आणि तिनें आपल्याला पकडून देण्यासाठीं कारस्थान रचलें असा पंढरीनाथाचा समज होणार होता. तो चितु तुटून पडणार होता.

अर्थातच बहिरीससाणा कृष्णाकुमारीचा सूड घेण्याचा प्रयत्न करणार होता. पण त्याची समजूत घालणें शक्य होतें एकदां चितू वांद्रेकराची व्यवस्था केल्यानंतर आपण तेथून तावडतोब निघून गेलें पाहिजे, असें चंद्रवदन बहिरीससाण्याला सुचविणार होता. त्यामुळें त्याला साडेदहा वाजतां समारंभाच्या ठिकाणीं हजर रहातां येणार होतें आणि त्यावेळीं तो मुख्य पाहुणा या नात्यानें भाषण करणार होता.

ती योजना अगदीं व्यवस्थित होती फक्त एकच अडचण होती, आणि ती म्हणजे, बहिरीससाणा काळा पेहेराव न करतां साधारण वेष धारण करीत असे पण जर त्या ठिकाणीं जमिनीवर जर एक काळा बुरखा फेंकण्यांत आला असता तर काळापहाडनें तो अंगावरून झुगारला असावा, अशी चितूची समजूत झाली असती.

चंद्रवदन आनंदांत होता. ठरल्याप्रमाणें त्या रात्रीं त्यानें कृष्णाकुमारीला भोजनासाठींच एका हॉटेलांत नेलें. तेथें तो तिला घेला मारवाड्यासंबंधीं माहिती देणार होता.

भोजन आटोपल्यानंतर तिनें उत्सुकतेनें विचारलें, 'माझ्या कामाचें काय झालें तें सांग.'

'दोन लाखाला सौदा ठरला आहे.' तो म्हणाला.

तिनें समाधानानें सुस्कारा सोडला. तिच्या सर्व विवंचना दूर झाल्या होत्या. ती म्हणाली, 'मला ते पैसे कधीं मिळणार तें सांग!'

'आपण दोघें एक-दोन दिवसांत येतों असें मीं त्या व्यापाराला सांगितलें आहे.' तो म्हणाला.

ती कपाळावर आठ्या चढवून म्हणाली, 'आपणां दोघांचें तेथें काय काम आहे? समज, त्या व्यापाऱ्यावर पोलिसांची नजर असली आणि तूं माझ्या-मुळें पकडला गेलास तर? नको चंद्रवदन, मी एकटीच जातें. पैसे मिळाल्या-नंतर मी तुला भेटेन'

'मी तुला त्याबद्दल सांगेन.' तो म्हणाला, 'कारण दोघे येतों असें मीं व्यापाऱ्याला सांगितलें आहे. आणि तूं एकटीच गेलीस तर त्या व्यापाऱ्याला संशय येईल. तूं चिंता करूं नकोस. मी काय करायचें तें पहातों.'

० ० ० ०

शालिनीबाईच्या मेजवानीची रात्र उजाडेपर्यंत चितू खिन्न बनला होता. कांहीं दिवसांपूर्वीं त्याची पूर्ण खात्री होती. पण आतां आपण चुकलों असें त्याला वाटत होतें. त्याला त्याच्या संपादकांकडून कांहींच मदत होत नव्हती. आदल्याच दिवशीं संपादकांनीं त्याला बजकून दम भरला होता आणि आणखी तीन दिवसांची मुदत दिली होती.

त्या तीन दिवसांत जर काळापहाड सांपडला नाहीं तर चितू वांद्रेकरावर बेकार होण्याची पाळी येणार होती. अशाप्रकारचे त्रासदायक विचार त्याच्या मनाला अधिकच खिन्न बनविण्याचा प्रयत्न करीत असतांना त्यानें चंद्रवदनाला घरांतून बाहेर पडतांना पाहिलें.

यावेळीं चंद्रवदनाची चालण्याची पद्धत कांहीं वेगळीच होती. त्यानें काळ-सर रंगाचा पावसाळी कोट अंगावर चढविला होता व आपली हॅट बरीच खालीं ओढली होती. नेहमींप्रमाणें तो भराभर न चालतां अडखळत आणि चोरट्या नजरेनें आजूबाजूकडे पहात चालला होता. चितूला तरी तसें वाटलें

नंतर आणखी एक एक गोष्ट चितूच्या लक्षांत आली होती. ती म्हणजे चंद्रवदनाच्या बुटांचा मुळींच आवाज होत नव्हता. त्यानें रबरी बूट चढविले होते! चितू वांद्रेकर उत्साहानें चंद्रवदनाचा पाठलाग करूं लागला. शेवटीं आज आपला संशय खरा ठरणार आणि काळापहाड आपल्या हातीं लागणार

असें त्याला वाटत होतें.

महालक्ष्मीजवळ चंद्रवदनानें आपला चालण्याचा वेग वाढविला आणि तो एका कोंपऱ्यावर गेला तेव्हां ज्याचा तो पाठलाग करीत होता तो त्याला दिसेना. जणूं काय रात्रीच्या अंधारानें त्याला पोटांत घेतलें होतें.

तर मग सुप्रसिद्ध चंद्रवदन हाच कुप्रसिद्ध काळापहाड तर ! त्या आळींतल्या कोणत्या तरी घरांत काळापहाड चोरीच्या उद्देशानें शिरणार होता. या खेपेला आपण एकट्यानेंच त्याला पकडण्याचा प्रयत्न करावयाचा नाहीं.

चितू वांद्रेकराच्या सुदैवानें जवळच सार्वजनिक टेलिफोन होता त्यानें धांवतच जाऊन रिसीव्हर उचलला. दोन आण्याचें नाणें टाकलें आणि दैनिक समाचारच्या रात्रपाळीच्या संपादकाला टेलिफोनवरून कांहीं सूचना दिल्या. आणि गंमत अशी, काळापहाडनें ही गोष्ट जमेस धरली नव्हती.

० ० ० ०

शालिनीनें चंद्रवदनाचें स्वागत केलें आणि नंतर तो तेथल्या गर्दीत मिसळला. पावणेदहा वाजतां त्यानें तेथून बाहेर पडण्याची तयारी केली. कारण साडेदहा वाजतां त्याचें तेथें भाषण होणार होतें. पण त्याच वेळीं त्याचा एक जुना मित्र भेटला आणि त्यामुळें महत्त्वाचीं पांच मिनिटें फुकट गेलीं.

बहिरेसखाण्याला त्यानें ज्या घराचा पत्ता दिला होता तेथें तो पाहुणा म्हणून पूर्वी अनेकदां गेला होता आणि त्यामुळें त्याला त्या घराची चांगली माहिती होती. तो पाठीमागल्या अंगणांतून त्या घराजवळ गेला. त्यावेळीं आपणांला कुणीहि पाहणार नाहीं, अशी त्यानें सावधगिरी बाळगिली होती. तेथें त्यानें आपल्या अंगावरील कपडे काढून झुडुपांत दडविले आणि तो काळापहाड बनला. नंतर त्यानें नेहमीच्या कौशल्यानें तळमजल्यावरील खिडकी उघडली आणि त्या घरांत प्रवेश केला.

चितू वांद्रेकरानें काळापहाडचा महालक्ष्मीवरील त्या वळणापर्यंत यशस्वी रीतीनें पाठलाग केला होता; पण आतां तो कोणत्या घरांत शिरणार हें त्याला समजेना. तेथें दोन्ही बाजूंनीं ओळीनें असलेल्या वीस घरांपैकीं तो कोणत्याहि घरांत असण्याचा संभव होता. आपण फाजील सावधगिरी बाळगून काळापहाडपासून फार मागें राहिलों याबद्दल तो आतां स्वतःला दोष देत होता.

आणि त्याचवेळी पहिल्या मजल्यावरील एका खिडकींत अचानक प्रकाश चकाकलेला त्यानें पाहिला. प्रथम त्याला आपणांला भास झाला असावा असें वाटलें. पण कांहीं क्षणानंतर पुन्हां त्याला त्या खिडकींत प्रकाश दिसला. काळापहाडला स्वतःबद्दल भलताच आत्मविश्वास वाटत असल्यामुळें तो इतका बेफिकीर राहिला आहे असा स्वतःचा ग्रह करून चितूनें तें घर कोणतें तें नीट ध्यानांत ठेवलें.

आपण जलद हालचाल करीत नाहीं याबद्दल काळापहाड आपणांला शिव्यांची लाखोली वहात आहे हें त्याला माहीत नव्हतें. त्यानें आपल्या मदतीला जी टोळी बोलाविली होती, ती टेलिफोन केल्यापासून चार मिनिटांत तेथें हजर रहायला हवी होती. पण त्यांचा अद्याप ठिकाणा नसल्यामुळें आपण एकटेंच त्या घरांत शिरावयाचें, पण आपल्या मदतनिसांच्या मार्गदर्शनासाठीं त्या घराबाहेर निशाणी ठेवावयाची असें त्यानें ठरविलें.

चिनूची हॅट ही त्याच्या ऑफिसांतील सर्व मंडळींच्या चेष्टेचा विषय होता. त्यानें ती हॅट घराबाहेरच्या फाटकाला अडकविली आणि संबाळ्या‹ कडून मिळविलेलें पिस्तुल हातांत घेऊन तो दाराजवळ गेला. दाराला स्पर्श करतांच तें उघडलें गेलें आणि वरच्या मजल्यावर होणारा कांहीं आवाज ऐकल्यामळें आपणांला हवें असलेलेंच तें ठिकाण सांपडलें अशी त्याची शंभर टक्के खात्री पटली.

चितू बांद्रेकराचा घसा कोरडा पडला होता. हात थरथरत होते. जिन्याची पायरी वाजत असे तेव्हां तो घाम काढण्याच्या तयारींत असे.

इकडे काळापहाडनें बहिरीससाण्याबरोबर बातचीत केली होती. बरकरणी हंसून, पण मनांतून संशयानें एकमेकांकडे पहात त्यांनीं हस्तांदोलन केलें होतें. तेथल्या टेबलावर पडलेला काळा झगा पाहून पंढरीनाथाला आश्चर्य वाटलें होतें, पण कृष्णाकुमारीची तशी इच्छा आहे, असें जें कांहीं चंद्रवदन पुटपुटला होता, त्यानें त्याचें समाधान झालें होतें. शिवाय तो स्वत: त्याच विचारांत गढला होता.

'तिला उशीर झाला आहे.' काळापहाड म्हणाला, 'काय घडलें आहे तें मी पुढें होऊन पहातों '

'बायका या अशाच !' बहिरीससाणा म्हणाला. पण त्यापूर्वीच काळापहाड तेथून दूर झाला होता-

एका कोपऱ्यांत उभे राहून काळापहाडनें डबल पायऱ्या चढून वर येणाऱ्या चितू बांद्रेकराला पाहिलें. नंतर चितू ज्या दाराच्या फटींतून प्रकाश दिसत होता, तेथें जाऊं लागला. काळापहाडनें आपला हात जरा लांब केला असता तर तो चितूला स्पर्श करूं शकला असता.

आपण काय करावें याबद्दल चितूनें कांहीं निश्चित ठरवलें नव्हतें. त्याचे मित्र तेथें येईपर्यंत थांबणें इष्ट होतें. पण जर त्याला एकट्यालाच काळापहाडला पकडतां आलें तर सर्व भारतांत त्याला प्रसिद्धि मिळणार होती. अगदीं सावकाश तो त्या दाराजवळ गेला आणि त्यानें दार उघडतांच त्याला तेथें सिगारेट ओढीत बसलेला एक माणूस दिसला. त्या माणसानें आपला एक कोपर टेबलावरील काळ्या झग्यावर टेकला होता. हाच तो काळापहाड ! पण तो कांहीं चंद्रवदन नव्हता. चंद्रवदनाच्या आणि त्याच्या शरीरयष्टींत

कांहींच साम्य नव्हतें.

चितूच्या पाठीमागेंच काळापहाड उभा होता. त्याच्या पुढें आलेल्या हातांत क्लोरोफॉर्मचा बोळा होता. एका क्षणांत तो आपलें काम साधणार होता. पण त्याचवेळीं तळमजल्यावरील पुढलें दार जोरानें उघडलें गेलें आणि चितूला हांक मारीत कित्येक लोक जिन्यावरून वर येऊं लागले. चालून येणाऱ्या नव्या संकटाची चाहूल लागतांच काळापहाड क्षणभर थांबला.

पंढरीनाथ दाराकडें पाठ करून बसला होता. त्यानें मागें मान न वळवितां विचारलें, 'काळापहाड' हा कोंगाट कसला ?'

काळापहाडची दारुण निराशा झाली. एका क्षणाच्या खोळंब्यामुळें त्याची सर्व योजना ढांसळली होती. आपण ज्याला पहात होतों तो काळापहाड नव्हे हें धूर्त चितूच्या लक्षांत आलें होतें. त्यानंतरच्या घटना वेगानें घडल्या.

चितू वांद्रेकर अर्धवट वळला आणि त्याला एक काळी छाया दिसली. काळापहाड त्याच्यापासून कांहीं इंचावरच होता. त्यानें आपलें पिस्तुल कसें तरी वळविण्याचा प्रयत्न केला. काळापहाडनें ती हालचाल पाहिली आणि त्याचा उजवा हात वर झाला, पण चितूनें त्याचवेळीं आपली हनुवटी ढचल-ल्यामुळें तो ठोसा चितूच्या मानेवर बसला. त्याच्या डोळ्यांसमोर काजवे चमकले पण तरीहि तो बेशुद्ध झाला नव्हता.

'वर या...काळापहाड !' तो ओरडला. पण या खेपेला ठोसा योग्य जागीं बसला होता. चितू वांद्रेकर बेशुद्ध होऊन खालीं पडला.

जिन्यावरून चाल करून येणारी टोळी ओरडत होती. दैनिक समाचार-मध्यें काम करणारे पांच पेहेलवान गडी तेथें आले होते. सर्वांपुढें असलेल्या माणसानें बेशुद्ध चितूला आणि त्याच्यापासून दूर सरकणाऱ्या काळापहाडला पाहिलें होतें. तो दुप्पट वेगानें धांवला. काळापहाडनें त्या लालनाक्याला एक जोराचा ठोसा लगावून मागें लोटलें. पण त्या लाल नाकाच्या माणसामागें असलेल्या कुरळ्या केंसवाल्यानें पुढें झेंप घेऊन काळापहाडच्या कमरेंभोंवतीं मिठी मारली व त्याला खालीं पाडलें.

तिसऱ्यानें जोराची लाथ मारली. काळापहाडनें बाजूला लोळण घेऊन ती चुकविली. पण जो चुटपुटता मार बसला होता त्यामुळेंहि त्याच्या बरगड्या दुखावल्या होत्या. कुणीतरी त्याच्या तोंडावरील बुरखा दूर करण्याचा प्रयत्न करीत होतें काळापहाडनें दोन्ही पाय जवळ घेऊन जोरानें झाडले व त्या माणसाला दूर फेंकून तो महापरिश्रमानें उभा राहिला. तेव्हां पंढरीनाथ दोघांबरोबर त्वेषानें लढत असून आपलें पिस्तुल बाहेर काढण्याचा प्रयत्न करीत आहे असें त्याला दिसलें.

पण काळापहाडला बाहेरीससाण्याकडे लक्ष देण्यास फुरसत नव्हती. त्याच्या पाठीमागला माणूस त्याच्या गळ्याभोंवतीं हाताचा विळखा घालून

त्याची मान दाबण्याचा प्रयत्न करीत होता आणि लालनाक्या उडी घेऊन त्याचे पाय पकडण्याच्या तयारींत होता.

काळापहाडनें मानेला एकदम हिसका देऊन पाठीमागल्या माणसाला आपल्या अंगावरून पुढें उडविलें. तो माणूस लालनाक्याच्या अंगावर कोसळला. त्यामुळें ते दोघेहि पाठीमागल्या भिंतीवर आदळले. नंतर त्यानें हात पकडणाऱ्याच्या पोटांत लाथ मारून त्यालाहि त्या दोघांवर उडविलें. त्यावेळीं चितू सावध झाला व त्यानें जवळ पडलेलें एक पेपरवेट फेंकलें, तें काळापहाडच्या उजव्या हातावर बसून तो हातच लटका पडला.

पण त्याचवेळीं बहिरीससाण्यानें पिस्तुल झाडलें. त्याच्यावर हल्ला करणाऱ्या एका माणसाच्या खांद्याला जखम होऊन तो विव्हळला. ती लढाई जितक्या वेगानें सुरू झाली होती, तितक्याच वेगानें थांबली. काळापहाडनें भिंतीवर आदळलेल्या तिघांपैकीं लालनाक्या व कुरळया केंसवाला अद्याप बेशुद्ध होते. तिसरा दोन्ही हातानें पोट आवळीत जमिनीवर बसला होता आणि विव्हळत होता. चितूसहित बाकीचे तिचे थरथर कांपत उभे होते.

'तुम्ही सर्व त्या पलीकडच्या भिंतीजवळ ओळीनें उभे रहा.' त्वेषानें बहिरीससाणा म्हणाला, 'जो कुणीं प्रथम गडबड करील त्याला मी ठार करीन!'

त्यांनीं तसें करतांच बहिरीससाणा म्हणाला, 'चल काळापहाड आणि हें पहा, तुम्ही पांच मिनिटें याच ठिकाणीं उभे रहा, नाहींतर मी पिस्तुलांतील सर्व गोळया झाडीन. पिस्तुल दहाबारी आहे हें लक्षांत असूं द्या!'

"दैनिक समाचार" मधील ती मंडळी पंधरा मिनिटें त्या जागेवरून हललीं नव्हतीं.

• • • •

शालिनीबाई शोधाशोध करीत होती. साडेदहा वाजून गेले होते व त्यावेळीं भाषण करणारा तिचा मुख्य पाहुणा नाहींसा झाला होता. समोरून धांवत येणाऱ्या चंद्रवदनाला जेव्हां तिनें पाहिलें तेव्हां तिचा जीव भांड्यांत पडला.

'एकाएकीं माझें डोकें गरगरूं लागलें म्हणून तुमच्या बागेंत फिरत होतों.' चंद्रवदन म्हणाला, 'मित्रानें दिलेली सिगारेट फार कडक होती.'

'आतां तुम्हांला बरें वाटलें ना?' शालिनीनें विचारलें, 'पण तुमच्या एका गालावर जखम कसली आहे?'

'बागेंत एका दगडाला अडखळून पडलों.' चंद्रवदन हंसून म्हणाला, 'पण चला, आपण आपल्या कार्यक्रमाला सुरुवात करूं.'

नंतर चंद्रवदनाचें विनोदी भाषण ऐकतांना शालिनीबाईच्या मुख्य दिवाणखान्यांत हास्यफवारे उडूं लागले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं "दैनिक समाचार" च्या संपादकांना मॅनेजिंग डायरेक्टरांनीं तांतडीनें भेटावयास बोलाविलें. शांतिलालशेठ हे जवळजवळ त्या दैनिकाचे मालकच होते. त्यांनीं दैनिकाचा खप खूप वाढविला होता आणि त्याचवेळीं दैनिकाचा दर्जाहि खूप खालीं आणला होता. त्यामुळेंच ज्यांना भडक आणि सनसनाटीच्या बातम्याच आवडत असत अशा वाचकांचें तें आवडतें दैनिक बनलें होतें.

संपादकांनीं दार ठोठावतांच शांतिलालच्या घाबरलेल्या सेक्रेटरीनें तें उघडलें व तो म्हणाला, 'या कोकजे, शेठ तुमचीच वाट पहात आहेत '

'पण त्यांनीं मला इतक्या तांतडीनें कां बोलाविलें आहे ?' संपादकांनीं विचारलें, पण सेक्रटरीनें उत्तर न देतां फक्त खांदे उडविले आणि संपादकांनीं ओंठाचा चावा घेतला.

'या कोकजे ! अर्धा तास मी तुमची वाट पहात आहें. मीं तुम्हांला भेटायला बोलाविलें आहें, हें कुणींच तुम्हांला सांगितलें नाहीं काय ?'

'मला तें समजतांच मी येथें आलों.' संपादक म्हणाले.

'तुम्हीं आजची वतमानपत्रें वाचलींत काय ?' शेठनीं कपाळावर आंठ्या चढवून विचारलें.

'होय साहेब.' संपादक खालच्या मानेनें खिन्न स्वरांत म्हणाले,

'तर मग 'समाचार' बद्दल आणि माझ्याबद्दल त्यांनीं काय लिहिलें आहे तें वाचलेंच असणार ? तुम्हीं जनशक्ति वाचलींत काय ?'

'नाहीं—नाहीं साहेब.' संपादक चांचरत म्हणाले.

'तर मग वाचा. मी तांबड्या पेन्सिलीची खूण केली आहे तेथून वाचा!' जनशक्तीचा अंक संपादकाच्या अंगांवर फेंकून शेठ म्हणाले, 'त्यांत 'समाचार'ची व माझी टिंगल आहे. हा प्रजासत्ता वाचा. त्यांतहि तेंच; हा महाराष्ट्र, काळ आणि लोकसेवक वाचा. सर्व दुनियेंत आपलें हंसू झालें आहे ! याबद्दल तुमचें काय म्हणणें आहे ?'

'मला फार वाईट वाटतें !' संपादक म्हणाले, 'पण तुम्हीच म्हणाला होतां कीं पोलिसांवर अवलंबून न रहातां —'

'मी काय बोललों होतों तें जाऊं दे. पण काळापहाड निसटला कसा ? कोणत्या गाढवानें तो घोटाळा करून माझें हंसें केलें? तुम्ही स्वत: तेथें हजर होतां काय ?'

'मी ? नाही साहेब ! मीं सर्व वांद्रेकरावर सोंपविलें होतें.' संपादक म्हणाले शेठनीं लागलीच चिंतूला बोलाविलें व संपादकांना तेथून हांकललें.

'तुझेंच नांव चिंतू वांद्रेकर काय ?' त्यांनीं जोरांत विचारलें.

'होय साहेब.' चितूनें हलक्या आवाजांत उत्तर दिलें.
'तुला कामावरून काढून टाकलें आहे!' शेठ गर्जून म्हणाले.
'पण कां?'
'कां? तुला मीं नोकरीवरून काढून टाकलें आहे. तूं मला आणि माझ्या दैनिकाला खालीं पहावयास लावलें आहेस म्हणून. चालता हो येथून!'

शेठ आपला खरपूस समाचार घेतील अशी जरी चितू वांद्रेकराची कल्पना होती तरी आपणांला ताबडतोब नोकरी गमाविण्याचा प्रसंग येईल, हें त्याच्या स्वप्नींहि नव्हतें तो एकटाच असला तरी खर्चिक होता. त्यामुळें त्याच्याकडे कांहीं शिल्लक नव्हती इतकेंच नव्हें तर त्याला कर्जहि होतें.

'साहेब तो माझा अपराध नव्हता. मी...!'
'तर मग कुणाचा? तुझ्याकडेच पुढारीपण नव्हतें काय?'
'होतें, पण मीं बोलल्याप्रमाणें आपली माणसें वेळेवर आलीं नाहींत.' शेठ मध्येंच बोलूं नयेत म्हणून चितू घाईघाईनें बोलत होता, 'मी पुढें गेलों आणि ज्याला मी काळापहाड समजत होतों त्याला आश्चर्यचकित केलें. जर त्या घराच्या दारावर पहारा बसविण्याची, माझ्या मागून येणाऱ्या माणसानें व्यवस्था केली असती तर ते दोघेंहि पकडले गेले असते.'

'मला कारणें नकोत.' शेठ ओरडून म्हणाले, 'इतरांना धडा शिकविण्या-साठीं मीं तुला नोकरीवरून कमी केलें आहे.'
'साहेब, मला तुम्हीं आणखी एकच संधि द्या.' गयावया करीत चितू वांद्रेकर म्हणाला, 'काळापहाड कोण तें मला-मला माहीत आहे.'
'काय म्हणालास? तें तुला माहीत आहे? काळापहाड कोण आहे?'
'माझा तर्क अगदीं बरोबर आहे. अद्याप माझी शंभर टक्के खात्री नाहीं.'
'ठीक तुला मी चार दिवसांची मुदत देतों त्यानंतर तुला मी नोकरी-वरून काढून टाकीन. चार दिवसांत तू काळापहाडला शोधून काढणार आहेस असें मी कोकजेला सांगतों. त्याला ताबडतोब माझ्याकडे पाठव.'

शेठ शांतिलालांच्या खास खोलींतून चितू निश्चयी मुद्रेनें बाहेर पडला. चंद्रवदन हाच काळापहाड आहे हें जर तो सिद्ध करूं शकला नाहीं तर त्याला नोकरीवरून मुकावें लागणार होतें. कांहीं झालें तरी काळापहाडला तुरुंगांत अडकविण्याचा त्यानें निश्चय केला होता.

° ° °

एक मांजर कुठेंतरी ओरडलें आणि घेला मारवाडी दचकला. चोरीचा माल विकत घेण्यामध्यें बराच धोका होता. पण घेला अतिशय धूर्त असल्या-मुळें कधीच पोलिसांच्या तडाख्यांत सांपडला नव्हता, पण दोनच दिवसांपूर्वी एका भुरट्या चोरानें स्वतःची कातडी वाचविण्यासाठीं घेलाकडे बोट दाखवलें होतें आणि त्यामुळें पोलिसांनीं त्या घराची कसून झडती घेतली होती. जरी

त्या झडतींत पोलिसांना कांहींच सांपडलें नव्हतें, तरी घेला अस्वस्थ बनला होता आणि मांजराच्या आवाजानेंहि दचकत होता !

'घेला, तूं बऱ्याच विचारांत दिसतोस.' अंधारांतून आवाज निघाला आणि घेलानें दचकून उडीच मारली.

'काळापहाड !' घेला कपाळावरील घाम पुशीत म्हणाला, 'तूं माझ्या-साठीं काय आणलें आहेस ?'

'कांहींच आणलें नाहीं. तूं जें माझ्यासाठीं ठेवलें आहेस तें नेण्यासाठीं मी आलों आहें '

'तुला देण्यासारखें माझ्याजवळ कांहींच नाहीं.'

'म्हणजे, ती अद्याप आली नाहीं ?' काळापहाडनें विचारलें.

'ती आली आणि गेली !' घेला अधिकच खिन्न स्वरांत म्हणाला.

'तर मग माझ्या वांटणीचे पैसे कुठें आहेत ?' कठोर स्वरांत काळापहाडनें विचारलें.

'मी तुझ्या वांटणीचे पैसे ठेवीत आहें असें तिला समजतांच तिनें मला तो मोत्याचा कंठा देण्याचें नाकारलें. इतकेंच नव्हे तर पिस्तुलहि बाहेर काढलें. कृपा करून त्या बाईला माझ्याकडे पाठवूं नकोस !'

'आणि ती गेली कुठें ?'

'तें मला माहीत नाहीं पण मी तुला तिच्याबद्दल थोडी माहिती देऊं शकेन.' घेला म्हणाला, 'दोन मोत्याचे इअरिंग बनविण्यासाठीं ती रघू सोनाराकडे जाणार होती.'

काळापहाडनें रघू सोनाराचा पत्ता विचारला आणि तो अदृश्य झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यानें रघू सोनाराची भेट घेतली होती. रघूला भेटण्यासाठीं तो सामान्य खलाशाच्या वेषांत गेला होता आणि त्यानें आपलें नांवहि वेगळेंच सांगितलें होतें. रघूला त्यानें चांगलेंच बनविलें तेव्हां कृष्णा-कुमारी ती इअरिंगचा जोड वनमाळीदास नांवाच्या जवाहिऱ्याला विकणार होती असें त्याला समजलें.

तें ऐकून त्याला मनांतून हंसूं आलें. कृष्णाकुमारीनें घेला मारवाड्याकडून रघू सोनाराची माहिती मिळविली होती आणि आतां ती घनश्यामरामांच्या कंठ्यांतील मोत्याचे निरनिराळे अलंकार करून ते विकणार होती आणि पैसे मिळविणार होती !

भपकेबाज पोषाख करून तो वनमाळीदासांच्या दुकानीं गेला आणि एक गिऱ्हाईक आलें आहे अशा समजुतीनें दुकानांतील नोकर लगबगीनें पुढें झाले

'मला पाणीदार मोत्याचा एक इअरिंग-जोड हवा होता.' तो म्हणाला.

'साहेब, तुम्हांला पसंत पडेल असा एक जोड आमच्याजवळ आहे.' नोकर म्हणाला, 'पण त्याची किंमत मात्र बरीच आहे.

चंद्रवदन उभा होता, त्याच्या उजव्याच हाताजवळच्या कांचेच्या पेटींतून एक इअरिंग जोड बाहेर काढून त्यानें त्याला दाखविला. रघू सोनाराची कामगिरी उत्कृष्ट होती यांत शंका नव्हती त्यानें ते मोती अगदीं आधुनिक प्रकारच्या कोंदणांत बसविले होते. त्यामुळें त्यांचें तेज अधिकच खुलून दिसत असलें तरी ते घनश्यामदासांच्या कंठ्यांतील आहेत असा कुणालाहि संशय आला नसता.

'इअरिंग फार उत्कृष्ट आहे, पण मीं हा जोड कुणाच्यातरी कानांत पाहिला असावा असें मला वाटतें.'

'साहेब, तुम्हीं कदाचित् राणी प्रभावतीबाईंना पाहिलें असेल ?'

'अगदीं बरोबर. दोन वर्षांपूर्वीं मीं त्यांना बंगलोर येथें पाहिलें होतें. सध्यां राणीसाहेबांचा मुक्काम कुठें आहे तें तुम्हांला माहीत आहे काय ?'

'तें मॅनेजरांना माहीत असेल.' नोकर म्हणाला, 'या इअरिंगची किंमत वीस हजार रुपये आहे.'

'इतकी मोठी रक्कम एका इअरिंग जोडवर खर्च करण्याची माझी इच्छा नाहीं पण मला मॅनेजरांना भेटावयाचें आहे!'

चंद्रवदनानें मॅनेजरची भेट घेतली. पण त्याला हवा असलेला पत्ता मिळाला नाहीं. आपला पत्ता कुणालाहि सांगूं नये असें राणीसाहेबांनीं बजावलें होतें.

चंद्रवदन दुकानाचें निरीक्षण करीत बाहेर पडला. दुकानांत दोन तिजोऱ्या होत्या. एक नेहमींच्या आकाराची पण अगदीं आधुनिक पद्धतीची होती आणि दुसरी बरीच मोठी व जुन्या पद्धतीची होती. छोट्या तिजोरींत बहुमोलाचे अलंकार ठेवण्यांत येत असावेत आणि त्या मोठ्या तिजोरींत हिशेबाच्या वह्या वगैरे साहित्य ठेवण्यांत येत असावें असा त्यानें तर्क केला.

पण त्या तिजोऱ्या पाहून चंद्रवदनाला एक अजब कल्पना सुचली होती.

१२

वनमाळीदासांचे दोघे नोकर अस्वस्थ झाले होते. साडेचार वाजण्याचा सुमार झाला होता, तरी मॅनेजर ऑफिस आणि दुकान या दोन्ही भागांतून सारखा फिरत होता. जरीं मालकाची परवानगी नव्हती तरी मॅनेजर चार वाजल्यानंतर आपल्या खोलींत बसून हिशेब लिहूं लागला कीं ते दोघे आळी-पाळीनें बाहेर पडून शेजारच्या दुकानांत चहा घेत असत.

शेवटीं मॅनेजरच्या येरझारा संपल्या आणि त्यानें हिशोबाच्या लठ्ठ वह्या टेबलावर आपटल्या तो आवाज या दोघांच्या कानांवर आला. आणि त्यांच्यां-तील फक्त एकजण चहा घेण्यासाठीं त्वरेनें बाहेर पडला.

तो माणूस बाहेर पडला नाहीं तोंच एक माणूस दुकानांत आला. जरी त्या दिवसाची हवा गरम होती तरी त्या माणसानें लांब गरम कोट चढविला

होता. आणि त्या कोटाचीं मानेपर्यंत बटणें लावलीं होतीं. त्याचप्रमाणें त्यानें आपली हॅट बरीच कपाळावर ओढली होती.

दुकानांतल्या नोकरानें त्या माणसाकड विशेष लक्ष दिलें नाहीं. तें गिऱ्हाईक चुकून भलत्याच दुकानांत शिरलें असावें अशी त्याची कल्पना होती. पण जेव्हां त्यानें त्या आंत आलेल्या माणसाचा करडा आणि अधिकारदर्शक आवाज ऐकला तेव्हां मात्र तो तत्परतेनें त्याच्याकडे धांवला.

'मॅनेजर कुठें आहेत ?'

'ते सध्यां कामांत आहेत साहेब.' नोकर म्हणाला.

'त्यांना जाऊन सांग कीं, मी भेटावयास आलों आहें.'

'साहेब, आपण कशाकरतां आलां आहांत हें जर सांगितलें असतें तर बरें झालें असतें.' तो म्हणाला 'मॅनेजर यावेळीं हिशेबांत गढलेले असतात आणि जर कुणी त्रास दिला तर तें त्यांना आवडत नाहीं.'

'मला ताबडतोब भेट हवी आहे असें त्यांना सांग. मी पोलीस अधिकारी आहें मला खाजगी बोलावयाचें आहे. हें माझें कार्ड पहा.' इन्स्पेक्टरनें कार्ड दाखविलें पण नोकरानें त्यावरून ओझरती नजर टाकली नाहीं तोंच त्यानें तें खिशांत घातलें आणि तो पुढें म्हणाला, 'जलदी कर. काम महत्त्वाचें आहे.'

एरव्ही तो नोकर त्याचा जोडीदार नसतांना दुकान सोडून आंतल्या खोलींत गेला नसता मॅनेजर खालीं मान घालून हिशेब करीत होते. किंचित् खांकरून तो नोकर म्हणाला, 'मला माफ करा साहेब, पण एक पोलीस इन्स्पेक्टर आले आहेत आणि त्यांना तुमची ताबडतोब भेट हवी आहे.'

'इन्स्पेक्टर ! त्याचें काय काम आहे ? ठीक आहे, मी ताबडतोब बाहेर येतो असें त्यांना सांग.'

मॅनेजरानें घाईघाईनें हिशेबाच्या वह्या बंद केल्या. आरशासमोर उभें राहून आपले कपडे सारखे केले आणि रुमालानें तोंड पुसून ते बाहेर आले. तेव्हां एका नोकराखेरीज दुकानांत कोणीं नव्हतें.

'ते इन्स्पेक्टर कुठें आहेत ?'

'मला–मला माहीत नाहीं साहेब, मी तुम्हांला त्यांचा निरोप कळविण्यास आंत गेलों तेव्हां ते येथें होते आणि परत आलों तेव्हां ते नव्हते.'

'शांताराम कुठें आहे ? कीं तोहि इन्स्पेक्टरसह नाहींसा झाला ? त्याच-वेळीं नाहींसा झालेला शांताराम परतला होता, पण मॅनेजरांचा चेहरा पाहून दारांतच थांबला होता.

'तूं कोठें गेला होतास ?' मॅनेजरानें जोरांत विचारलें.

'मी–मी !

तर तूं हुकुमाविरुद्ध दुकान सोडून बाहेर गेला होतास !' मॅनेजरानें त्याला हुकुमभंगाबद्दल व्याख्यान देण्यास सुरुवात केली. पण तेवढ्यांत त्यांना

नाहींशा झालेल्या इन्स्पेक्टरांची आठवण झाली आणि ते घाईघाईनें म्हणाले, 'पण तो मघांचा माणूस खरोखर इन्स्पेक्टर होता काय ? तुम्ही सर्व कपाटें तपासून आपल्या वस्तु जागेवर आहेत याबद्दल खात्री करून घ्या. मी पोलीस स्टेशनवर टेलिफोन करतों '

टेलिफोन केल्यानंतर कुणाहि इन्स्पेक्टराला वनमाळीदासांच्या दुकानीं पाठविण्यांत आलें नव्हतें असें सांगण्यांत आलें मॅनेजर घाबरला आणि त्यानें माल–तपासणींत स्वत: भाग घेतला. जेव्हां एकाहि वस्तूला हात लावण्यांत आलेला नाहीं अशी त्याची खात्री पटली तेव्हां त्यास बरें वाटलें.

ती सर्व गडबड चालू असतांनाहि काळापहाड वनमाळीदासांच्या मोठ्या तिजोरींत दडी मारून बसला होता. नोकर मॅनेजराला वर्दी देण्यासाठीं आंत जातांच त्यानें तिजोरींत शिरून तेथल्या हिशेबाच्या लठ्ठ वह्यांमागें दडी मारली होती. अर्थातच त्याची ती परिस्थिति चांगली नव्हती. कुणीहि ही उघडी तिजोरी तपासणें शक्य होतें. नंतरहि कुणीं त्या तिजोरीतील कांहीं काढून घेण्यास ठीं तेथें येण्याचा संभव होता.

दुसरी एक चिंता होती. फोर्ट विभागांतील दुकानें जरी लवकरच बंद करण्याची प्रथा असली तरी तिजोरी बंद झाल्यानंतर ती उघडून बाहेर पडेपर्यंत आंत शुद्ध हवेचा पुरवठा निदान तीन तासपर्यंत तरी राहू शकेल काय हा महत्त्वाचा प्रश्न होता. पण या सर्व प्रश्नांचीं उत्तरें मिळण्याचा कांहींच संभव नसल्यामुळें तो आपल्या दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसला.

सहा वाजतां नेहमींप्रमाणें दुकान बंद होणार होतें. पावणेसहालाच नोकर बाहेर पडण्याच्या तयारीला लागला. जवाहिराच्या सर्व कपाटांना कुलुपें लावण्यांत आलीं. मॅनेजर दुसऱ्या दिवसाच्या कामाबद्दल सूचना देत होते. शेवटीं एकच काम शिल्लक राहिलें

'शांताराम, माझ्या टेबलावरील हिशेबाच्या वह्या तिजोरींत ठेव.'

तिजोरीकडे सरकणाऱ्या पावलांचा आवाज होऊं लागला. प्रसंग आलाच तर दोन हात करण्याची काळापहाडनें तयारी केली होती. पण शांतारामनें उघड्या तिजोरींत दुरूनच हिशेबांच्या वह्या फेकल्या आणि दार बंद करून जोरानें चावी फिरविली. आतांपर्यंत कुणालाहि दाद न देणारा काळापहाड त्या लोखंडी तिजोरींत कैदी बनला होता.

बाहेरचें दार बंद होण्याचा आवाज ऐकतांच काळापहाडनें ती तिजोरी आंतून उघडण्याचा प्रयत्न सुरू केला. तेथल्या कोंदट हवेमुळें तो घामाघूम झाला होता. जागा अगदींच अरुंद असल्यामुळें त्याला विशेष हालचाल करतां येत नव्हती दीड तास मेहनत घेतल्यावर त्यानें तिजोरी उघडली आणि दार ढकललें, पण तें उघडलें जाईना. त्या जुन्या पद्धतीच्या तिजोरीला बाहेरून पोलादी अडसर होता ! तो अडसर काढण्यासाठीं त्या तिजोरीला

हात बाहेर काढण्याइतकें छिद्र तयार करणें आवश्यक होतें आणि तें काम करण्यासाठीं त्याला कित्येक तास मेहनत घ्यावी लागणार होती. एकच गोष्ट समाधानकारक होती कीं, छिद्र पाडण्यास सुरुवात केल्यानंतर बाहेरची शुद्ध हवा आंत येणार होती.

त्यानें आपला कमरपट्टा काढून तो व्यवस्थित ठेवला व त्यांतील योग्य हत्यारांची निवड करून आपल्या कामाला सुरुवात केली. काम अतिशय कठीण होतें. वेळ हळूहळू निघून जात होता. त्याच्या अंगांतून घामाच्या धारा वहात होत्या. पण आतां बाहेरच्या शुद्ध हवेचा पुरवठा होऊं लागल्यामुळें गुदमरण्याची भीति नव्हती.

त्याला, त्या तिजोरीला त्याला हवें असलेलें वर्तुळ पाडण्यास साडेतीन तास सतत श्रम करावे लागले. त्यानंतर पंधरा मिनिटें तो अडसर कापण्यांत खर्च झालीं. त्यानंतर तो आपला पट्टा व्यवस्थित बांधून व तोंडावर काळा बुरखा धारण करून त्या तिजोरींतून बाहेर पडला त्याच्या हाताचीं बोटें सोलवटलेलीं होतीं अवघडल्यामुळें हातापायाचे सांधे दुखत होते.

त्यानें सरळ जमिनीवर लोळण घेऊन अर्धा तास विश्रांति घेतली व नंतर त्यानें त्या तिजोरींतील हिशेबाच्या वह्या तपासण्यास सुरुवात केली पांच मिनिटांतच त्याला त्या दिवसाच्या हिशेबांत राणी प्रभावतीचें नांव वाचावयास मिळालें. मॅनेजरानें नांवाबरोबर तिचा पत्ताहि लिहिला होता. कृष्णाकुमारी राणी प्रभावती या नांवानें कुलाब्यांतील एका हॉटेलांत रहात होती.

'ज्यासाठीं एवढी मेहनत घेतली तें काम तर झालें !' काळापहाड आनंदानें म्हणाला, 'आतां येथून बाहेर पडलें पाहिजे.'

पण यावेळीं पावणेबारा वाजले होते. निदान एक वाजेपर्यंत तरी रस्ता वहाता रहाणार होता. त्यासाठीं कांहीं वेळ थांबणें आवश्यक होतें. काळापहाडनें तेथल्या जवाहिरानें भरलेल्या कपाटाकडे नजर वळविली. आणखी दहाच मिनिटांत वनमाळीदासांचें सर्व मौल्यवान व निवडक अलंकार काळापहाडच्या खिशांत पडले व तो कोणत्या मार्गानें दुकानांतून बाहेर पडावयाचें याचा विचार करूं लागला.

दारावर बाहेरून पोलादी पडदा सोडलेला होता. खिडकीवरहि तसाच पडदा होता. पण तो आंतून होता. त्यानें प्रथम दारावर आणि खिडकीवर बसविलेलें धोक्याचा इषारा देणारें यंत्र नादुरुस्त केलें व खिडकीवरील पडदा वर सारून लोखंडी गज कापले व पलायनासाठीं मार्ग मोकळा केला.

रस्त्यावर सामसूम आहे अशी खात्री करून काळापहाड खिडकीबाहेर निघाला आणि त्याचवेळीं बाजूच्या गल्लींतून पोलीस बाहेर पडावयास एकच गांठ पडली ! शिपायानें वनमाळीदासांच्या दुकानासमोर एक आकृति पाहिली आणि तो धांवतच पुढें आला. त्यावेळीं काळापहाडच्या अंगावर सामान्य पेहे-

राव होता म्हणून बरें झालें.

'काय राव ?' पोलिसानें संशयानें विचारलें आणि फुंकण्यासाठीं शिटी वर उचलली.

'मूर्खा, इकडे ये!' तो म्हणाला व ते अनपेक्षित शब्द ऐकून पोलीस दचकला आणि पुढें झाला, 'तुझें नांव काय ?'

'रामा हरी, पण आपण—'

'मी इन्स्पेक्टर थोरात. तुझ्या मूर्खपणामुळें काळापहाड माझ्या हातून निसटला असता. मोठ्यानें बोलूं नकोस. हें माझें वॉरंट कॉर्ड पहा.' काळा-पहाड ऐनवेळीं उपयोगी पडावें म्हणून तें कार्ड नेहमीं खिशांत बाळगीत असे. तें पाहून रामा हरीची खात्री पटली.

'साहेब, मला क्षमा करा. पण सी. आय्. डी. चे अधिकारी या भागांत येणार आहेत अशी मला सूचना देण्यांत आली नव्हती.' रामा हरी म्हणाला.

'तें जाऊं दे. आतां तूं मला मदत कर त्या समोरच्या घराच्या वरच्या मजल्यावर नजर ठेव आणि तेथें जर टॉर्चचा प्रकाश चकाकतांना दिसला तर तुझी शिटी जोरानें फुंकण्यास सुरुवात कर. मी त्या घरांत जातों. आज रात्रीं काळापहाड त्या जागेंत प्रवेश करणार आहे अशी आम्हांला बातमी मिळाली आहे. सावध रहा आणि मी सांगतों त्या जागेवरून हलूं नकोस. जर काळापहाड सांपडला तर आपणां दोघांनाहि बढती मिळेल.'

काळापहाडनें रामा हरीला वनमाळीदासांच्या खिडकीकडे पाठ करून उभें केलें. काळापहाडनें रस्ता ओलांडला तेव्हां तो तोंडांत शिटी धरून समोरच्या घराच्या वरच्या मजल्याकडे लक्षपूर्वक पहात होता. पाठीमागल्या खिडकीचे गज कापण्यांत आले आहेत, हें त्या बिचाऱ्याच्या ध्यानींमनींहि नव्हतें.

१३

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चंद्रवदन न्याहारी करीत असतांना चितू वांद्रेकर बेधडक आंत घुसला होता.

'तुम्हांला काय हवें आहे ?' चंद्रवदनानें विचारलें.

'मला बरेंच हवें आहे, आणि मी तुम्हांला बरेंच सांगणार आहें.' चितूनें जोरांत उत्तर दिलें.

'तुम्हांला जें कांहीं सांगावयाचें आहे तें नंतर सांगा. सध्यां मला न्याहारी करावयाची आहे व नंतर मला बरेंच लिहावयाचें आहे.'

'नाहीं काळापहाड, मला थांबतां येणार नाहीं.' चितु वांद्रेकर म्हणाला.

'काळापहाड ? जो गुन्हेगार पत्रकारांना सारखें भंडावीत असतो तोच ना ?'

'चंद्रवदन उर्फ काळापहाड, आतां चेष्टेनें भागणार नाहीं.' चितू वांद्रेकर

सध्यें म्हणाला, ' काय घडलें आहे तें मी तुम्हांला सांगतों. चार दिवसांत मीं एक तर काळापहाडला पकडून दिलें पाहिजे, नाहीतर नोकरीला मुकलें पाहिजे अशी मला अट घालण्यांत आली होती. जें अद्याप पोलिसांनाहि साधलें नाहीं तें मला करावयाचें होतें. पण ज्या दिवशीं तुम्हीं प्रभाकरांची पत्रिका चोरलीत त्याच दिवशीं रात्रीं राजा महेंद्रनाथाच्या पत्नीच्या हिऱ्याचा हार चोरला गेला, असा पुरावा मीं मिळविला आहे.'

' मोठी मजेदार हकीकत आहे!' चंद्रवदन कॉफीचे घुटके घेत म्हणाला,

' मजेदार तर खरीच!' चितू उत्साहानें म्हणाला ' चार दिवसांची मुदत टळल्यामुळें मला नोकरींतून काढून टाकण्यांत आलें. काळापहाड, केवळ तुझ्यामुळें मी बेकार बनलों, पण आतां तूं माझ्या मुठींत सांपडला आहेस. ज्यावेळीं तूं वनमाळीदासांची तिजोरी उघडण्यांत गढला होतास त्याचवेळीं माझ्या एका ओळखीच्या गुन्हेगारांकडून मीं तुझी तिजोरी उघडली. त्यांत मला राजा महेन्द्रनाथांच्या पत्नीचा हार मिळाला. तूं तो हार तिजोरींत राहूं देण्यांत फार मोठी चूक केलीस! आतां तुला ही हकीकत मजेदार वाटते ना!'

तें ऐकून चंद्रवदनाला मनांतून धक्का बसला होता. चोवीस तासांत त्याच्या हातांत बेडया पडणार होत्या. चितू वांद्रेकर महापाताळयंत्री होता!

' पण तूं ही हकीकत पोलिसांना न सांगतां मला कां सांगत आहेस ?' त्यानें विचारलें.

' तुझ्यामुळ मी बेकार झालों. आतां तुला माझ्यासाठीं करणें भाग आहे. मी यापुढें माझें आयुष्य ऐषारामांत घालविणार आहें आणि माझा सर्व खर्च तूं चालविणार आहेस.'

तुरुंगवासापेक्षांहि वाईट अशा संकटांत आपण सांपडलों आहोंत हें चंद्रवदनाच्या लक्षांत आलें. चितू वांद्रेकर त्याला जन्मभर पिळून काढणार होता. त्याला चितूसाठीं राबावें लागणार होतें. कदाचित् इच्छेविरुद्ध चोऱ्याहि कराव्या लागणार होत्या.

' आतां सुरुवात म्हणून मला दोन हजार रुपये हवे आहेत.' चितू म्हणाला, ' आणि मला रोख पैसे हवे आहेत.'

' इतकी रोख रक्कम मी जवळ बाळगीत नाहीं. मी तुला चेक देतों.'

' नको, तूं स्वतःच बँकेंतून पैसे काढ मला ते उद्यां सकाळीं दहा वाजण्याच्या आंत मिळाले पाहिजेत.' चितू म्हणाला आणि ऐटीनें निघून गेला.

चंद्रवदन बेचैन झाला होता त्याचें लेखनाकडे लक्ष लागणें शक्य नव्हतें. तोहि कपडे करून बाहेर पडला. आपण कुठें जात आहोंत तें त्याला समजत नव्हतें. तो सारखा चालत होता. जेव्हां तो भानावर आला तेव्हां आपण म्युझियमजवळ पोहोंचलों आहोंत हें त्याच्या लक्षांत आलें व तेथल्याच एका हॉटेलांत कृष्णाकुमारी रहात आहे हें त्याला आठवलें.

कृष्णाकुमारी त्याला पाहून चकितच झाली. 'चंद्रवदन, किती रे हुषार झाहेस!' ती म्हणाली, 'तुझा चेहरा असा कां दिसतो ? काय झालें आहे?'

त्यानें आपल्या दुर्दैवाची कहाणी तिला सांगितली.

'यांत कठीण काय ? मी तुला सोपा मार्ग दाखवितें.' ती म्हणाली आणि तिनें आपल्या मानेवरून बोट फिरविलें.

'नाहीं कृष्णाकुमारी, तो माझा मार्ग नव्हे!' तो खिन्नपणें म्हणाला, 'मी त्याला ठार करूं शकणार नाहीं.'

'तर मग विचार करून निराळा मार्ग शोधला पाहिजे.' ती म्हणाली.

त्याच्या सूचनेप्रमाणें ती त्याच्याबरोबर बाहेर निघाली. त्यांना अगदीं एकांतांतलें एक हॉटेल गांठलें आणि ते चितूबद्दल चर्चा करूं लागले. त्यावेळीं कृष्णाकुमारीला एक युक्ति सुचली.

'आपण जर चितू वांद्रेकरच काळापहाड आहे असा पुरावा तयार केला तर तो तुला त्रास देणार नाहीं.' ती म्हणाली, 'तो काळापहाडच्या वेषांत एखादी तिजोरी उघडीत आहे असा त्याचा फोटो घेतला पाहिजे. त्या भेकडाला दम देऊन आपणांला तसें करतां येईल.'

'नाहीं. चितू तसा फोटो न काढूं देण्याइतका खचित वस्ताद आहे. शिवाय त्याचा पूर्वेतिहास गोळा करून तो काळापहाड असणें शक्य नाही असें पोलीस सिद्ध करतील आणि आपणांजवळ तो फोटो कसा आला याचा खुलासा करणेंहि जड जाईल.'

'त्याच्या जागेंत कांहीं चोरीचा माल दडविला तर ?' तिनें विचारलें.

'नाहीं कृष्णाकुमारी, मीं त्याबद्दलहि विचार केला आहे.' तो म्हणाला.

पण तिनें त्याच्याबरोबर बरीच चर्चा करून त्याचे सर्व मुद्दे खोडून काढले. चंद्रवदनाची बुद्धी त्यावेळीं नेहमीप्रमाणें काम देत नव्हती

त्यामुळें त्यानें शेवटीं तिच्या योजनेला मान्यता दिली. चंद्रवदनाला त्या संकटांतून सोडविण्यास तीहि अतिशय उत्सुक होती. पण तें कोडें तिनें तिच्या पद्धतीनें सोडविण्याचें ठरविलें होतें. त्याच्या नव्हे!

● ○ ○ ○

दुसऱ्या रात्रीं झोंपण्याच्या तयारींत असलेला चितू वांद्रेकर चिडलेल्या मन:स्थितींत होता. त्या सकाळीं त्याला मिळालेल्या दोन हजारांतून त्यानें पांचशें रुपयांचें कर्ज फेडलें होतें. तीनशें रुपयाचें नवीन कपडे खरेदी केले होते. पण एक हजार रुपये जुगारांत गमाविले होते.

सकाळीं काळापहाडकडून आणखी पांच हजार रुपये आणावयाचें ठरवून तो आपले कपडे उतरणार होता तोंच त्यानें अचानक आवाज ऐकला.

'कपडे उतरूं नकोस. तुला माझ्याबरोबर बाहेर जावयाचें आहे!'

चितू दचकून मागें वळला. सुमारें दहा फुटांवर दोन कृष्णवस्त्रधारी

व्यक्ति तोंडावर काळे बुरखे चढवून उभ्या होत्या आणि त्यांनीं आपलीं पिस्तुलें चितूवर रोंखलीं होतीं.

'अरे बापरे ! काळापहाड !' चितू घाबरून म्हणाला, 'काळापहाड, मी तुला सतत पिळून काढणार, असें चेष्टेनें म्हटलें होतें मला दोन हजारांचीच गरज होती. मी आतां तुझ्या संबंधींचें विसरून जाणार होतों !'

काळापहाडनें एक पुडकें त्याच्या पायांजवळ उडविलें आणि तो म्हणाला, 'त्या पार्सलांत काळापहाडचे कपडे आहेत, ते उचल आणि आमच्या बरोबर चल.'

'पण कुठें ? तुम्हीं माझें काय करणार आहांत ?' घाबरलेला चितू तें पार्सल उचलून म्हणाला.

'तूं निमूटपणें आमच्याबरोबर चल !' दुसरी व्यक्ति म्हणाली, 'जर गडबड केलीस तर लागलीच प्राणाला मुकशील ?'

स्त्रीचा आवाज ऐकून चितू दचकला. एक स्त्री काळापहाडची मदतनीस होती ! ती स्त्री कोण असावी ? पण तिचा आवाज ऐकून त्याला थोडा धीरहि आला होता. ती स्त्री काळापहाडइतकी निर्दय असणें शक्य नव्हतें. ती बरोबर असतांना काळापहाड खून करण्याचा प्रयत्न करणार नाहीं. तो निमूटपणें त्यांच्याबरोबर निघाला.

दाराबाहेर पडतांच त्या दोघांनींहि तोंडावरील बुरखे दूर केले होते. दारासमोरच मोटार उभी होती. चितू वांद्रेकराला आंतल्या भागांत बसविल्या-नंतर चंद्रवदन ड्रायव्हरच्या जागेवर बसला आणि त्यानें ती सुरू केली.

दीड तास मोटार वेगानें चालली होती. ठाण्यापर्यंतचा प्रदेश चितूच्या ओळखीचा होता. पण नंतर ती कोणत्या दिशेनें जात आहे हें त्याला समजलें नव्हतें. तो कांहींच हालचाल करू शकत नव्हता. कारण प्रवासाला सुरुवात झाल्यापासून शेजारीं बसलेल्या कृष्णाकुमारीनें बरोबर त्याच्या छातीवर पिस्तुल रोंखलें होतें.

अखेरीस मोटार थांबली. आजूबाजूला दाट झाडी होती. काळापहाड खालीं उतरला आणि त्यानें पाठीमागलें दार उघडून थरथर कांपणाऱ्या चितू वांद्रेकराचा हात धरून त्याला खालीं ओढलें.

'तें पार्सल उचल आणि माझ्याबरोबर चल.' काळापहाड म्हणाला.

'पण कां ? ऐका काळापहाड, मी तुम्हांला अगदीं—'

'माझ्याबरोबर चल !' दरडावणीच्या स्वरांत काळापहाड म्हणाला.

'मी एक मिनिटभर येथेंच रहाणार आहे' कृष्णाकुमारी म्हणाली.

काळापहाडला तें ऐकून नवल वाटलें. पण तो आपलें कांकडी पिस्तुल चितू वांद्रेकराच्या पाठींत खुपसून तेथल्या पायवाटेनें दाट झाडीकडे जाऊं लागला. चितू वांद्रेकर आतां अगदींच घाबरला. काळापहाड त्याला दाट

झाडींत नेऊन ठार करणार होता. तें दृश्य पहाण्याचें धाडस नसल्यामुळें ती बाई मोटारींत रहाणार होती. चितू दयेची याचना करूं लागला.

'गप्प बैस.' कठोर स्वरांत काळापहाड म्हणाला, 'येथें मोठ्यानें ओरडलास तरी कांहीं फायदा होणार नाहीं. कारण आजूबाजूला कित्येक मैलपर्यंत येथें कोणीहि नाहीं.'

चितूचीं पावलें जड पडूं लागली. त्याचे पाय लटपटत होते. काळापहाड त्याला वधस्तंभाकडे नेत होता !

पण तेवढ्यांत कृष्णाकुमारी पाठीमागून घाईघाईनें आली. थोडा वेळ ते तिघेहि बरोबर चालत होते. धांवल्यामुळें तिला दम लागला होता. तिनें काळापहाडला थांबविलें आणि सूचना केली.

'तुम्ही एकटेच पुढें जा आणि सर्व व्यवस्था अगदीं व्यवस्थित झाली आहे अशी खात्री करा मी तोंपर्यंत कैद्याला सांभाळतें !'

काळापहाड दूर जातांच चितू कृष्णाकुमारीकडे वळून म्हणाला, 'कृपा करून मला सांगा. तो करणार आहे तरी काय ?'

'दुसरें काय करणार ? तो तुला ठार करणार आहे. नंतर कांहीं दिवसांनीं काळापहाडच्या वेषांत कुठल्यातरी घरांत तुझें प्रेत सांपडणार आहे.'

चितू वांद्रेकराच्या अंगावर शहारे आले. तो अतिशय घाबरून म्हणाला, 'पण मीं असें केलें आहे तरी काय ? मी त्याच्याकडे पुन्हां पैसे मागणार नव्हतों. इतकेंच नव्हे तर त्याला कधीं त्रासहि देणार नव्हतों. बाईसाहेब, तुम्हीं मला मदत केली पाहिजे.'

'मी तुला कसली मदत करणार ?'

'बाईसाहेब, काळापहाड जरी चोर असला तरी त्यानें आतांपर्यंत कधींहि खून केला नाहीं, असा त्याचा लौकिक आहे. मी जर मेलों तर तो खुनी ठरेल आणि त्याच्या यशाला कालिमा लागेल बाईसाहेब, तें तुम्हांला आवडेल काय?'

'तूं म्हणतोस त्यांत बरेंच तथ्य आहे.' ती विचार करीत म्हणाली, 'पण मीं आतां करावें तरी काय ?'

चितूची आशा फोंफावली. शेवटीं ती बाई त्याच्या युक्तीला बळी पडली होती. तेथून निसटतां आलें, तर दुसऱ्याच दिवशीं तो काळापहाडला चांगलाच धडा शिकविणार होता. दुसऱ्या दिवशीं पांच नव्हे तर पन्नास हजारांची मागणी करणार होता.

'बाईसाहेब, तुम्हीं जर मला पळून जाण्याची संधि दिली तर मी त्या मोटारींतून पळून जाईन.'

'पण काळापहाडनें जवळच दुसरी एक जलद गतीची मोटार ठेवली आहे. तो तुझा पाठलाग करील.'

'त्याची तुम्ही काळजी करूं नका. मी इतक्या वेगानें मोटार चालवीन कीं

तो मला पकडूं शकणार नाहीं आणि एकदां मीं ठाणें शहर गांठलें, कीं त्याला माझ्यावर गोळीबारहि करतां येणार नाहीं.'

'काळापहाडच्या नांवाला खुनाचा बट्टा लागूं नये असें मलाहि वाटतें.' ती म्हणाली, 'पण तुला आमची मोटार चालवितां येईल ?'

'जरूर चालवितां येईल.' चितू घाईघाईनें म्हणाला, 'बाईसाहेब, हा माझ्या प्राणांचा प्रश्न आहे.'

'पण तुला मीं आतां जाऊं दिलें तर तूं काळापहाडला त्रास देणार नाहींस कशावरून ?' तिनें विचारलें.

चितू काळापहाडला खूप त्रास देणार होता. पण तो म्हणाला, 'बाईसाहेब, मी त्यासाठीं वाटेल ती शपथ घेण्यास तयार आहें.'

'ठीक आहे. मला तुझी दया येते.' कृष्णाकुमारी म्हणाली, 'पण तुला घाई करावी लागेल. काळापहाड परत येत आहे.'

चितू जीव घेऊन पळाला आणि त्यानें मोटार गांठली. मोटार सुरू करण्याची चावी जागेवरच आहे असें पाहून त्यानें समाधानाचा सुस्कारा सोडला. तो धडपडतच ड्रायव्हरच्या जागेवर बसला आणि त्यानें ती वेगानें सुरू केली. तेथून दूर जावयाचें हा एकच विचार त्याच्या मनांत घोळत होता.

दूर निघून जाणाऱ्या त्या मोटारीकडे पाहून कृष्णाकुमारीनें उसासा सोडला. चितू वांद्रेकर स्वखुषीनें फरारी झाला आणि त्या मोटारीचा उपयोग करण्याची कल्पनाहि त्याचीच होती. पुढें जें कांहीं घडणार होतें, त्याबद्दल तिला कुणींच जबाबदार धरूं शकणार नव्हतें. कोणत्याहि मोटारीच्या पुढल्या चाकाचे नट ढिले पडणें शक्य होतें. शिवाय काळापहाडच्या स्वातंत्र्याचा प्रश्न होता. कृष्णाकुमारीनें बेफिकिरीनें खांदे उडविले, आणि चितू वांद्रेकराबद्दलचा विचार मनांतून काढून टाकला.

काळापहाड धांवत आणि धापा टाकीत तिच्याजवळ आला आणि म्हणाला, 'मीं मोटारीचा आवाज ऐकला. आपलीच तर मोटार नव्हे ? आणि चितू कोठें आहे ?'

'चितू पळाला ! त्यावर पिस्तुल झाडणें मला शक्य झालें नाहीं. चंद्रवदन, मला क्षमा कर. आपली योजना ढासळली.' ती म्हणाली.

तिच्या नजरेंत चकाकणारे अश्रुबिंदु पाहून चंद्रवदन विरघळला. तो म्हणाला, 'जाऊं दे. त्याबद्दल तूं वाईट वाटून घेऊं नकोस. खरें म्हणशील तर तुझी योजना मला आवडलीच नव्हती मी चितूला ताळ्यावर आणण्याचा कांहींतरी मार्ग शोधून काढीन. प्रश्न असा आहे कीं, आतां आपण मुंबईला जायचें कसें ?'

'येथून पाव मैलावर एक मोटार रस्त्यावर उभी आहे. आपण येथें येतांना मीं ती पाहिली. जर ती मोटार अद्याप तेथेंच असली तर आपलें काम होईल.'

ती म्हणाली.

मोटार तेथेंच होती. त्या मोटारीची व्यवस्था कृष्णाकुमारीनें आगाऊ केली होती, पण त्याला तें माहीत नव्हतें. त्यानें मोटार चोरून आणली होती. तिनें या दुसऱ्या मोटारीची त्या सकाळीं चोरी केली होती.

दहा मिनिटांनंतर चंद्रवदनाला ती मोटार थांबवावी लागली. वाटेंत एक अपघात घडला होता. अपघाताच्या ठिकाणीं अॅम्ब्युलन्स आणि पोलीस होते, त्यामुळें बराच रस्ता अडला होता.

'साहेब, तुम्हीं अगदीं बाजूनें आणि सावकाश पुढें मोटार काढा.' तेथें व्यवस्थेसाठीं असलेला अधिकारी म्हणाला.

'पण येथें घडलें आहे काय ?' चंद्रवदनानें विचारलें.

'फार वाईट अपघात घडला आहे !' अधिकारी म्हणाला, 'तो माणूस फार वेगानें मोटार चालवीत असावा. मोटारीचीं पुढलीं दोन्हीं चाकें निखळून तीं जोरानें या तारेच्या खांबाबर आदळलीं आणि तो माणूस जागच्या जागीं ठार झाला.'

'तो होता तरी कोण ?' चंद्रवदनानें विचारलें.

'तो कुठल्यातरी वर्तमानपत्राचा बातमीदार असावा असें त्याच्या खिशां-तील कागदपत्रांवरून दिसतें. त्याचें नांव होतें चितू वांद्रेकर.'

चंद्रवदनानें आपली मोटार बाजूनें आणि सावकाश पुढें नेली. नंतर ती वेगानें सुरू केली. चितू वांद्रेकराच्या मृत्यूचें त्याला दुःख झालें नव्हतें. कारण त्या अपघाताचा कोणता सत्य प्रकार होता हें त्याला माहीत नव्हतें.

तो आनंदानें म्हणाला, 'कृष्णाकुमारी, ईश्वरानेंच मला एका मोठ्या संकटांतून सोडविलें !'

त्याची आनंदी मुद्रा पाहून तिलाहि आनंद झाला. ती म्हणाली, 'आतां तूं माझ्या हॉटेलांत चल. संकट टळलें याबद्दलचा आपणा दोघांनाहि होणारा आनंद आपण एकत्र फराळ करून साजरा करूं.'

त्यांनीं हॉटेलाच्या खोलींत प्रवेश केला तेव्हां ते दोघेंहि दचकले. समोर-च्या आरामखुर्चीवर बहिरीससाणा बसला होता !

१४

'तूं येथें कां आलास ?' कृष्णाकुमारीनें विचारलें.

'तुला भेटायला आलों.' बहिरीससाणा म्हणाला, 'आपण आपला हिशेब पूर्ण केलेला नाहीं. चंद्रवदन, आपण त्या महालक्ष्मीला गेलों होतों तें घर कुणाच्या मालकीचें होतें ?'

'त्या घरमालकाचें नांव वासुदेव बळवंत साटम.'

'कृष्णाकुमारी, तूं त्या घरीं आम्हाला कोणत्या उद्देशानें बोलाविलें

होतीस ?' बहिरीससाण्यानें विचारलें.

'मी ? कुठें ? कुणाचें घर ?' कृष्णाकुमारीनें विचारलें.

'मी काय बोलत आहे तें तुला बरोबर समजतें.' बहिरीससाणा म्हणाला.

'नाहीं. पंढरीनाथ, तिला तें समजत नसावें. कारण त्याबद्दल मीं तिला कांहींच सांगितलें नव्हतें.' चंद्रवदन म्हणाला, 'ती कल्पना माझीच होती.'

चंद्रवदनानें जेव्हां आपल्या त्या कल्पनेचें स्पष्टीकरण केलें, तेव्हां कृष्णाकुमारी हंसली. बहिरीससाणाहि हंसला. पण लागलीच पंढरीनाथाचा चेहरा बदलला. त्यानें विचारलें, 'कृष्णाकुमारी, तो मोत्यांचा कंठा कुठें आहे ?'

'तो माझ्याजवळ नाहीं.' ती म्हणाली.

'हें बघ कृष्णाकुमारी, काळापहाडचें स्त्रीदाक्षिण्य माझ्यामध्यें नाहीं मी तुला जग्या आणि हरी यांच्या ताब्यांत देणार आहें. तुला बोलकी कशी करावयाची तें त्यांना चांगलें समजतें.'

कृष्णाकुमारीची चर्या एकदम उतरली. पण काळापहाड म्हणाला, 'पंढरीनाथ, तुला तसें करतां येणार नाहीं.'

'मला करतां येणार नाहीं ? काळापहाड, तूं मूर्खपणा करूं नकोस. कृष्णाकुमारीजवळ मोत्याचा कंठा आहे आणि तो मला मिळाला पाहिजे. तूं निष्कारण मध्यें पडूं नकोस. हरि ! जग्या !'

ते दोघे धांवतच तेथें आले. त्यांच्याकडे वळून पंढरीनाथ म्हणाला, 'जर काळापहाडनें कांहीं गडबड केली तर त्याला लागलीच ठार करा.'

'मोठ्या आनंदानें.' हरि म्हणाला.

काळापहाड त्याच क्षणीं तरी कांहींच करूं शकत नव्हता. ते तिघे चांगले दांडगे होते, उलट्या काळजाचे होते आणि हत्यारबंद होते. आपल्या पिस्तुलाचा उपयोग करण्यास ते मुळींच कचरणार नव्हते.

'कृष्णाकुमारी, मी तुला शेवटचें निक्षून विचारतों. तो मोत्यांचा कंठा कुठें आहे ?' बहिरीससाण्यानें विचारलें.

'तो माझ्याजवळ नाहीं, असें मीं तुला सांगितलेंच आहे.' ती म्हणाली.

'हें बघ, मूर्खपणा करूं नकोस नाहींतर तुझी अतिशय विटंबना होईल. आणि ती या काळापहाडला पहावी लागेल—'

आतां मात्र काळपहाडला रहावेना आणि त्यानें हाताच्या मुठी आंवळून पुढे पाऊल टाकलें. पण त्याचवेळीं जग्यानें त्याच्या मस्तकावर पाठीमागून रबरी दंडुक्याचा प्रहार केला. काळापहाड बेशुद्ध होऊन खालीं पडतांच कृष्णाकुमारी इतरांची पर्वा न करतां त्याच्याकडे धांवली.

'त्याला कांहींच झालें नाहीं.' बहिरीससाणा गुरगुरला, 'जग्याला फटका कसा मारावा तें बरोबर समजतें. तो एकदोन मिनिटांत शुद्धीवर येईल. चला रे, त्याचे हात बांधा.'

काळापहाड शुद्धीवर आला तेव्हां त्याचे हात बांधलेले होते आणि त्या खोलींत फक्त कृष्णाकुमारी आणि पंढरीनाथ हे दोघे होते.

'पाजी माणसा, जर तूं कृष्णाकुमारीला हात लावलास!' मस्तकांत वेदना होऊं लागल्यामुळें काळापहाडनें आपलें बोलणें अर्धवट सोडलें.

'तूं बोलूं नकोस. तो अधिक चेष्टा करील.' ती म्हणाली. पण त्याच वेळीं हॉटेलांतील धोक्याचा इषारा देणारी घंटा वाजली आणि एक अश्लील शिवी हांसडून पंढरीनाथ म्हणाला, 'हा काय प्रकार आहे ?'

पण त्याचवेळीं दाराच्या फटींतून आंत येणारा धूर तिघांनींहि पाहिला. बाहेर कुणींतरी मोठ्यानें ओरडलें. 'आग ! आग !'

'अरेच्चा ! घोटाळा झाला ! पंढरीनाथ घाबरलेल्या स्वरांत म्हणाला.

कृष्णाकुमारीनें तिरस्कारानें त्याच्याकडे पाहिलें आणि काळापहाडचे हात सोडविले. पंढरीनाथ तिच्या अंगावर ओरडून म्हणाला, 'उभी काय राहिलीस? बाहेर कसें पडावयाचें तें सांग.'

घाबरलेला पंढरीनाथ तिच्या उत्तराची वाट न पहातां धांवतच बाहेर गेला. धुराचे लोट त्या खोलींत शिरत होते. कृष्णाकुमारी काळापहाडला क्षणभर थांबावयास सांगून आंतल्या खोलींत गेली. कांहीं क्षणांतच ती परत आली तेव्हां तिच्या हातांत दोन छोटया बॅगा होत्या. काळापहाडनें त्या घेण्यासाठीं पुढें हात केला तेव्हां तिनें त्यांतील एकच त्याच्या हातांत दिली. तळमजल्यावर अधिकच गडबड उडाली होती. पाहुणे आणि नोकर हॉटेला-बाहेर पडण्यासाठीं दाराजवळ लठ्ठालठ्ठी करत होते. तेवढयांत दोन बंब तेथ आले आणि पाण्याचे पाईप हातीं घेऊन बरेच बंबवाले हॉटेलांत शिरले.

कांहीं मिनिटांतच ते परत आले आणि त्यांनीं आपला रिपोर्ट सादर केला. कुठेंहि आग लागली नव्हती. कुणीतरी कांहीं रासायनिक मिश्रणामुळें तो धूर निर्माण करून चावटपणा केला होता.

'जें झालें तें आपल्या पथ्यावरच पडलें.' चंद्रवदन कांहीं वेळानें म्हणाला, 'पंढरीनाथ अगदींच वेताळ बनला होता.'

'होय चंद्रवदन, पण माझी बॅग तुमच्याजवळ आहे ना ?'

'नाहीं, तूं माझ्याजवळ जी दिलीस तीच मीं सांभाळली आहे.'

'ते बंबवाले आंत आले तेव्हां मीं ती माझ्या बाजूला ठेवली होती. ती नाहींशी झाली कशी ?'

'चंद्रवदनाला एक कल्पना सुचली. तो म्हणाला, 'त्या बॅगेंत काय होतें?'

'कपडे होते.' ती म्हणाली.

'आणि तो मोत्यांचा कंठाहि त्याच बॅगेंत होता ना ?'

ती घुटमळत म्हणाली, 'होय, पण ...' आणि चंद्रवदन मोठ्यानें हंसूं लागला.

'तुला हंसायला काय झालें ?'

'वेड कृष्णाकुमारी,हॉटेलाला आग लागल्याचें नाटक करून पंढरीनाथानेंच ती पळविली.' चंद्रवदन म्हणाला, 'त्याला माहीत होतें कीं जें काहीं महत्त्वाचें असेल तें तूं तुझ्याजवळ बाळगशील.'

पंढरीनाथाच्या त्या धूर्तपणावर खूष होऊन चंद्रवदन हंसतच घरीं गेला. त्याच्या बैठकीच्या खोलीत त्यानें आरशाआड एक मजबूत तिजोरी भिंतींत बसविली होती. तो त्या आरशापमोर उभा राहिला तेव्हा कांचेला अगदीं खालच्या बाजूला एक लहानसा पांढरा कागद चिकटलेला दिसला. त्यानें तो काढून हातीं घेतला.

त्या कागदावर लिहिलें होतें—"फार आभारी आहे—बहिरीससाणा.'

चंद्रवदनानें आरसा बाजूला सरकविला. त्याची तिजोरी रिकामी होती !

अगदीं निवडक माल तो आपल्या फडताळांतील गुप्त खणांत ठेवीत असे. त्यांतील कांहीं अलंकार त्याला पाहावेसे वाटत आणि ते तो या तिजोरींत ठेवीत असे आणि त्यावर बहिरीससाण्यानें हात मारला होता.

त्या दुपारीं त्याच्या आमंत्रणाप्रमाणें कृष्णाकुमारी त्याच्याकडे जेवायला आली त्यावेळीं त्या दोघांनीं बरीच चर्चा केली पंढरीनाथानें इतर अलंकारा-बरोबर जे मोत्यांचे इअरिंग काळापहाडनें मोठ्या कष्टानें मिळविले होते तेहि लांबविले होते. कृष्णाकुमारीच्या आग्रहावरून काळापहाडनें पंढरीनाथा-कडून ते सर्व माल परत मिळविण्याचें ठरविलें.

तो घेला मारवाड्याकडे गेला. पंढरीनाथ घेलाला कांहीं अलंकार विक-णार नाहीं हें त्याला माहीत होतें; पण घेलाला चोरबाजारांत घडणाऱ्या सर्व गोष्टींची खडान् खडा माहिती असे. घनश्यामदासांचा मोत्यांचा कंठा दुर्लभदासानें विकत घेतला असल्याची बातमी घेलानेंच काळापहाडला सांगितली.

'काळापहाड, तूं तो कंठा परत मिळविण्याचा विचार मनांत आणूं नकोस.' घेला हंसून म्हणाला, 'यापूर्वीं तेघांनीं दुर्लभदासाची चोरी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यापैकीं एकाला सात वर्षांची आणि दुसऱ्याला पांच वर्षांची शिक्षा झाली होती. काळापहाडनें जर ती चोरी करण्यांत यश मिळ-विलें तर मी दहा रुपयांचे दहा हजार देण्यास तयार होईन.'

काळापहाड निघून गेला. नंतर घेलाने पाहिलें, टेबलावर दहा रु. ची नोट ठेवली होती. काळापहाडनें त्याचें तें आव्हान स्वीकारलें होतें.

१५

दुर्लभदासाचा चेंबूर येथील वाडा बाराव्या शतकांत बांधलेला होता. तो वाडा म्हणजे एक छोटासा किल्ला असून त्याच्या सभोंवतीं खंदक होता. आतां

अर्थातच त्या खंदकांत पाणी नव्हतें. तो वाडा मालकाकडून दुर्लभदासानें विकत घेतला होता आणि त्यानें वाड्याची डागडुजी करून त्याला चांगलें स्वरूप दिलें होतें.

त्या वाड्याच्या तळमजल्यावर स्वयंपाकघर, भोजनाचा दिवाणखाना होता व नोकर रहात होते. पहिल्या मजल्यावर पाहुण्यासाठीं आरामशीर खोल्या होत्या आणि दुसरा मजला दुर्लभदासानें स्वत:साठीं राखून ठेवला होता. त्याशिवाय त्यानें बुरुजाची दुरुस्ती करून तेथें दोन खोल्या तयार केल्या होत्या त्यापैकीं एका खोलींत त्याचें खाजगी वाचनालय होतें. वाचनालयांतूनच दुसऱ्या खोलींत जातां येत असे आणि त्या दुसऱ्या खोलींत दुर्लभदासाची तिजोरी होती. त्या तिजोरीच्या खोलींतच दुर्लभदास आपला बराच वेळ घालवीत असे.

दुर्लभदास ही एक विचित्र व्यक्ति होती. त्यानें एवढी संपत्ति कोठून मिळविली हें कोणालाच माहीत नव्हतें. त्यानें ती सरळ मार्गानें मिळविली नाहीं असा लोकांचा समज होता. त्यामुळेंच तो श्रीमंत असूनहि घरंदाज लोक त्याच्यापासून दूर रहात. जेव्हां समाजांत आपणांला स्थान नाहीं असें दुर्लभदासानें पाहिलें तेव्हां त्याला रत्नसंग्रह करण्याचा नाद जडला. आपल्या रत्नसंग्रहाकडे नुसतें पहाण्यांत तो कित्येक तास आनंदानें घालवीत असे व तो नाद बळावल्यामुळें तो चोरीचा मालहि विकत घेत असे.

पण याबरोबरच त्याला चोरांचीहि भीति वाटूं लागली. विश्वासघाताचा संभव कमी करण्याच्या उद्देशानें त्यानें घरांतल्या नोकरांची संख्या अगदींच कमी केली होती. पण त्याचवेळीं पहारेकऱ्यांची संख्या वाढविली होती. त्या वाड्याभोंवतीं सशस्त्र पहारेकरी रात्रं-दिवस पहारा करीत असत. अशा या वाड्यांत शिरण्याचें काळापहाडनें ठरविलें होतें. त्यानें प्रथम दुर्लभदासाबद्दल व त्या वाड्याबद्दल बरीच माहिती मिळविली. वाडा बराच मोठा असल्यामुळें तुटपुंज्या नोकरांवर कामाचा भारी ताण पडत असे व दुसरी चांगली नोकरी मिळतांच तें दुर्लभदासाला सोडून जात असत. योगायोगानें याच सुमारास दुर्लभदासांच्या मुख्य नोकरानें राजीनामा दिला. त्या नोकराची बायको तेथें मुख्य मोलकरीण होती. तिनेंहि नवऱ्याबरोबर नोकरी सोडली व अनेक खटपटी करून काळापहाडनें स्वत:साठीं व कृष्णाकुमारीसाठीं त्या रिकाम्या झालेल्या जागा मिळविल्या.

दुर्लभदासाचें आपल्या बायकोवर प्रेम नव्हतें; आणि तो तिच्यापेक्षां रत्नसंग्रहाकडेच जास्त लक्ष देत असल्यामुळें तीहि त्याच्यावर नाराज होती. प्रथम भेटींतच कृष्णाकुमारीचें सौंदर्य दुर्लभदासाच्या नजरेंत भरलें व त्यामुळेंच त्या दोघांचा तिथें प्रवेश होणें जास्त सुलभ झालें. दुर्लभदासानें त्या दोघांची नेमणूक केली त्यावेळीं त्याची बायको गैरहजर होती. ती असती तर तिनें त्याच

कारणाकरितां त्यांना लागलीच वाड्याबाहेर हांकललें असतें

आठ दिवस त्या वाड्यांत राहिल्यानंतर एका रात्रीं बार उडविण्याचें काळापहाडनें ठरविलें. रविवारचा दिवस होता आणि दुपारींच दुर्लभदासाची बायको मेजवानीसाठीं मैत्रिणीकडे गेली होती आणि पहाटेंपर्यंत परत येणार नव्हती कृष्णाकुमारी दुर्लभदासाला खेळवत होती. त्यानें तिला बारा वाजतां आपल्या खोलींत बोलाविलें होतें. कृष्णाकुमारी अस्वस्थ झाली होती. पण आपण आपलें काम अर्ध्या तासांत पार पाडतों, तेवढा वेळ तूं दुर्लभदासाला सांभाळ असें त्यानें तिला सांगितलें होतें.

पावणेबारा वाजतां पाण्याचा तांब्या घेऊन कृष्णाकुमारी दुर्लभदासाच्या खास खोलीकडे निघाली आणि त्यानंतर दहा मिनिटांनीं काळापहाड बुरुजाकडे जाऊं लागला. त्या बुरुजाभोंवतीं पहारा होता. पण तेथल्या पहारेकऱ्यांची नजर चुकवून तो दाराजवळ गेला व तेथला वर्तुळाकार जिना चढूं लागला.

वाचनालयाच्या दाराबाहेर दोन सशस्त्र पहारेकरी होते. काळापहाडनें खालच्या मजल्यावर गेल्यानंतर मुद्दाम कांहीं आवाज केला. तपासासाठीं एक पहारेकरी खालीं आला पण काळापहाड कृष्णवस्त्रांमुळें त्याला दिसला नाहीं. पहारेकरी जवळ येतांच काळापहाडनें त्याच्या मस्तकावर रबरी दंडुक्याचा प्रहार करून त्याला बेशुद्ध केलें. काय गडबड आहे हें पहाण्यासाठीं दुसरा पहारेकरी तेथें आला. काळापहाडनें त्याचीहि तीच अवस्था केली. त्याचें काम सहज पार पडलें होतें. ते दोघे कित्येक तास शुद्धीवर येणार नव्हते.

काळापहाडनें वाचनालयाचें दार उघडलें व तो तिजोरीच्या खोलींत गेला दुर्लभदासाची तिजोरी उघडण्यास त्याला फार वेळ लागला नाहीं. तिजोरी अवाढव्य होती. पण ती जुन्या पद्धतीची होती.

काळापहाडनें प्रथम बरोबर आणलेल्या पिशवींत घनश्यामदासांचा कंठा ठेवला. नंतर कांहीं निवडक अलंकार उचलले. ते सर्व दुर्लभदासानें बदमाषांकडून विकत घेतले असावे अशी त्याची खात्री होती. त्यानें ती पिशवी कमरपट्ट्याला अडकविली आणि तो तिजोरी बंद करीत असतांना त्याची एका माणकाच्या कंठ्यांकडे नजर गेली. त्यानें तो खिशांत घातला व तिजोरी बंद करून तो कांहीं मिनिटांतच खालीं आला. त्यानंतर अर्ध्या मिनिटांत त्यानें वाड्यांत प्रवेश केला.

दाराबाहेर पावलांचा आवाज ऐकतांच आतांपर्यंत शेठजीबरोबर गोष्टी करून त्याला खेळविणारी कृष्णाकुमारी ओरडली, 'धांवा हो धांवा!'

काळापहाड आंत घुसतांच शेठजी गर्भगळीत झाले. आपला नवरा दारू पिऊन झोपला आहे, असें त्यांना मोलकरणीनें सांगितलें होतें. शेठजी अक्कला विशेषतः लवकरच परत येणाऱ्या आपल्या बायकोला घाबरत होते. काळापहाडनें उग्र अवतार धारण केला आणि अशा पाजी मालकाची आपणांला

नोकरी करावयाची नाहीं असें सांगितलें. इतर नोकरहि डोळे चोळीत जमा होऊं लागले होते. आपली जास्त शोभा होऊं नये म्हणून शेठजींनीं त्या दोघांना प्रत्येकी दोन महिन्यांचा पगार देऊन जाण्याची परवानगी दिली व पहारेकऱ्याला महाद्वार उघडून त्यांना बाहेर जाऊं देण्यास सांगितलें.

सशस्त्र पहारेकऱ्याचा पहारा असलेल्या ज्या दारांतून एरव्हीं बाहेर पडता आलें नसतें तें या नाटकामुळें सहज उघडलें गेलें व कृष्णाकुमारी आणि काळापहाड आपली कामगिरी यशस्वी करून तेथून बाहेर पडले.

आंखलेल्या योजनेप्रमाणें कांहीं अंतरावर त्यांची मोटार तयार होती.

'खरा प्रकार उघडकीस आल्यानंतर दुर्लभदास खूप गडबड करील.' कृष्णाकुमारी हसून म्हणाली.

'मला नाहीं तसें वाटत.' काळापहाड म्हणाला, 'आपण त्याच्या तिजोरींतून जो माल काढून घेतला तो सर्व चोरीचा आहे. गडबड करण्यांत दुर्लभदासाचाच तोटा आहे.'

'तुम्ही खरोखरच हुषार आहांत.' कृष्णाकुमारी म्हणाली.

कृष्णाकुमारी चंद्रवदनावर इतकी खूष झाली होती कीं, जेव्हां त्यानें तिच्या हॉटेलांत पोहोंचविलें तेव्हां तिनें त्या कंठयाची मागणी केली नाहीं. ति देईल तेवढा हिस्सा घेण्याचें तिनें मान्य केलें होतें. चंद्रवदन आपल्या घरीं आल्यानंतर त्यानें दागिन्यांची पिशवी बाहेर काढली. कृष्णाकुमारीला बरोबरीचा हिस्सा देण्याचें ठरविलें होतें. त्यानें ती पिशवी उघडली- पण त्यांत दागिने नव्हते ! तांब्या–पितळेची मोडतोड होती.

कृष्णाकुमारीनें मोटारींत पिशव्यांची कशी अदलाबदल केली हें त्याला समजलेंहि नव्हतें ! तिनें तो मोत्याचा कंठाच नव्हे तर इतरहि अलंकार पळविले होते ! त्यानें खिशांत हात घातला तेव्हां त्याच्या हाताला तो माणकांचा हार लागला. तो हार खिशांत होता म्हणूनच वांचला होता. त्या तसल्याहि परिस्थितींत चंद्रवदन हंसूं लागला.

• ० ० •

दुसऱ्या दिवशीं अर्थातच कृष्णाकुमारी आली नाहीं. तिच्याऐवजीं काळापहाडचा निरोप घेण्यासाठीं पंढरीनाथ ऊर्फ बहिरी ससाणा आला होता. त्यानें तो मोत्यांचा कंठा दुर्लभदासाला विकून दोन लक्ष रुपये मिळविले होते. कृष्णाकुमारीला किंवा काळापहाडला हिस्सा देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता. कारण त्या दोघांनींहि त्याला फसविण्याचा प्रयत्न केला होता.

काळापहाडनें टेलिफोन केला तेव्हां कृष्णाकुमारीनें रात्रींच हॉटेल सोडलें असें त्याला सांगण्यांत आलें. ती गोष्ट अपेक्षितच होती. बहिरीससाण्यानें पैसे कमाविले होते. कृष्णाकुमारीनें तर स्वतःचा चांगलाच फायदा केला होता. पण ज्यानें इतकी मेहनत केली होती त्या काळापहाडला कांहींच मिळालें

नव्हतें. कृष्णाकुमारीचा तो सतत दहा दिवस आणि दहा रात्री शोध करीत होता पण ती अदृश्य झाली होती.

o • o o

भाऊच्या धक्क्यासमोर टॅक्सींतून उतरल्यानंतर कृष्णाकुमारीनें तेथें जमलेल्या गर्दीचें क्षणभर सूक्ष्म निरीक्षण केलें. त्या ठिकाणीं तिला ओळखणारें कुणी नाहीं हें पाहून तिनें समाधानाचा निःश्वास सोडला.

धांवत आलेल्या हमालाला ती म्हणाली, 'या फक्त दोनच बॅगा आहेत. मीं चार नंबरची केबिन रिझर्व केली आहे.'

हमालानें त्या दोन कातडी पेटया उचलल्या व त्या पेटयांनींच गर्दी बाजूला सारीत तो तिला पुढें घेऊन गेला.

'बाईसाहेब, साहेबाला चार दोन रुपये द्या म्हणजे तो शांत सोडील.' हमालानें सल्ला दिला, 'गोव्याला जाणाऱ्या उतारूंची झडती घेतात.'

पण साहेबानें त्या दोन्ही पेटया तपासण्याचा आग्रह धरला. तो वयस्क असल्यामुळें त्याच्यावर कृष्णाकुमारीच्या सौंदर्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. त्यानें त्या दोन्ही पेटयांची अगदीं कसून झडती घेतली. कृष्णाकुमारी पूर्ण बेफिकीर होती. त्या पेटयांची तपासणी होणार हें तिला माहीत होतें.

'बाईसाहेब, आतां तुम्हांला माझ्याबरोबर त्या पलीकडच्या खोलीकडे आलें पाहिजे. तेथें एक स्त्री तपासनीस आहे. ती तुमची वैयक्तिक झडती घेईल.' तो अधिकारी म्हणाला.

क्षणभरच कृष्णाकुमारी घाबरली. इतकी कसून झडती घेण्यांत येईल अशी तिची कल्पना नव्हती. आतां घोटाळा होणार होता! पण त्या अधिकाऱ्याबरोबर कांहीं चर्चा न करतां ती त्याच्याबरोबर चालूं लागली. तिचें विचारचक्र वेगानें चालूं होतें.

एकाएकीं तिला जोराची शिंक आली. ती थांबली आणि पुन्हां शिंकली. तिनें रुमाल शोधला पण तो तिला मिळाला नाहीं.

'मला त्या निळ्या पेटींतून रुमाल काढला पाहिजे.' ती म्हणाली.

अधिकाऱ्याच्या चर्येवर संशयाच्या छटा पसरल्या होत्या. तो हमालाला म्हणाला, 'ती पेटी येथें ठेव. बाईसाहेब, चाव्या द्या. मी ती उघडतों.'

तिनें चाव्या दिल्यानंतर अधिकाऱ्यानें ती पेटी उघडली. कृष्णाकुमारी रुमाल काढण्यासाठीं खालीं वांकली. पण त्या अधिकाऱ्याची नजर चुकवून तिनें आपल्या पोलक्यांत दडविलेली पिशवी त्या पेटींत टाकणें तिला अशक्य होतें. पण त्याच वेळीं तो अडाणी हमाल तिच्या मदतीला धांवून आला.

तो हमाल अधिकाऱ्याला म्हणाला, 'ते पहा बडेसाहेब, तुम्हांला हात हालवून बोलावीत आहेत.'

अधिकाऱ्यानें त्या दिशेला नजर फेंकली व तो लागलीच कृष्णाकुमारीच्या

हालचालीकडे पहात म्हणाला, ' मूर्ख आहेस.'

' साहेब मला बोलावीत नाहींत! तूं म्हातारा झाला आहेस. चष्मा वापरण्यास सुरुवात कर. बाई, तुमचा रुमाल काढून घ्या. माझी खोटी होत आहे.'

कृष्णाकुमारीनें वरच असलेल्या रुमालांच्या घड्यांतून एक काढून घेतला. अधिकाऱ्यानें पेटी बंद केली. आतां त्यांचा संशय दूर झाला होता. त्याची नजर असतांना ती त्या पेटींत कांहींच लपवूं शकत नव्हती.

' बाईसाहेब, तुम्ही आंत चला. हमाल तुमच्या पेट्या सांभाळील.' तो अधिकारी म्हणाला.

पंधरा मिनिटांनीं कृष्णाकुमारी त्या छोट्या खोलींतून बाहेर आली. अधिकाऱ्यानें तिची औपचारिक क्षमा मागितली. हमालानें पेटी उचलल्यानंतर ती त्याच्यामागून जहाजावर चढली. हमालानें पेट्या केबिनमध्य व्यवस्थित ठेवल्यानंतर तिनें त्याला चांगली बक्षिसी दिली. कारण या वेंधळ्याला जरी कल्पना नव्हती तरीं तो ऐनवेळीं तिच्या अतिशय उपयोगी पडला.

पणजी येथील तपासणीची तिला भीति नव्हती. तेथले अधिकारी तरुण आणि परिचयाचे होते. जहाज चालूं लागल्यानंतर तिनें केबिनचें दार बंद केले व निळी पेटी उघडली. वरच्या साडीच्या खालीं असलेली पिशवी पाहून तिचा आनंद गगनांत मावेनासा झाला.

तिनें ती पिशवी उघडली. आंत तांब्या–पितळेची मोडतोड होती व एक बोचर चिठ्ठी होती. सुमारें एक मिनिटभर ती त्या चमत्काराकडे अविश्वासु नजरेनें पहातच राहिली. नंतर तिनें ती चिठ्ठी वाचली.

" प्रिय कृष्णाकुमारी, जें कांहीं घडलें त्याबद्दल मी तुझे आभार मानतों आपण एकमेकांपासून दूर होतांना तूं मला चांगली बक्षिसी देशील अशी खात्री नसल्यामुळें त्याबद्दलहि आभार मानून ठेवतों—काळापहाड."

तो वेंधळा हमालच काळापहाड होता हें आतां तिच्या लक्षांत आलें.

स मा प्त

[या कादंबरीचे सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन.]

कौटुंबिक मनोरंजनाचीं सुंदर साधनें

'रम्यकथा प्रकाशन' व 'सुंदर साहित्य प्रकाशन' यांमार्फत दरमहा २० तारखेस निरनिराळ्या प्रकारचीं एकूण २० पुस्तकें अत्यंत आकर्षक ढंगांत प्रसिद्ध होतात. त्यांची साधारण वर्गवारी पुढीलप्रमाणें—

(१) बाबूराव अर्नाळकर यांच्या अत्यंत चित्ताकर्षक नवीन व दुर्मीळ अशा ८ रहस्य-कादंबऱ्या. (एकूण किंमत रु. ९.)

(२) तरुण-तरुणींना गुदगुल्या करणारे नि प्रेम करायला शिकवणारे प्रणयशृंगार-कथांचे ३ अंतर्बाह्य सुंदर सचित्र संग्रह. (एकूण किंमत रु. २।।)

(३) लैंगिक विषयांची अत्यंत मनोवेधक, उपयुक्त अद्यावत् माहिती देणारी एकमेव मराठी मासिक-माला... 'कामजीवन' (किंमत फक्त ७५ पैसे)

(४) लहान मुलांसाठीं अद्‌भुतरम्य तशाच उपदेशगर्भ बालकथांचीं अंतर्बाह्य सचित्र व चित्ताकर्षक अशीं ५ पुस्तकें. (एकूण किंमत रु. १।।)

(५) लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचें निकोप मनरंजन करणारीं अद्‌भुतरम्य प्राचीन नि लोकप्रिय कथांचीं अंतर्बाह्य आकर्षक अशीं किमान ३ पुस्तकें. (एकूण किंमत अंदाजें रु. ३)

वरील सर्व प्रकाशनांची सवलतीची एकत्र वार्षिक वर्गणी किमान १५० रुपये होते, म्हणून—आम्हीं दोन सवलतीच्या योजना जाहीर करीत आहोंत....

(मागील पानावर पहा....)

२ रुपये ग्राहक योजना

दरमहा आमची सर्व प्रकाशनें घेण्याची इच्छा असूनहि [illegible] वर्गणी आगाऊ भरणें ज्यांना गैरसोईचें असेल त्यांनी २ रुपये डिपॉझिट भरावें. दरमहा पाऊणपट किंमतीच्या व्ही. पी. [illegible] सर्व पुस्तकें पाठविण्यांत येतील. व्ही. पी. खर्च [illegible].

१॥ रुपया ग्राहक योजना

ज्यांना आमची सर्वच प्रकाशनें नको असतात, परंतु [illegible] निम्मी किंवा अधिक हवी असतात त्यांनी १॥ रुपया [illegible] भरावा. त्यांना हवीं असतील तीं पुस्तकें दरमहा [illegible] किंमतीच्या व्ही. पी. नें घरपोंच पाठवूं.

● मात्र, वरील दोन्ही सवलत-योजनांबाबतीत व्ही. पी. [illegible] आल्यास डिपॉझिट रक्कम पुन्हां भरावी लागते; ही [illegible] लक्षांत ठेवावी.

तरी वरीलपैकीं कोणत्याहि योजनेसाठीं [illegible] [illegible] रक्कम पाठवून अखंड आनंदाचा ठेवा [illegible] हस्तगत करा—

अधिक माहितीसाठीं लिहा ●

रम्यकथा प्रकाशन

५५१ बुधवार पेठ, पुणें २.

आगामी हिंदी सिनेमांच्या गाण्यांनी नटलेले
आणि अंतर्बाह्य अधिकच आकर्षक असलेले

सिने-संगीत

भाग ४ था

प्रसिद्ध झाला

व्यव. – रम्यकथा प्रकाशन
३९२ नारायण पेठ, कान्हेरे बिल्डिंग, पुणे २

सिनेसंगीताचे भाग, मनोळकरांच्या जन्या रहस्य–कादंबऱ्या व
आमची सर्व लोकप्रिय पुस्तकें मिळण्याचें मुंबईतील प्रसिद्ध ठिकाण

सुखसागर पुस्तकालय,

व्ही. टी. हायस्कूलजवळ, दादीशेठ अग्यारी लेन, मुंबई २.

नासिक येथें मिळण्याचें ठिकाण

सुंदरसागर पुस्तकालय

भिकूसालेन, मेनरोडजवळ, नासिक.